# रामदासांचीं भजनें

## बोध-बिंदु

आणि

## मनाचीं शतें

११५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५०१

★

विनोबा

REFBK-0010591
REFBK-0010591

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

# रामदासांचीं भजनें

# बोध-बिंदु

आणि

# मनाचीं श्लोकें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों. दि: ......

विनोबा

REFBK-0010591

REFBK-0010591

## परंधाम विद्यापीठ प्रकाशन

दासनवमी शके १८७९
ता. १२ फेब्रूवारी १९५८

साधी बांधणी १.५० नये पैसे
कापडी ,, २.२५ नये पैसे

प्रकाशक :

भाऊ पानसे

ग्राम-सेवा-मंडळ

परंधाम विद्यापीठ, पो. पवनार (वर्धा)

● ● ●

आवृत्ति १ ली. ३०००

सर्व हक्क प्रकाशकाधीन

● ● ●

मुद्रक :

मोहनलाल भट्ट,

राष्ट्रभाषा प्रेस,

हिन्दीनगर, वर्धा

● ● ●

# प्रस्तावना

लहानपणीं मला रामदासांचें वेड होतें. मला जणूं ते आदर्शमूर्ति वाटत. आध्यात्मिक साहित्यांत अगदीं सहजपणें आणि नकळत त्यांच्या साध्या लिखाणानें माझा प्रवेश झाला. तिथून मागें मागें जात जात ज्ञानदेवापर्यंत आणि पुढें संस्कृतद्वारां वेदापर्यंत ओघाओघानें दर्शन घडलें. पुष्टीसाठीं अनेक भाषांतील आणि अनेक धर्मांचें साहित्य अवलोकनांत आलें. या सर्वांच्या मदतीनें विचारांचें चांगलें पचन झालें, आणि सारभूत अंशाचें ग्रहण होऊन असारभूत अंश गळून पडला. रामदासाची मला जेव्हां जेव्हां आठवण होते तेव्हां "**आई, थोर तुझे उपकार**" एवढा च उद्गार मला स्फुरतो.

रामदासांनीं लिहून तर पुष्कळ ठेवलें आहे. परंतु असार सोडून सार घ्यावें हें त्यांच्या सर्व लिखाणाचें सार आहे. किंबहुना ही त्यांची आज्ञा आहे. तद्नुसार त्याचें लिखाण चाळून पाहतां त्यांतला पुष्कळ अंश सहज च गळून पडणारा आहे. त्यांच्या ग्रंथांत दासबोध आणि मनाचे श्लोक हे दोन शिरोमणी ग्रंथ म्हणायचे. दासबोधाची असंख्य पारायणें माझीं झालीं, आणि मनाचे श्लोक तर मला पाठ च होते. अनेक पारायणानंतर दासबोधाचें जें मोजकें सार माझ्या हातांत आलें तेवढें "**बोध - बिंदु**" या नांवाने माझ्यासाठीं मीं निवडून ठेवलें होतें. मनाचें श्लोक ही मात्र सोन्याची तिजोरी च आहे. दासबोध ही सोन्याची खाण म्हणावी लागेल. खाणीमध्यें अशोधित धातु पडलेला असतो. तो शोधून घ्यावा लागतो. तिजोरींत निखळ सोनें सांठविलेलें असतें. मनाचे

प्रकाशक :

भाऊ पानसे

ग्राम-सेवा-मंडळ

परंधाम विद्यापीठ, पो. पवनार (वर्धा)

● ● ●

आवृत्ति १ ली. ३०००
सर्व हक्क प्रकाशकाधीन

● ● ●

मुद्रक :

मोहनलाल भट्ट,

राष्ट्रभाषा प्रेस,

हिन्दीनगर, वर्धा

● ● ●

# प्रस्तावना

लहानपणीं मला रामदासांचें वेड होतें. मला जणूं ते आदर्शमूर्ति वाटत. आध्यात्मिक साहित्यांत अगदीं सहजपणें आणि नकळत त्यांच्या साध्या लिखाणाने माझा प्रवेश झाला. तिथून मागें मागें जात जात ज्ञानदेवापर्यंत आणि पुढें संस्कृतद्वारां वेदापर्यंत ओघाओघानें दर्शन घडलें. पुष्टीसाठीं अनेक भाषांतील आणि अनेक धर्मांचें साहित्य अवलोकनांत आलें. या सर्वांच्या मदतीनें विचारांचें चांगलें पचन झालें, आणि सारभूत अंशाचें ग्रहण होऊन असारभूत अंश गळून पडला. रामदासांची मला जेव्हां जेव्हां आठवण होते तेव्हां "**आई, थोर तुझे उपकार**" एवढा च उद्गार मला स्फुरतो.

रामदासांनीं लिहून तर पुष्कळ ठेवलें आहे. परंतु असार सोडून सार घ्यावें हें त्यांच्या सर्व लिखाणाचें सार आहे. किंबहुना ही त्यांची आज्ञा आहे. तद्नुसार त्याचें लिखाण चाळून पाहतां त्यांतला पुष्कळ अंश सहज च गळून पडणारा आहे. त्यांच्या ग्रंथांत दासबोध आणि मनाचे श्लोक हे दोन शिरोमणी ग्रंथ म्हणायचे. दासबोधाची असंख्य पारायणें माझीं झालीं, आणि मनाचे श्लोक तर मला पाठ च होते. अनेक पारायणानंतर दासबोधाचें जें मोजकें सार माझ्या हातांत आलें तेवढें "**बोध - बिंदु**" या नांवाने माझ्यासाठी मी निवडून ठेवलें होतें. मनाचें श्लोक ही मात्र सोन्याची तिजोरी च आहे. दासबोध ही सोन्याची खाण म्हणावी लागेल. खाणीमध्यें अशोधित धातु पडलेला असतो. तो शोधून घ्यावा लागतो. तिजोरींत निखळ सोनें सांठविलेलें असतें. मनाचे

श्लोक ही रामदासांची अपौरुषेय वाणी आहे. अन्य लिखाणांपैकीं मुख्यत: त्यांच्या अभंगाची गाथा मीं वारंवार घोळली आहे. तिचा एक सहज संग्रह माझ्या स्मृतींत सांठवला होता.

प्रस्तुत पुस्तकांत आधीं रामदासांचीं निवडक भजनें, त्या नंतर दासबोधांतील बोध - बिंदु, आणि शेंवटीं मनाचे श्लोक ज्याला समर्थांनीं 'मनाचीं शतें' असें नांव दिलें आहे, सबंध घेतले आहेत.

ज्ञानदेवादिकांचीं भजनें जशीं मीं साधनेच्या क्रमानुसार प्रकरणें पाडून वाचकांच्यापुढें मांडलीं आहेत तशी रामदासांचीं हीं भजनें मांडलेलीं नाहींत. सध्यां त्यासाठीं वेळ मिळण्यासारखा नसल्यामुळें हीं भजनें जशीं मुळांत होतीं तशीं मोकळीं च ठेवलीं आहेत.

"गुंफिली का मोकळीं परी उणी नव्हती परिमळीं।
वसंतागमींचीं वाटोळीं मोगरीं जैसीं।"

या न्यायानें गोडींत कांहीं कमी होण्याचें कारण नाहीं.

बोध-बिंदु दासबोधांतील दशक क्रमानें दिलेले आहेत. ते अलग अलग चिंतावयाचें आहेत. क्वचित् एकामागून एक आलेले दोन-चार बिंदु एकत्र हि चिंतितां येतील.

मनाचीं शतें सात अध्यायांत विभागून दिलीं आहेत. साप्ताहिक पारायणाला हें विभाजन उपयोगी होईल. पहिला एक श्लोक मंगलाचरणाचा, शेंवटचे चार उपसंहार आणि फलश्रुति, आणि मधें १००-१०० श्लोकांची दोन शतकें, अशी रामदासांनीं स्वत: च योजना केलेली आहे. ती तशी च प्रकट केली आहे. श्लोकांखालीं थोड्या टीपा दिलेल्या दिसतात, त्या केवळ संगति-सूचक आहेत.

या पुस्तकांत शेंवटीं परिशिष्ट-रूपानें 'समर्थाचें स्मरण' हा माझा चौतीस वर्षांपूर्वी लिहिलेला अपूर्ण निबंध जसाचा तसा छापला आहे. तो पूर्ण करण्याची आतां सवड नाहीं, आणि गरज हि नाहीं. जसा आहे तसा च पुस्तक रूपांत सांठवलेला बरा अशा समजुतीनें शेंवटीं जोडून दिला आहे.

* * *

रामदासांचे ग्रंथ मीं लहान मुलाच्या मनानें वाचलेले, त्यामुळें त्यांतून लहानसा च अर्थ मला उपलब्ध झाला. पण जो झाला त्याचा माझ्या चित्तावर खोल ठसा उमटला, जो अजून हि कायम आहे. भक्ति, वैराग्य, प्रयत्नवाद, विवेक इत्यादि अनेक गोष्टी रामदासांच्या उपदेशांत आलेल्या आहेत. परंतु मुख्य वस्तु माझ्या चित्तांत ठसली ती त्यांचा "समुदायाचा हव्यास." हा 'हव्यास' शब्द तितकासा चांगल्या अर्थाचा नाहीं. पण रामदासांनीं तो च गोड करून घेतला आहे. हव्यास म्हटला कीं 'धरू नये' असें च क्रियापद त्याला जोडलें जाणार. परंतु 'समुदायाचा हव्यास' धरावा, असें रामदास आर्जवून म्हणतात. मला तें पटलें आणि पटतें.

"ज्ञानी आणि उदास, समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकाश एकांत सेवावा ।। ४५७ ।।

या त्यांच्या शिकवणीप्रमाणें मीं सतत तीस वर्षे अखंड सावकाश एकांत सेविला आणि समुदायाचा जो हव्यास धरला, तो धरला च धरला. '**अक्षराणां अकारोऽस्मि**' म्हणून ज्या 'अ' काराचें विभूतिमत्त्व भगवंतांनीं गायिलें आहे तेवढा या ओवीच्या आरंभीं जोडला म्हणजे ती ओवी मला अक्षरशः लागू पडते.

समुदायाच्या हव्यासाबाबत माझें एक पाऊल पुढें च आहे. जी सामुदायिक ती च साधना असें माझें म्हणणें आहे. सामुदायिक सेवा ही च व्यक्तिगत साधना व्हावयास पाहिजे. पण एवढ्यानें हि माझ्या विचाराचें समाधान होत नाहीं. सामुदायिक सेवा देखील सामुदायिक साधनेच्या रूपाची असली

पाहिजे. समुदायाच्या भौतिक उन्नतीची चिंता करणें ही पर्याप्त सेवा नव्हे. त्याच्या भौतिक नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीची चिंता करणें ही पूर्ण आणि यथार्थ सेवा होय. अशा सेवेला साधनेचें रूप येतें. व्यक्तिगत साधना तिच्या पोटांत, आणि पोटांत च, राहूं शकते. 'माझा स्वार्थ' ही जशी चुकीची कल्पना, कारण जेथें 'माझा' तुटून पडतो तिथें च स्वार्थाचें दर्शन होतें; तशी 'माझी साधना' ही हि चुकीची कल्पना आहे, कारण जिथें 'माझी' तुटून पडेल तिथें च साधनेचें दर्शन होईल. 'माझी साधना' हा वदतो व्याघात आहे. माझी साधना हे दोन शब्द परस्परविरोधी च आहेत. 'मी' उडविण्याचा प्रयत्न हें च साधनेचें स्वरूप. सामुदायिक साधना ही त्याची सुलभतम प्रक्रिया.

भूदान यज्ञ-यात्रेंत या विचाराचा मला प्रतिक्षणी अनुभव येत आहे. हे सारें रामदासांनीं पाजलेल्या वाळकडूचें गोड फळ आहे. रोज तें मीं चाखत आहें; आणि "**बहूतां दिसां आपुली भेटि झाली**" असा मनाच्या श्लोकाचा चरण मनांतल्या मनांत गुणगुणत आहें.

मंडया (मैसूर प्रदेश)
५-१०-५७

विनोबा

★

# अनुक्रमणिका

## प्रस्तावना


| | पृष्ठें |
|---|---|
| १. रामदासांचीं भजनें | १ ते ६३ |
| २. बोध-बिंदु | ६८ ते १३२ |
| ३. मनाचीं शतें | १३५ ते १८२ |


## परिशिष्ट


| | |
|---|---|
| १. समर्थांचें स्मरण | १८३ ते २०८ |
| २. भजनांची वर्णानुक्रमणिका | २०९ ते २१२ |

# रामदासांचीं भजनें

मराठी ग्रंथ सं . . . . . , ठाणे . . . . . . .
अनुक्रम २११०५ वि: ८२१
क्रमांक १५०१ नों. दि.

# रामदासांचीं भजनें

वा. क्र. ..... .....

ध्यान लागलें रामाचें । दुःख हरलें जन्माचें
रामपदांबुजावरी । वृत्ति गुंतली मधुकरी
रामवदनमयंकीं । चक्षुचकोर जाले सुखी
तनुमेघश्याम मेळे । चित्तचातक निवाले
कीर्तिसुगंधतरुवरी । कूजे कोकिळा वैखरी
रामीरामदासस्वामी । प्रगटले अंतर्यामीं

२

समुदाय काय सांगों श्रीरामाचा । अंतरीं कामाचा लेश नाहीं
लेश नाहीं तया बंधु भरतासी । सर्वहि राज्यासी त्यागियेलें
त्यागियेलें अन्न केलें उपोषण । धन्य लक्ष्मण ब्रह्मचारी
ब्रह्मचारी धन्य मारुती सेवक । श्रीरामीं सार्थक जन्म केला
जन्म केला धन्य वाल्मीकऋषीनें । धन्य तीं वचनें भविष्याचीं
भविष्य पाहतां धन्य बिभीषण । राघवीं शरण सर्वभावें
सर्वभावें सर्व शरण वानर । धन्य ते अवतार विबुधांचे
विबुधां मंडण राम सर्व गुण । अनन्य शरण रामदास

३

राज्य जालें रघुनाथाचें । भाग्य उदेलें भक्तांचें
नाना रत्नांचे डोंगर । अमृताचे सरोवर
पृथ्वी अवघी सुवर्णमय । कोणीकडे न्यावें काय
ब्रह्मादिकांचा कैवारी । रामदासाच्या अंतरी

४

इथें कां रे उभा रामा । मनमोहन मेघश्यामा
चाप बाण काय केले । कर कटावरी ठेविले
कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला
काय जाली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी
शरयुगंगा काय केली । कैंची भीमा मेळविली
किल्किलाट वानरांचे । थवे न दिसती तयांचे
दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यांतुनि फूटला
रामदासीं सद्भाव जाणा । राम जाला पंढरिराणा

५

राम आकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं
राम योगियांचे मेळीं । सर्वकाळीं शोभतो
राम नित्य निरंतरीं । राम सबाह्य अंतरीं
राम विवेकाचे घरीं । भक्तीवरी सांपडे
राम भावें ठायीं पडे । राम भक्तांसी सांपडे
राम मीपणें नातुडे । मौन घडे श्रुतींसी
राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण
राम आनंदरक्षण । संरक्षण दासाचें

६

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं
करि डळमळ भूमंडळ सिंधुजळ गगनीं
कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं
सुरवरनर निशाचर त्यां जाल्या पळणी

जयदेव जयदेव जयजय हनुमंता
तुमचेनि प्रतापें न भियें कृतांता । जयदेव० ।
दुमदुमिलें पाताळ उठला पडशब्द
धगधगिला धरणीधर मानिला खेद
कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद
रामीरामदासा शक्तीचा शोध । जयदेव०

७

अजयो न हो रे जयवंत हो रे
आपदा नको रे बहुभाग्य हो रे
श्रीमंतकारी जनहितकारी
परोपकारी हरिदास तारी

८

रामा कृपा बहुत असों देणें । आम्ही धन्य जाहलों तुझे गुणें

रामा गोड लागती तुझ्या गोष्टी । हर्षें गुदगुल्या होताती पोटीं
जणुं सांपडली चणियाची मुठी । वाटे धरावी तुझी हनुवटी

राम आलिंगोनी सप्रेमें बोले । तुम्ही मजलागीं हे कष्ट केले
सुखी करोनि सर्व गौरविले । रामदासीं हनुमंत ठेले

९

कल्याण मागणें देवा, तुज
तूं जगजीवन तूं मनमोहन । कोण आहे तुजविणें
आम्ही हरिजन तूं जनपावन । बोलति वेदपुराणें
देव हि आले भक्त मिळाले । आनंद तुझियेनि गुणें
भक्त सुखी देवराव हि सुखी । दास म्हणे मज देणें

१०

प्रथम लिहिणें दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर
आशंकानिवृत्ति ऐसी चौथी स्थिति । पांचवी प्रचीति अनुभवें
साहावें तें गाणें सातवें नाचणें । ताळी वाजवणें आठवें तें
नवा अर्थभेद दहावा प्रबंध । अकरावा प्रबोध प्रचीतीसीं
बारावें वैराग्य तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे
पंध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अव्यग्रता
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वांठायीं
अठरावें लक्षण वृत्ति उदासीन । लोलंगता जाण तेथें नाहीं
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान । राखे समाधान ज्याचें त्याचें
विसावें लक्षण रामउपासना । वेध लावी जनां भक्तिरंगें

११

देह विटाळाचा गोळा । कैसा होतोसि सोंवळा
तुज कळेना विचारु । ऐसीयासी काय करूं
दृढ केला अभिमान । तेणें साधनें बंधन
रामदासस्वामीविण । केला तितुकाही शीण

१२

देह हें असार कृमींचें कोठार । परी येणें सार पाविजे तें
देहसंगें घडे संसारयातना । परी हा भजना मूळ देहो
देहाचेनि संगें हिंपुटी होईजे । विचारें पाविजे मोक्षपद
देहसंगें भोग देहसंगें रोग । देहसंगें योग साधनाचा
देहसंगें गती रामदासीं जाली । संगति जोडली राघवाची

१३

देहीं आरोग्य चालतें । भाग्य नाहीं यापरतें
लाहो घ्यावा हरिभक्तीचा । नाहीं भरंवसा देहाचा
देह आहे क्षणभंगुर । तुम्ही जाणतां विचार
रामीरामदास म्हणे । अकस्मात लागे जाणें

१४

घात करूनि आपुला । काय रडशील पूढिलां
बहुत मोलाचें आयुष्य । विषयलोभें केला नाश
नाहीं ओळखिलें सत्या । तेणें केली ब्रह्महत्या
रामीरामदास म्हणे । भुलों नको मूर्खपणें

१५

ऐसा हा मत्सर लागलासे पाठीं । देवा तुझी भेटी केंवि घडे
भिन्न उपासना भिन्न संप्रदाव । एकमेकां सर्व निंदिताती
पंडितां पंडितां विवाद लागला । पुराणिकां जाला कलह थोर
वैदिकां वैदिक भांडती निकुरें । योगी परस्परें भांडताती
स्वजाति विजाति भांडण लागलें । दास म्हणे केलें अभिमानें

१६

अनित्याचा भ्रम गेला । शुद्ध नित्यनेम केला
नित्यानित्य हा विचार । केला स्वधर्मआचार
देहबुद्धि अनर्गळ । बोधें फिटला विटाळ
रामदासीं ज्ञान जालें । आणि स्वधर्मा रक्षिलें

१७

रुक्मांगद होता नर । आम्ही काय आहों खर
देव भक्तवेळाइत । राव रंक नाहीं तेथ
तेणें नेला अवघा गाऊ । आम्ही तरी स्वयें जाऊं
रामीरामदासीं काज । धरा एकमेकीं लाज

१८

क्षीरापतीची वाटणी । तेथें जाली बहु दाटणी
पैस नाहीं राजांगणीं । कोणालागीं
रंगमाळा निरांजनें । तेथें वस्ती केली मनें
दिवस उगवतां सुमनें । कोमाईलीं
भक्तजन म्हणती देवा । आतां लोभ असों द्यावा
बहु सुकृताचा ठेवा । भक्ति तूझी
दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो
देव भक्तांसवें जातो । ध्यानरूपें

१९

धातुवरी आला मळ । तेणें लोपलें निर्मळ
शेतीं न जातां आउत । तेणें आच्छादलें शेत
मुखें न होतां उच्चार । तेणें बुडे पाठांतर
नाहीं दिवसाचा विचार । दास म्हणे अंधकार

२०

टाकोनि जनासी अरण्यीं जे जाती । पूर्ण ते होती कल्पांतरीं
अरण्या गेल्यानें जनोक्ति सहन । न जाल्या अभिमान केंवि जाय
ज्या स्थळीं प्रतिष्ठा त्या स्थळींचे जन । निंदिल्या वचन न साहती
तयासी सोसावें थोर हें साधन । होईल तो पूर्ण तेणेंकरूनी
रामदास म्हणे ऐसे जे निश्चयी । माथा त्यांचे पायीं ठेविलासे

२१

संसारीं नव्हता काय तो जनक । म्हणती विवेक न करितां
सत्ययुग आणि आयुष्यभरंवसा । याज्ञवल्क्या ऐसा उपदेशिता
ऋषीश्वर नित्य येती जाती घरीं । तेणें वनांतरीं कां जावें हो
असे तुम्हां काय ऐसी अनुकूळता । मूर्ख नाश थिता कां करितां
रामदास म्हणे कलियुगीं हेचि । वाट साधनाची बरी सोपी

२२

ऐसा कैसा रे परमार्थ । जळो जळो जिणें व्यर्थ
युक्ताहार करवेना । निद्रा आली धरवेना
मन चंचळ आवरेना । नीच उत्तर साहवेना
रामदास म्हणे भावें । स्थूल क्रियेस नव जावें

२३

वैद्य भेटला सुखदाता । रोगपालट जाला आतां
रस ओतीला कानांत । येउनि झोंबला नयनांत
रस भरला सांदोसांदीं । देहीं पालट जाली बुद्धि
दिव्य देहीं ओतिला रस । गुरु न्याहाळी रामदास

२४

आतां कोणा शरण जावें । सत्य कोणतें मानावें
एक म्हणती अवघें वाव । एक म्हणती अवघा देव
एक कळोंचि नेदिती । एक दाटोनी सांगती
एक कर्मीच्च तत्पर । एका कर्मीं अनादर
एक मानिती सगुण । एक मानिती पाषाण
एकीं केला सर्व त्याग । एक म्हणती राजयोग
रामदास सांगे खूण । भक्तीविण सर्व शीण

२५

प्रवृत्ति सासुर निवृत्ति माहेर । तेथें निरंतर मन माझें
माझे मनीं सदा माहेर तुटेना । सासुर सुटेना काय करूं
काय करूं मज लागला लौकिक । तेणें हा विवेक दुरी जाय
दुरी जाय हित मज चि देखतां । यत्न करूं जातां होत नाहीं
होत नाहीं यत्न संतसंगेविण । रामदास खूण सांगतसे

२६

इंद्रासी उद्वेग सर्वकाळ मनीं । माझें राज्य कोणी घेईना कीं
घेईना कीं कोणी बळिया दानव । घालिना कीं देव कारागृहीं
कारागृह देवादिकांचें चुकेना । तेथें काय जनां चुकईल
चुकईल भोग हें कई घडावें । लागेल भोगावें केलें कर्म
केलें कर्म तुटे जरी भ्रांति फिटे । दास म्हणे भेटे संतजन

मराठी ग्रंथ... वि: ... नों: दि: ... अनुक्र. २१७०५ क्रमांक ... १८०१

२७

तेचि जाणावे सज्जन । जयां शुद्ध ब्रह्मज्ञान
कर्म करिती आवडी । फळाशेची नाहीं गोडी
शांति क्षमा आणि दया । सर्व सख्य माने जया
हरिकथा निरूपण । सदा श्रवण मनन
बोलासारिखे चालणें । हींचि संतांचीं लक्षणें
एकनिष्ठ उपासना । अतितत्पर भजना
स्वार्थ सांडूनियां देणें । नित्य तेंचि संपादणें
म्हणे रामीरामदास । जया नाहीं आशापाश

२८

जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानी । निःसंदेह मनीं सर्व काळ
आवडीनें करी कर्म-उपासना । सर्वकाळ ध्यानारूढ मन
पदार्थाची हानी होतां नये काणी । जयाची करणी बोलाऐसी
दास म्हणे धन्य सर्वांसी जो मान्य । जयाचा अनन्य समुदाव

२९

पांचां लक्षणीं पुरता । धन्य धन्य तोचि ज्ञाता
राखे गुरुपरंपरा । देव सगुण दुसरा
विवेक-वैराग्य सोडीना । कर्म-उपासना सांडीना
बाह्य बोले शब्दज्ञान । अंतर्यामीं समाधान
रामीरामदास कवी । न्यायनीतीनें शिकवी

३०

जाणावा तो साधु जया पूर्ण बोधु । भूतांचा विरोधु जेथ नाहीं
कल्पनेचा देहो त्या नाहीं संदेहो । सदा निःसंदेह देहातीत
जया नाहीं क्रोध जया नाहीं खेद । जया नाहीं बोध कांचनाचा
रामदास म्हणे साधूचीं लक्षणें । अति सुलक्षणें अभ्यासावीं

३१

बोलण्यासारिखें चाले जो सज्जन । तेथें माझें मन विगुंतलें
नाहीं अभिमान शुद्ध ब्रह्मज्ञान । तेथें माझें मन विगुंतलें
वृत्ति उदासीन स्वधर्मरक्षण । तेथें माझें मन विगुंतलें
पूर्ण समाधान सगुणभजन । तेथें माझें मन विगुंतलें
दास म्हणे जन भावार्थसंपन्न । तेथें माझें मन विगुंतलें

३२

साधु आणि भक्त, व्युत्पन्न विरक्त । तपोनिधि शांत, अपूर्वता
मिळों जाणे जना निर्मळ वासना । अंतरीं असेना निंदा द्वेष
वांटेकरी जाला सायुज्यमुक्तीचा । धन्य तो दैवाचा दास म्हणे

३३

जाणावा तो नर देवचि साचार । वाचे निरंतर रामनाम
सगुणीं सद्भाव नाहीं ज्ञानगर्व । तयालागिं सर्व सारिखेंचि
निंदकां वंदकां संकटीं सांभाळी । मन सर्वकाळीं पालटेना
पालटेना मन परस्त्रीकांचनीं । निववी वचनीं पुढिलांसी
पुढिलांसी नाना सुखें देत आहे । उपकारीं देह लावितसे
लावितसे देह रामभजनासी । रामीरामदासीं रामभक्त

३४

धन्य ते भाविक वंदिती हरिदास । तयां हृषीकेश वंदितसे
धन्य ते निंदक निंदिती सज्जन । येणें भावें घडे ध्यान त्यांचें
धन्य दास दासी सज्जनसेवेसी । ते सुरवरांसी वंद्य होती
रामदास म्हणे तरीच धन्य होणें । जरी संग लाधणें सज्जनाचा

३५

देव अभक्तां चोरला । आम्हां भक्तां सांपडला
भेटी जाली सावकाश । भक्तां न लागती सायास
पुढें विवेक वेत्र-पाणी । वारी दृश्याची दाटणी
रामदासाचें अंतर । देवापाशीं निरंतर

३६

ऐसा कोण संत जो दावी अनंत । संदेहाचा घात करूं जाणे
आढळेना जया आपुलें पारिखें । ऐक्यरूप सुखें सुखावला
धन्य तेचि जनीं जे गुणें बोधिले । दास म्हणे जाले पुरुष ते

३७

आपुलें स्वरूप आपणा नेणवे । तयासी जाणवे राम केंवी
देहातीत संत जाणतो अनंत । प्रकृतीचा प्रांत निजानंद
आणियेलें उणें शब्दसमुद्रासी । निःशब्दातें ग्रासी मौन्यमुद्रा
मावळली सर्व दासाची आशंका । जानकीनायका देखतांचि

३८

जोपा केली इक्षुदंडा । तेंचि जीवन एरंडा
संतसंग लाधलिया । एका बोध एका माया
रामदासीं रामराव । नाहीं आणिक उपाव

३९

जंव तुज आहे देहाचा सबंध । तंव नव्हे बोध राघवाचा
राघवाचा बोध या देहावेगळा । देह कळवळा तेथें नाहीं
नांदतसे सदा जवळी कळेना । कदा आकळेना साधुविण
कांहीं केल्या नव्हे साधुसंतांविण । रामदास खूण सांगतसे

४०

पाहतां दिसेना तेंचि बरें पाहें । तेथें रूप आहे राघवाचें
निराकार राम देखतां विश्राम । दुरी ठाके श्रम संसारींचा
सर्वकाळ रामदर्शन होतसे । निर्गुणीं विश्वासें मन माझें
संतसंगें घडे निःसंगाचा संग । राघवाचा योग रामदासीं

४१

देव जवळी अंतरीं । भेटि नाहीं जन्मवरी
भाग्यें आले संतजन । जालें देवाचें दर्शन
मूर्ति त्रैलोक्यीं संचली । दृष्टि विश्वाची चुकली
रामदासीं योग जाला । देहीं देव प्रगटला

४२

आम्ही अपराधी अपराधी । आम्हां नाहीं दृढ बुद्धि
माझे अन्याय अगणित । कोण करील गणित
मज सर्वस्वें पाळिलें । प्रचितीनें सांभाळिलें
माझी वाईट करणी । रामदास लोटांगणीं

४३

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें
भक्तीची आवडी नाहीं निरंतर । कोरडें अंतर भावेंविण
माझें मीतूंपण गेलें नाहीं देवा । काय करूं ठेवा संचिताचा
रामदास म्हणे पतिताचें उणें । पतितपावनें सांभाळावें

४४

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें
वैराग्याचा लेश नाहीं माझे अंगीं । बोलतसें जगीं शब्दज्ञान
देह हें कारणीं लावावें नावडे । आळस आवडे सर्वकाळ
रामदास म्हणे लाज तुझी तुज । कोण पुसे मज अनाथासी

४५

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें
मन हें चंचळ न राहे निश्चळ । निरूपणीं पळ स्थिरावेना
सांडुनियां ध्यान विषयचिंतन । करितसे मन आवरेना
रामदास म्हणे कथा निरूपणें । मनाचीं लक्षणें जैसीं तैसीं

४६

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें
मुखें बोले ज्ञान पोटीं अभिमान । पाहे परन्यून सर्वकाळ
दृढ देहबुद्धि तेणें नाहीं शुद्धि । जाहलों मी क्रोधी अनावर
रामदास म्हणे ऐसा मी अज्ञान । सर्व ब्रह्मज्ञान बोलोनीयां

४७

पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें
मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाचे
सदा खळखळ निर्गुणाची घडे । सगुण नावडे ज्ञानगर्वें
रामदास म्हणे ऐसा मी पतित । मीपणें अनंत पाहों जातां

४८

बिभीषण भावें शरण आला परी । तुज सिंधुतीरीं ऐकुनीयां
तात्काळचि तुवां आश्वासिलें त्यासी । तैसें हें आम्हासीं कैंचें रामा
धारिष्ट आमुचें पाहे सर्वोत्तमा । कलियुगींचे रामा दास तुझे
दर्शन सुग्रीवा आधीं सौख्य दिलें । मग तेणें केलें दास्य तुझें
तुजलागीं प्राण वेंचिले वानरीं । परि तूं धनुर्धारी पाठीराखा
तुझें रूप दृष्टीं नसोनीयां ठावें । नामीं सर्वभावें विश्वासलों
सकळांहूनि साना रामदास जालों । परिवारेंसि आलों शरण तुज

४९

रामा तुझ्या स्वामीपणें । मानी ब्रह्मांड ठेंगणें
तुजविण कोण जाणे । अंतर आमुचें

तुजविण मज माया । नाहीं नाहीं रामराया
आम्हां अनाथां कासया । उपेक्षिसी

तुज समुदाय दासांचा । परि आम्हां स्वामी कैंचा
तुजसाठीं जिवलगाचा । संग सोडिला

सगुण रघुनाथ मुद्दल । माझें हेंचि भांडवल
दास करूनि पैलपार । टाकीं या भवाचे

५०

माझा देह तुज देखतां पडावा । आवडी हे जीवा फार होती
फार होती परी पुरली पाहतां । चारी देह आतां हारपले
सिद्ध जालें माझें मनींचें कल्पिलें । दास म्हणे आलें प्रत्ययासी

५१

काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा
कांहीं धांवाधांव करी । जंव तो आहे काळ दुरी
मायाजाळीं गुंतलें मन । परि हें दुःखासि कारण
सत्य वाटतें सकळ । परि हें जातां नाहीं वेळ
रामीरामदास म्हणे । आतां सावधान होणें

५२

नदी मर्यादा सांडती । उष्णकाळीं वोसावती
तैसा तारुण्याचा भर । सवें होतसे उतार
भाग्य चढे लागवेगें । सवेंचि प्राणी भीक मागे
रामदास म्हणे काळ । दोनी दिवस पर्वकाळ

५३

पुरें पट्टणें वसती । एक वेळ ओस होती
तैसें वैभव हें सकळ । येतां जातां नाहीं वेळ
बहुत सृष्टीची रचना । होय जाय क्षणक्षणा
दास म्हणे सांगों किती । आले गेले चक्रवर्ती

५४

सांजें ओसरतां सांत । वांया करावा आकांत
तैसीं सखीं जिवलगें । जाती एकमेकांमागें
चारी दिवस यात्रा भरे । सवेंचि मागुती ओसरे
पूर्ण होतां महोत्साव । फुटे अवघा समुदाव
बहु वऱ्हाडी मिळाले । जैसे आले तैसे गेले
एक येती एक जाती । नाना कौतुक पाहती
रामीरामदास म्हणे । संसारासी येणें जाणें

५५

एकीकडे आहे जन । एकीकडे ते सज्जन
पुढें विवेकें वर्तावें । मागें मूळ सांभाळावें
उदंड जाला समुदाय । तरि आदि सांडूं नये
रामीरामदास म्हणे । जनीं मान्य हें बोलणें

५६

प्रपंच सांडुनियां बुद्धी । जडली परमार्थउपाधि
मना होईं सावचित्त । त्याग करणें उचित
संप्रदाय समुदाव । तेणें जडे अहंभाव
रामदास म्हणे नेमें । भिक्षा मागणें उत्तम

५७

नको ओळखीचे जन । आंगीं जडे अभिमान
आतां तेथें जावें मना । जेथें कोणी ओळखेना
लोक म्हणती कोण आहे । पुसों जातां सांगों नये
रामदास म्हणे पाहीं । तेथें कांहीं चिंता नाहीं

५८

आम्ही मोक्षलक्ष्मीवंत । भवदरिद्र कैंचें तेथ
श्रीपतीचे परिजन । आम्ही स्वानंदसंपन्न
समाधान तें सभाग्य । असमाधान तें अभाग्य
रामीरामदासीं देव । सख्यासहित स्वानुभव

५९

स्नान संध्या टिळेमाळा । पोटीं क्रोधाचा उमाळा
ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसे ओंवळें
नित्य दंडितां हा देहो । परि फिटेना संदेहो
बाह्य केली झळफळ । देहबुद्धीचा विटाळ
नित्यनेम खटाटोप । मनीं विषयाचा जप
रामदासीं दृढभाव । तेणेंविण सर्व वाव

६०

ब्रह्मादिक देव ब्रह्मज्ञानाआड । करिती पवाड विघ्नरूपें
यालागीं सगुणभावें उपासना । करिजे निर्गुणा पावावया
रामीरामदास विश्वासी सगुण । सगुणीं निर्गुण कळों आलें

६१

बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापाशीं
तैसा देव हा दयाळ । करी भक्तांचा सांभाळ
धेनु वत्साचेनि लागें । धांवें त्याचे मागें मागें
पक्षी वेंघतसे गगन । पिलांपाशीं त्याचें मन
मत्स्य आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी
रामीरामदास म्हणे । मायाजाळाचीं लक्षणें

६२

ध्यान करूं जातां मन हरपलें । सगुणी जाहलें गुणातीत
जेथें पाहें तेथें राघवाचें ठाण । करीं चाप बाण शोभतसे
रामरूपीं दृष्टि जाऊनी बैसली । सुखें सुखावली न्याहाळीतां
रामदास म्हणे लांचावलें मन । जेथें तेथें ध्यान दिसतसे

६३

गजेंद्र सावजें धरिला पानेडीं । रामें तेथें उडी टाकियेली
प्रह्लाद गांजिला तया कोण सोडी । रामें तेथें उडी टाकियेली
तेहतिस कोटि देव पडिले बांदोडीं । रामें तेथें उडी टाकियेली
दासा पायीं पडली देहबुद्धीबेडी । रामें तेथें उडी टाकियेली
रामदास म्हणे कां करिसी वणवण । रामें भक्त कोण उपेक्षिले

६४

सोयरे जिवलग मुरडती जेथूनी । राम तये स्थानीं जिवलग
जीवांतील जीव स्वजन राघव । माझा अंतर्भाव सर्व जाणे
अनन्यशरण जावें तया एका । रामदासरंकाचिया स्वामी

६५

शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज
जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण
शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ
आम्हां तोचि तो रक्षिता । रामदासीं नाहीं चिंता

६६

हरि माझें जीवींचें जीवन । हरि माझें मनींचें मोहन
हरि माझें सर्व तनुमन । हरि वर देव पुरातन

हरि मज अंतरीं भरला । भरोनियां उदंड उरला
सकळ देहधारकीं पुरला । सेखीं आपेंआपचि मुरला

आपणचि उंच नीच जाला । आपणचि तो भला शोभला
कितीएक वोळला क्षोभला । जगदंतरीं तो भला लाभला

तोचि एक गातो तो ऐकतो । वाजवितो तोचि तो नाचतो
तिन्ही लोक कोण वर्तवितो । आपणांसि आपण स्तवितो

दास म्हणे हें एक नवल । खोल तरी खोलाहूनि खोल
परोपरी बोलवितो बोल । तयावीण सर्वकांहीं फोल

६७

ठकाराचें ठाण करीं चापबाण । माझें ब्रह्मज्ञान ऐसें आहे
रामरूपीं देहो जाला निःसंदेहो । माझे मनीं राहो सर्वकाळ
मुखीं रामनाम चित्तीं घनश्याम । होतसे विश्राम आठवीतां
रामदास म्हणे रामरूपावरी । भावें मुक्ति चारी ओंवाळीन

६८

कल्पनेचा प्रांत तो माझा एकांत । तेथें मी निवांत बैसईन
बैसईन सुखरूप क्षणएक । पाहीन विवेक राघवाचा
स्वरूप रामाचें अत्यंत कोमळ । जेथें नाहीं मळ माईकांचा
माईकांचा मळ जाय तत्क्षणीं । रामदरुशणीं रामदास

६९

रामेविण देश तो जाण विदेश । विदेशाचा देश राम करी
राम भेटे ज्यासी तो नव्हे विदेशी । सर्व देश त्यासी आपुलेचि
आपुलेचि देश या रामाकरितां । होय सार्थकता जेथें तेथें
जेथें तेथें राम देखतां विश्राम । संसारींचा श्रम आठवेना
आठवेना तेथें आठव विसर । दास निरंतर जैसा तैसा

७०

भगवंताचे भक्तीसाठीं । थोर करावी आटाटी
स्वेदबिंदु आले जाण । तेंचि भागीरथीचें स्नान
सकळ लोकांचें भाषण । देवासाठीं संभाषण
जें जें हरपलें सांडलें । देवाविण कोठें गेलें
जठराग्नीस अवदान । लोक म्हणती भोजन
एकवीस सहस्त्र जप । होतो न करितां साक्षेप
दास म्हणे मोठें चोज । देव सहजीं सहज

७१

वेधें भेदावें अंतर । भक्ति घडे तदनंतर
मनासारिखें चालावें । हेत जाणोनि बोलावें
जनीं आवडीचे जन । त्याचे होताती सज्जन
दास म्हणे निवडावे । लोक जाणोनियां घ्यावे

७२

केला काशी विश्वेश्वर । सेतुबंध रामेश्वर
तरी संशय तुटेना । पूर्वगुण पालटेना
भागीरथी गोदावरी । केली कृष्णा आणि कावेरी
राम अयोध्येचा पति । केली कृष्ण द्वारावती

बद्रि ओढ्याजगन्नाथ । केला स्वामी त्रिमलनाथ
मातापुर तुळजापूर । सप्तशृंगी कोल्हापूर
केली पंढरी नरहरि । शंभु पाहिला शिखरीं
मोरेश्वर भुलेश्वर । ज्वालामुखी हरेश्वर
सिद्ध मैराळ मारुति । देव केले नेणों किती
बारा लिंगें यांवेगळीं । तीर्थे केलीं भूमंडळीं
रामदास म्हणे भावें । आपुलें मन आटोपावें

७३

रामभक्तीविण अणु नाहीं सार । साराचेंहि सार रामनाम
कल्पनाविस्तारु होतसे संहारु । आम्हां कल्पतरू चाड नाहीं
कामनेलागुनी विटलासे मनु । तेथें कामधेनु कोण काज
चिंता नाहीं मनीं राम गातां गुणीं । तेथें चिंतामणी कोण पुसे
रामदास म्हणे रामभक्तीविणें । जाणावें हें उणें सर्वकांहीं

७४

ऐसें आत्मज्ञान उद्धरी जगासी । पाहेना तयासी काय करूं
सर्व काळ गेला दारिद्र्य भोगितां । वैराग्य पाहतां तेथें नाहीं
दारिद्र्याचें दुःख केलें देशधडी । रामराज्यगुढी उभविली
उभविली गुढी भक्तिपंथें जावें । शीघ्रचि पावावें समाधान
समाधान रामीं रामदासा जालें । सार्थकानें केलें सार्थकचि

७५

कौल जाला रघुनाथाचा । मेळा मिळाला संतांचा
अहंभाव वरपेकरी । बळें घातला बाहेरी
क्षेत्रीं मंत्री विवेक जाला । क्रोध देशोधडी केला
काम देहींच कोंडिला । लोभ दंभ नागविला

८३

एकदां जेवितां नव्हे समाधान । प्रतिदिनीं अन्न खाणें लागे
तैसें निरूपण केलेंचि करावें । परी न धरावे उदासीन
प्रत्यहीं हा देहो पाहावा लागतो । शुद्ध करावा तो रात्रंदिस
प्रत्यहीं देहानें भोगिलें भोगावें । त्यागिलें त्यागावें दास म्हणे

८४

कथानिरूपणें समाधि लागली । वासना त्यागिली अंतरींची
नाहीं आपपर कीर्तनीं तत्पर । मनीं सारासार विचारणा
अर्थारूढ मन श्रवण मनन । होय समाधान निजध्यास
रामीरामदासीं कथेची आवडी । लागलीसे गोडी नीच नवी

८५

राघवाची कथा पतितपावन । गाती भक्तजन आवडीनें
राघवाच्या गुणा न दिसे तुळणा । कैलासींचा राणा लांचावला
देवांचें मंडण भक्तांचें भूषण । धर्मसंरक्षण राम एक
रामदास म्हणे धन्य त्यांचें जिणें । कथानिरूपणें जन्म गेला

८६

काय गावें रे काय गावें । आम्हां नाहीं सर्व ठावें
बोधमृदंग फुटका । टाळ भक्तीचा तुटका
दास वेडे रे बागडे । नृत्य करिती देवापुढें
रामभेटीचा समय । रामदासीं गातां नये

८७

त्याचे पाय हो नमावे । त्याचें कीर्तन ऐकावें
दुजियासी सांगे कथा । आपण वर्ते त्याचि पथा
कीर्तनाचें न करी मोल । जैसे अमृताचे बोल
सन्मानितां नाहीं सुख । अपमानितां नाहीं दुःख
ऐसा तोचि हरिदास । लटकें न वदे रामदास

८८

मुक्तपणें करी नामाचा अव्हेरु । तरी तो गव्हारु मुक्त नव्हे
उच्चारितो शिव तेथें किती जीव । बापुडे मानव देहधारी
रामनाम वाचें रूप अभ्यंतरीं । धन्य तो संसारीं दास म्हणे

८९

आत्मज्ञानी आहे भला । आणि संशय उठिला
त्यास नामचि कारण । नामें शोकनिवारण
नाना दोष केले जनीं । अनुताप आला मनीं
रामीरामदास म्हणे । जया स्वहित करणें

९०

रात्रंदिस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें
कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हेंचि दोन्ही
दोन्ही नको धरूं नको निंदा करूं । तेणें हा संसारु तरशील
तरशील भवसागरीं न बुडतां । सत्य या अनंताचेनि नामें
नामरूपातीत जाणावा अनंत । दास म्हणे संतसंग धरा

९१

लोभा नवसांचा तो देव बद्धांचा । आणि मुमुक्षांचा गुरु देव
गुरु देव जाण तया मुमुक्षांचा । देव साधकांचा निरंजन
निरंजन देव साधकांचे मनीं । सिद्ध समाधानी देवरूप
देवरूप जाला संदेह तुटला । तोचि एक भला भूमंडळीं
भूमंडळीं रामदास्य धन्य आहे । अनन्यता पाहें शोधूनियां

९२

राम कैसा आहे हें आधीं पहावें । मग सुखेनावें दास्य करूं
दास्य करूं जन देव ओळखोन । जालें ब्रह्मज्ञान दास्य कैंचें
दास्य कैंचें घडी देवासी नेणतां । वाउगें शिणतां श्रम उरे
समाधान देव पाहतां घडेल । येर विघडेल दास म्हणे

९३

जो जो भजनासी लागला । तो तो रामदास जाला
दासपण रामीं वाव । रामपणा कैंचा ठाव
रामीं राम तोहि दास । भेद नाहीं त्या आम्हांस
रामदास्य करूनि पाहे । सर्व सृष्टि चालताहे
प्राणिमात्र रामदास । रामदासीं हा विश्वास

९४

दिनानाथाचे सेवक । आम्ही स्वामींहूनि अधिक
शरणागत राघवाचे । परि शरण दारिद्र्याचे
जें जें देवासी दुःसह । तें तें आम्हां सुखावह
रामीरामदास म्हणे । रामकृपेचेनि गुणें

९५

दासाची संपत्ति राम सीतापति । जीवाचा सांगाती राम एक
राम एक माता राम एक पिता । राम सर्व भ्राता सहोदरु
सहोदरु विद्या वैभव कांचन । सर्वही स्वजन राम एक
राम एक ज्ञान राम एक ध्यान । रामें समाधान रामदासीं

९६

राघवाचे दास सर्वस्वें उदास । तोडी आशापाश देवराणा
देवराणा भाग्यें जालियां कैंपक्षी । नाना परी रक्षी सेवकासी
सेवकासी कांहीं न लगे साधन । करीतो पावन ब्रीदासाठीं
ब्रीदासाठीं भक्त तारिले अपार । आतां वारंवार किती सांगों
किती सांगों देव पतितपावन । करावें भजन दास म्हणे

९७

कायावाचामनें यथार्थ रामीं मिळणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य
कामक्रोध खंडणें मदमत्सर दंडणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य
परस्त्रीनपुंसक होणें परद्रव्यें पोळणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य
जैसें मुखें बोलणें तैसी क्रिया चालणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य
रामदास म्हणे निर्गुण सुख लाधणें । तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य

९८

आमुचे वंशीं आत्माराम । एका पिंडींचे निष्काम
रामदास्य आलें हातां । अवघा वंश धन्य आतां
बापें केली उपार्जना । आम्ही लाधलों त्या धना
बंधु अभिलाषा टेकला । वांटा घेउनि भिन्न जाला
रामीरामदासीं स्थिति । पाहिली वडिलांची रीति

९९

मनुष्याची आशा तेचि पै निराशा । एका जगदीशावांचूनियां
वांचूनियां राम सर्वहि विराम । नव्हे पूर्ण काम रामेंविण
संकटींचा सखा निजांचा सांगाती । राम आदि अंतीं रामदासीं

१००

आम्हां ये प्रपंचीं कोणी नाहीं सखा । एका रघुनायकावांचोनिया
विद्या वैभव धन मज कृपणाचें । जीवन जीवाचें आत्मारामु
आकाश अवचितें जरि कोसळेल । मज तेथें राखील आत्मारामु
आपंगिलें मज श्रीरामसमर्थें । ब्रह्मांड पालथें घालूं शके
वक्रदृष्टि पाहतां भरिल त्याचा घोंट । काळाचेंहि पोट फाडूं शके
रामदास म्हणे मी शरणागत त्याचा । आधार सकळांचा मुक्त केला

१०१

जठरीं लागो क्षुधा । होत नाना आपदा
भक्तिप्रेम सदा न सोडीं सत्य

शब्द न फुटे जरी । चिंतीन अंतरीं
भक्तिप्रेम परी न सोडीं सत्य

आतांचि हा देहो । राहो अथवा जावो
रामीं प्रेमभावो न सोडीं सत्य

म्हणे रामदास । वरी पडो आकाश
राघवाची कांस न सोडीं सत्य

१०२

रूप रामाचें पाहतां । मग कैंची रे भिन्नता
दृश्य अदृश्यावेगळा । राम जीवींचा जिव्हाळा
वेगळीक पाहतां कांहीं । पाहतां मुळींच रे नाहीं
रामदासीं राम होणें । तेथें कैचें रे देखणें

१०३

करीं घेतां नये टाकितां न जाये । ऐसें रूप आहे राघवाचें
राघवाचें रूप पाहतां न दिसे । डोळां भरलेसें सर्वकाळ
सर्वकाळ भेटी कदा नाहीं तुटी । रामदासीं लुटी स्वरूपाची

१०४

माझा स्वामी आहे संकल्पापरता । शब्दीं कैसी आतां स्तुति करूं
स्तुति करूं जातां अंतरला दुरी । मीतूंपणा उरी उरों नेदी
उरों नेदी उरी स्वामीसेवकपण । एकाकीं आपणाऐसें केलें
केलें संघटण कापुरें अग्नीसी । तैसी भिन्नत्वासी उरी नाहीं
उरी नाहीं कदा रामीरामदासा । स्वयें होय ऐसा तोचि धन्य

१०५

कांहीं दिसे अकस्मात । तेथें आलें वाटे भूत
वायां पडावें संदेहीं । मुळीं तेथें कांहीं नाहीं
पुढें देखतां अंधार । तेथें आला वाटे भार
झाडझुडूप देखिलें । तेथें वाटे कोणी आलें
रामदास सांगे खूण । भितों आपणा आपण

१०६

छाया देखूनी आपुली । शंका अंतरीं वाटली
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण
मुखें बोलतां उत्तर । तेथें जालें प्रत्युत्तर
डोळां घालितां अंगुळी । एकाचीं ते दोन जालीं
पोटीं आपण कल्पिलें । तेंची आलेंसें वाटलें
दास म्हणे रे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी

१०७

वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें
कोण धावतसे आड । पाहों जातां जालें झाड
भावितसे अभ्यंतरीं । कोण चाले बरोबरी
शब्दपडसाद ऊठिला । म्हणे कोण रे बोलिला
रामीरामदास म्हणे । ऐसीं शंकेचीं लक्षणें

१०८

शक्ति आहे तों करावें । विश्व कीर्तनें भरावें
पुण्यवंत तो साक्षेपी । आळशी लोकीं महापापी
आपुलाचि घात करी । सदा कठोर वैखरी
माणुस राजी राखों नेणें । त्यास न मानिती शहाणे
गुणें माणूस भोंवतें । अवगुणानें थितें जातें
दास म्हणे भला भला । जेंथें तेथें पवाडला

राम...वाचनालय, ठाणे. स्थळप्रत. ३३
अनुक्रम 2-105 वि:
क्रमांक १०९ नों: दि:

मनोगत जाणे सूत्र । जेथें तेथें जगमित्र
न सांगतां काम करी । ज्ञानें उदंड विवरी
स्तुति कोणाची न करी । प्राणिमात्र लोभ करी
कदा विश्वास मोडीना । कोणी माणूस तोडीना
जनीं बहुतचि साहतो । कीर्तिरूपेंचि राहतो
दास म्हणे नव्हे दुःखी । आपण सुखी लोक सुखी

११०

संतांची आकृति आणवेल युक्ती । कामक्रोधा शांति नये नये
भागवतींचा भाव आणवेल आव । करणीचा स्वभाव नये नये
रामदास म्हणे रामकृपेवांचोनी । वोलाऐसी करणी नये नये

१११

शिंक जांभई खोकला । तितुका काळ व्यर्थ गेला
आतां ऐसें न करावें । नाम जीवीं तें धरावें
श्वास उच्छ्वास निघतो । तितुका काळ व्यर्थ जातो
पात्यांपातें न लगत । तितुकें वय व्यर्थ जात
लागे अवचित उचकी । तितुकें वय काळ लेखी
म्हणे रामीरामदास । होतो आयुष्याचा नाश

११२

कर्ता एक देव तेणें केलें सर्व । तयापाशीं गर्व कामा नये
देह हें देवाचें वित्त कुबेराचें । तेथें या जीवाचें काय आहे
निमित्ताचा धणी केला असे प्राणी । पहातां निर्वाणीं जीव कैंचा
दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित्त नसावें सर्वकाळ

११३

दृढ धरीं मना जानकीजीवना । तेणें समाधाना पावशील
पावशील निज स्वरूप आपुलें । जरी तें घडलें रामदास्य
रामदास्य घडे बहुतां सुकृतें । कांहीं पुण्य होतें पूर्वजांचें

११४

शरण जावें रामराया । पुढती न पाविजे हे काया
जीव जीवांचा आहार । विश्व होतसे काहार
एक शोकें आक्रंदती । तेणें दुजे सुखी होती
दास म्हणे सर्व दुःख । रामाविण कैसें सुख

११५

वासनेची बेडी देहबुद्धि वांकडी । वाजे हुडहूडी ममतेची
वैराग्याचा वन्ही विझोनियां गेला । संचित खायाला पुण्य नाहीं
भक्ति पांघरूण तें माझें सांडलें । मज ओसंडिलें संतजनीं
रामदास म्हणे ऐसियाचें जिणें । सदा दैन्यवाणें रामेंविण

११६

परिचयें जेथें अत्यंत संबंध । तेथें उठे खेद विकल्पाचा
म्हणोनियां मना निस्पृह असावें । सर्वथा नसावें एके ठायीं
सर्वकाळ गेला उद्वेगीं पडतां । कोणे वेळे आतां समाधान
अभ्यंतर पोळे राम विसंभतां । दास म्हणे आतां समाधान

११७

देव पाषाण भाविला । तोचि अंतरीं दाविला
जैसा भाव असे जेथें । तैसा देव वसे तेथें
दृश्य बांधोनियां गळां । देव जाहला निराळा
दास म्हणे भावातीत । होतां प्रगटे अनंत

११८

एक लाभ सीतापती । दुजी संताची संगती
लाभ नाहीं यावेगळा । थोर भक्तीचा सोहळा
हरिकथा निरूपण । सदा श्रवण मनन
दानधर्म आहे सार । दास म्हणे परोपकार

११९

जो कां भगवंताचा दास । त्यानें असावें उदास
सदा श्रवण मनन । आणि इंद्रियदमन
नानापरी बोधुनि जीवा । आपुला परमार्थ करावा
आशा कोणाची न करावी । बुद्धि भगवंतीं लावावी
रामदासीं पूर्णकाम । बुद्धि दिली हे श्रीरामें

१२०

पतित हे जन करावे पावन । तेथें अनुमान करूं नये
करूं नये गुणदोष उठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि जना
बुद्धि लावी जनां त्या नांव सज्ञान । पतितपावन दास म्हणे

१२१

पोट भरावया मांडिले उपास । जाला कासावीस लाभेंविण
ब्रह्म साधावया कर्ममार्गें गेला । तंव कर्में केला कासावीस
सुटका व्हावया बंधनचि केलें । तेणें तें सुटलें केंवि घडे
एक व्यथा एक औषध घेतलें । दास म्हणे जालें तयापरी

१२२

आपुलीं पारखीं सर्व पारखिलीं । नाहीं कामा आलीं रामेंविण
नाथिलेंचि आहे जनाचें साजणें । तणाचें तापणें तयापरी
लोक नाना रंग जाणोनि वोरंग । रामदासीं संग सोडियला

१२३

अर्थेविण पाठ कासया करावें । व्यर्थ कां मरावें घोकुनीयां
घोकुनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहे होउनीयां
होउनीयां अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे

१२४

ज्ञानाचें लक्षण क्रियासंरक्षण । वरी विशेषेण रामनाम
अंतरींचा त्याग विवेकें करावा । बाहेर धरावा अनुताप
ब्रह्मादिकां लाभ ज्ञानाचा दुर्लभ । तो होय सुलभ साधुसंगें
साधुसंगें साधु होइजे आपण । सांगतसे खूण रामदास

१२५

माजीं बांधावा भोपळा । तैसी बांधों नये शिळा
घेऊं येतें तेंचि घ्यावें । येर अवघेंचि सांडावें
विषवल्ली अमरवल्ली । अवघीं देवेंचि निर्मिली
दास म्हणे हरिजन । धन्य जाण ते सज्जन

१२६

भाग्यवंत नर यत्नासी तत्पर । अखंड विचार चाळणेचा
चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा । अखंड शाहाणा तोचि एक
प्रवृत्ति निवृत्ति चाळणा पाहिजे । दास म्हणे कीजे विचारणा

१२७

नमूं रामकृष्णा आदिनारायणा । तुम्ही त्या निर्गुणा दाखवावें
दाखवावें निजस्वरूप आपुलें । दिसेनासें जालें काय करूं
पांडुरंगा देवा अगा महादेवा । तुम्ही मज द्यावा ठाव ब्रह्मीं
ब्रह्मीं ब्रह्मरूप तें मज करावें । रामदास भावें प्रार्थितसे

१२८

सूर्यनारायणा देवा नमस्कार । तुवां निराकार दाखवावें
दाखवुनी द्यावें मज निववावें । चंद्रा तुज भावें प्रार्थितसें
प्रार्थितसें मही आणि अंतरिक्षा । तुम्ही त्या अलक्षा दाखवावें
दाखवावें मज आपोनारायणें । ब्रह्मप्राप्ति जेणें तें करावें
करावें सनाथ अग्नि-प्रभंजनें । नक्षत्रें वरुणें दास म्हणे

१२९

तुम्ही सर्व देव मिळोनी पावावें । मज वेगीं न्यावें परब्रह्मीं
परब्रह्मीं न्यावें संतमहानुभावें । मज या वैभवें चाड नाहीं
चाड नाहीं एका निर्गुणावांचोनी । माझें ध्यानीं मनीं निरंजन
निरंजन माझा मज भेटवावा । तेणें होय जीवा समाधान
समाधान माझें करा गा सर्व हो । तुम्हांसी देव हो विसरेना
विसरेना देह चालतो तोंवरी । बाह्य अभ्यंतरीं दास म्हणे

१३०

चित्त देउनी ऐका रे । पोहणार पडिला धारे
मन मुळाच्या शेंवटें । वाहे जीवन उफराटें
उगमासी संगम जाला । रामदासीं शब्द निवाला

१३१

मन हें विवेकें विशाळ करावें । मग आठवावें परब्रह्म
परब्रह्म मनीं तरीच निवळे । जरी बोधें गळे अहंकार
अहंकार गळे संतांचे संगतीं । मग आदि अंतीं समाधान
समाधान घडे स्वरूपीं राहतां । विवेक पाहतां निःसंगाचा
निःसंगाचा संग सदृढ धरावा । संसार तरावा दास म्हणे

१३२

कल्पनेच्या देवा कल्पनेची पूजा । तेथें कोणी दुजा आढळेना
आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे
आहे तैसें आहे कल्पना न साहे । दास म्हणे पाहे अनुभवें

१३३

विदेशासी जातां देशचि लागला । पुढें सांपडला मायबाप
सर्व देशीं आहे विचारें पाहतां । जाता ना राहता सारिखाची
व्यापुनियां दासा सन्निधचि असे । विचारें विलसे रामदासीं

१३४

मनाहूनि विलक्षण । तेंचि समाधिलक्षण
नलगे पुरूनी घ्यावें । नलगे जीवेंचि मरावें
अवघा वायु आटोपावा । नलगे ब्रह्मांडासी न्यावा
डोळे झांकूनि बैसला । परि तो मनें आटोपिला
नाना साधनीं सायास । मनें केला कासावीस
रामदास म्हणे वर्म । हेंचि मनाचें सुगम

१३५

दृढ होतां अनुसंधान । मन जाहलें उन्मन
होता बोधाचा प्रबोध । जाला शब्दाचा निःशब्द
ज्ञान विज्ञान जाहलें । वृत्ति निवृत्ति पाहिलें
ध्यानधारणेची बुद्धि । जाली सहज समाधि
रामीरामदासीं वाच्य । पुढें जालें अनिर्वाच्य

१३६

ज्ञानेविण जे जे कळा । ते ते जाणावी अवकळा
ऐसें भगवंत बोलिला । चित्त द्यावें त्याच्या बोला
एक ज्ञानचि सार्थक । सर्व कर्म निरर्थक
दास म्हणे ज्ञानेविण । प्राणी जन्मला पाषाण

१३७

कोणें प्रारब्ध निर्मिलें । कोणें संसारीं घातलें
ब्रह्मादिकांचा निर्मिता । कोण आहे त्यापरता
अनंत ब्रह्मांडांच्या माळा । विचित्र भगवंताची कळा
रामदासाचा विवेक । सर्वां घटीं देव एक

१३८

पतित म्हणजे वेगळा पडिला । पावन तो जाला एकरूप
एकरूप देव अरूप ठायींचा । तेथें दुजा कैंचा कोण आहे
कोण आहे दुजा स्वरूपीं पाहतां । विचारें राहतां सुख आहे
सुख आहे मूळ आपुलें शोधितां । मनासी बोधितां रामदास

१३९

करूनि अकर्ते होऊनियां गेले । तेणें पंथें चाले तोचि धन्य
तोचि धन्य जनीं पूर्ण समाधानी । जनीं आणि वनीं सारिखाचि
कळतसे परी अंतर शोधावें । मनासी बोधावें दास म्हणे

१४०

कर्ता तूं नव्हेसी करविता नव्हेसी । जाण निश्चयेंसी आलया रे
चंद्रसूर्यकळा धरा मेघमाळा । जीववीति कळा देवापासीं
देवें केलें अन्न केलें तें जीवन । तेणें पंचप्राण स्थिर जाले
दास म्हणे मना तुज देवें केलें । मग त्वां देखिलें सर्वकांहीं

१४१

गगना लावूं जातां पंक । लिंपे आपुला हस्तक
ऊर्ध्व थुंकतां अंबरीं । फिरोनि पडे तोंडावरी
हृदयस्थासी देतां शिवी । ते परतोनी झोंबे जिवीं
प्रतिबिंबासी जें जें करी । तें आधींच तोंडावरी
रामीरामदासीं बुद्धि । जैसी होय तैसी सिद्धि

१४२

राघवाचे घरीं सदा निरूपण । श्रवण मनन निजध्यास
विचारणा सारासार थोर आहे । अनुभवें पाहें साधका रे
साधका रे साध्य तूंचि तूं आहेसी । रामीरामदासीं समाधान

१४३

स्वस्कंधीं बैसणें आपुलिये छाये । अघटित काय घडों शके
दुजेंवीण सुखें स्वरूप बोलणें । अद्वैतासी उणें येऊं पाहे
सुख आणि दुःख वृत्तीच्या संबंधें । निवृत्तीच्या बोधें द्वंद्व कैंचें
सुखातीत देव पहावा अनंत । दास म्हणे संत वृत्तिशून्य
वृत्तिशून्य संत असोनियां वृत्ति । हे खूण जाणती अनुभवी

१४४

बोलवेना तें बोलावें । चालवेना तेथें जावें
नवल स्वरूपाचा योग । जीवपणाचा वियोग
ह्मातां न ये तेंचि ध्यावें । मनेंवीण आटोपावें
रामदासीं दृढ बुद्धि । होतां सहज समाधि

१४५

माझें मी तूं पण विवेकानें नेलें । देवाजीनें केलें समाधान
आपुल्या सुखाचा मज दिला वांटा । वैकुंठींच्या वाटा कोण धांवे
देवासी नेणतां गेले बहु काळ । सार्थकाची वेळ एकाएकीं
एकाएकीं एक देव सांपडला । थोर लाभ झाला काय सांगों

१४६

योगियांचा देव मज सांपडला । थोर लाभ जाला एकाएकीं
एकाएकीं एक त्रैलोक्यनायक । देखिला सन्मूख चहुंकडे
चहुंकडे देव नित्यनिरंतर । व्यापुनी अंतर समागमें
समागम मज रामाचा जोडला । वियोग हा केला देशधडी
देशधडी केला विवेकें वियोग । रामदासीं योग सर्वकाळ

१४७

भरत गा खंडामाजीं । शरयूतीर गांवो
धर्माचें नगर तेथें । राज्य करी रामरावो
पांगुळा पाय देतो । देवी जानकीचा नाहो
जाईन मी तया ठाया । देवां दुर्लभ ठावो

राघवाचा धर्म जागो । अधर्म रे भागो
अज्ञान निरसुनियां । विज्ञानीं लक्ष लागो

मीपणाचे मोडले पाय । म्हणोनि पांगुळ जालों
तूंपणाची कीर्ति देईं । ऐकुनियां शरण आलों
मी तूं पण निरसीं माझें । भक्तिभितीवरि बैसलों
प्रेमफडकें पसरुनियां । कृपादान मागों आलों

जगीं एक तूंचि दाता । म्हणोनि आलों मागावया
मागणें निरसे जेणें । ऐसे दे गा रामराया
नवविधा दुभतें देईं । भाव हलगा बैसावया
ज्ञानकाठी देईं करीं । वैराग्यवोली पांघराया

तुझे कृपेचा कांबळा । दे मज पांगुळाकारणें
मायामोह हींव वाजे । हें निवारेल जेणें
निष्काम भाकरी देईं । कामनाक्षुधा हरे जेणें
बोधाचें ताक पाजीं । शब्द खुंटे धालेपणें

दासीहातीं देववीसी । तें मी नेघें सर्वथा
द्वैतदान नेघें जाण । दोहीं वेळ आणितां
आपणाऐसें दान देईं । तूं तंव इच्छेचा दाता
अपूर्ण दान नेघें । पूर्ण करीं निष्कामता

रामदास पांगुळासी रामें दिधलिया दान
देणेंचि निरसे जेथें । कैंची घेण्याची खूण
देणें घेणें निरसुनियां । अपूर्ण करीं परिपूर्ण
दाता ना याचकु । तेथें सहजीं सहज संपूर्ण

१४८

राघवाचा धर्म गाजो । कीर्ति अद्भुत माजो
ठाईं ठाईं देवालयें । भक्तमंडळी साजो

शक्ति आहे तोंचि फावे । दोनी लोक साधावे
इहलोक परलोक । शत्रु सर्व रोधावे
संसारींचें दुःख मोठें । हें मी कोणाला सांगों
जन्म गेला तुजवीण । आणिक काय मी मागों

मागता समर्थाचा । तेणें कोणा सांगावें
रामेंवीण कोण दाता । कोणामागें लागावें
रामदास म्हणे देवा । आतां पुरे संसार
असंख्य देणें तुझें । काय देतील नर

१४९

मायाहोळी प्रज्वळली । सृष्टि वेढारें लाविली
होळीमधें खाजें आहे । तें तूं विचारूनि पाहें
उडी अवघ्यांचीच पडे । परि ते हातांसी न चढे
एक आपणची खाती । एक सकळांसि वाटती
रामीरामदासीं होळी । केली संसाराची धुळी

१५०

वदन सुहास्य रसाळ हा राघव । सर्वांगीं तनु सुनीळ हा राघव
मृगनाभी रेखिला टिळा हा राघव । मस्तकीं सुमनमाळा हा राघव
साजिरी वैजयंती हा राघव । पायीं तोडर गर्जती हा राघव
सुंदर लावण्यखाणी हा राघव । उभा कोदंडपाणी हा राघव
सकल जीवांचें जीवन हा राघव । रामदासासि प्रसन्न हा राघव

१५१

कुळ हनुमंताचें । मोठें किराण त्यांचें
भुभुकारें जयाचे । किलकिलाटें

आतां वाटतें जावें । त्याचें सांगाती व्हावें
डोळे भरूनी पहावें । सर्वांग त्यांचें

ऐकोनी हांसाल परी । नये तयांची सरी
विचार जयांसी करी । स्वामी माझा

असंख्य मिळाला मेळा । रामा भोंवता पाळा
पालथें या भूगोळा । घालूं शकती

ऐसी करणी त्यांची । व्यर्थ जिणीं आमुचीं
पाला खाउनी रामाची । शुश्रूषा केली

ऐसे ते रामदास । सर्वस्वें उदास
रामीं जयांचा विश्वास । बाणोनि गेला

१५२

देव वैकुंठींचा । कैपक्षी देवाचा
भार फेडिला भूमीचा । आत्मा सर्वांचा

पाळक प्रजाचा । योगी योगियांचा
राजा सूर्यवंशींचा । तो अयोध्येचा

राम सामर्थ्याचा । कैवारी देवांचा
मेघ वोळला सुखाचा । न्यायनीतीचा

उद्धार अहिल्येचा । एकपत्नीव्रताचा
सत्य बोलणें वाचा । जप शिवाचा

नाथ अनाथांचा । स्वामी हनुमंताचा
सोडविता अंतींचा । रामदासाचा

१५३

कैंवारी हनुमान, आमुचा ।।
पाठीं असतां तो जगजेठी । वरकड काय गुमान
नित्य निरंतर रक्षी नानापरी । धरुनियां अभिमान
द्रोणागिरि करिं घेउनि आला । लक्ष्मणप्राणनिधान
दासानुदासा हा भरंवसा । वहातसे त्याची आण

१५४

माय वोळली माय वोळली । माय वोळली दया कल्लोळली
चळचळी जनीं चळवळी मनीं । आनंदवन भूवनीं वरद जाहली
भडस पुरविते भाग्य भरविते । कीर्ति उरविते वोळलेपणें
मूळ मूळिचें डाळ मूळिचें । फळ मूळिचें प्राप्त जाहलें
रामवरदा दासवरदा । रक्षिते सदा सत्य प्रत्ययें

१५५

घात करा घात करा । घात करा ममतेचा
ममतागुणें खवळे दुणें । राग-सुणें आवरेना
ममता मनीं लागतां झणीं । संतजनीं दुरावली
दास म्हणे बुद्धि हरी । ममता करी देशधडी

१५६

आवडतो प्रिय परि गवसेना ।।
सकळाहुनि प्रिय देह आपुला । तोहि विटे परि आपण विटेना
ज्यावरी धांवती इंद्रिय मन हीं । सर्वंहि दाउनि आपण दिसेना
श्रीगुरुदास्य अनन्य घडे जरि । अनुभव तंतु कधीं तुटेना

१५७

सखियेहो आहेति उदंड वेडे । ऐसे ते सज्जन थोडे
तयाची संगति जोडे । परम भाग्यें

सकळांचें अंतर जाणे । मीपणें हुंबरों नेणें
ऐसियावरून । प्राणसांडण करूं

साहती बोलणें उणें । न पुसतां सांगणें
समचि देखणें उणें । अधिक नाहीं

अभिमान नावडे । धांवती दीनांकडे
तयांचे जे उकरडे । महाल त्यांचे

आपपर नाहीं ज्यासी । पुसतां सांगती त्यासी
ऐकतांचि भाविकांसी । पालट होये

रामीरामदास वास । पाहतो रात्रंदिस
ऐसियाचा सौरस । देईं राघवा

१५८

शहाणें शोधितां नसे । दुष्काळ पडिला असे
तया धुंडितसे मन माझें रे
आहेति थोर थोर । परि नाहीं चतुर
तेथें निरंतर मन माझें रे
भेदिक शाहणे जनीं । सगुण समाधानी
धन्य धन्य ते जनीं कुळखाणी रे
रामीरामदासीं मन । जाहलें उदासीन
ऐसे ते सज्जन पहावया रे

१५९

साधुसंतां मागणें हेंचि आतां । प्रीति लागो गोविंदगुण गातां
वृत्ति शून्य जालीया संसारा । संतांपदीं घेतला आम्हीं थारा
आशा तृष्णा राहिल्या नाहीं कांहीं । देहप्रारब्ध भोगितां भय नाहीं
गाऊं ध्याऊं आठवूं कृष्ण हरी । दास म्हणे सप्रेम निरंतरीं

१६०

पावनभिक्षा दे रे राम । दीनदयाळा दे रे राम
अभेदभक्ति दे रे राम । आत्मनिवेदन दे रे राम
तद्रूपता मज दे रे राम । अर्थारोहण दे रे राम
सज्जनसंगति दे रे राम । अलिप्तपण मज दे रे राम
ब्रह्मानुभव दे रे राम । अनन्य सेवा दे रे राम
मजविण तूं मज दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम

१६१

कोमळ वाचा दे रे राम । विमळ करणी दे रे राम
हितकारक दे रे राम । जनसुखकारक दे रे राम
अंतरपारखी दे रे राम । बहु जनमैत्री दे रे राम
विद्या-वैभव दे रे राम । उदासीनता दे रे राम
मागों नेणें दे रे राम । मज न कळे तें दे रे राम
तुझी आवडी दे रे राम । दास म्हणे मज दे रे राम

१६२

संगित गायन दे रे राम । आलाप गोडी दे रे राम
धात माता दे रे राम । अनेक धाटी दे रे राम
रसाळ मुद्रा दे रे राम । जाड कथा मज दे रे राम
प्रबंध सरळी दे रे राम । शब्द मनोहर दे रे राम
सावधपण मज दे रे राम । बहुत पाठांतर दे रे राम
दास म्हणे रे गुणधामा । उत्तम गुण मज दे रे राम

१६३

अपराध माझा क्षमा करीं रे श्रीरामा

दुर्लभ देह दिधले असतां नाहीं तुझिया प्रेमा
व्यर्थ आयुष्य वेंचुनि विषयीं जन्मुनि मेलों रिकामा

नयनासारिखें दिव्य निधान पावुनियां श्रीरामा
विश्वप्रकाशक तुझें रूपडें न पाहें मेघःशामा

श्रवणें सावध असतां तव गुणकीर्तनिं त्रास आरामा
षड्रसभोजनिं जिव्हे लंपट नेघे तुझिया नामा

घ्राण सुगंध हरुषें नेघे निर्माल्य विश्रामा
करभूषणें तोषुनि नार्चिति तव स्वरूपा गुणग्रामा

मस्तक श्रेष्ठ हें असतां तनुतें न वंदीं पदपद्मा
दास म्हणे तूं करुणार्णव हे सीतालंकृतवामा

१६४

शरण तुज रघुवीरा । हो रामा, गुणगंभीरा
धन्य धन्य दातारा । कृपाळू खरा

जन्मदु:ख सांगतां नये । सांगू मी काय
दूरी करूनि अपाय । केले उपाय

बाळपणापासुनि वेडें । तुज सांकडें
सांगू मी कवणापुढें । जालें एवढें

जीवींचें मनींचें पुरविलें । गोमटें केलें
सर्व साहोनियां नेलें । नाहीं पाहिलें

देवा तूं त्रैलोक्यनाथ । मी रे अनाथ
मज करूनि सनाथ । केलें समर्थ

दास म्हणे तुझ्या अन्नाचा । वाढलों साचा
मज हा संसार कैंचा । सर्व देवाचा

१६५

हे दयाळुवा हे दयाळुवा । हे दयाळुवा स्वामि राघवा
प्रथम कां मला लाविली सवे । मग उपेक्षणें योग्य हें नव्हे
सकळ जाणतां अंतरस्थिति । तरी तुम्हांप्रति काय विनति
दास तुमचा वाट पाहतो । बोलतां नये कंठ दाटतो

१६६

दीनबंधु रे दीनबंधु रे । दीनबंधु रे राम दयासिंधु रे
भिल्लटीफळें भक्तवत्सलें । सर्व सेविलीं दासप्रेमळें
चरणीं उद्धरी दिव्य सुंदरी । शापबंधनें मुक्त जो करी
वेदगर्भ जो शिव चिंतितो । वानरां रिसां गूज सांगतो
राघवीं बिजें रावणानुजें । करुनि पावला निजराज्य जें
पंकजाननें दैत्यभंजनें । दास पाळिले विश्वमोहनें

१६७

धांव रे रामराया । किती अंत पाहसी
प्राणांत मांडला कीं । न ये करुणा कैसी

पाहीन धणीवरी । चरण झाडीन केशीं
नयन शिणले बा । आतां केधवां येसी

मीपण अहंकारें । अंगीं भरला ताठा
विषयकर्दमांत । लाज नाहीं लोळता
चिळस उपजेना । ऐसें जालें बा आतां

मारुतिस्कंधभागीं । शीघ्र बैसोनी यावें
राघवें वैद्यराजें । कृपाऔषध द्यावें
दयेच्या पद्महस्ता । माझे शिरीं ठेवावें

या भवीं रामदास । थोर पावतो व्यथा
कौतुक पाहतोसी । काय जानकीकांता
दयाळा दीनबंधो । भक्तवत्सला आतां

बा. क्र. १०१७ ५

१६८

कंठत नाहीं सुटत नाहीं । पराधीनता भारी
शोक सरेना धीर धरेना । अहंममता दुःखकारी
दास म्हणे तो लोभें शिणतो । राघव हा अपहारी

१६९

कल्याण करीं देवराया । जनहेत विवरीं
तळमळ तळमळ होत चि आहे । हे जन हातीं धरीं
अपराधी जन चुकत गेले । तुझा तूं चि सांवरीं
कठीण त्यावरि कठीण जालें । आतां न दिसे उरी
कोठें जावें काय करावें । आरंभली बोहरी
दास म्हणे आम्हीं केलें पावलों । दयेसि नाहीं सरी

१७०

रामा हो जय रामा हो । पतितपावन पूर्णकामा हो
नाथा हो दिनानाथा हो । तुमचे चरणीं राहो माथा हो
बंधु हो दिन बंधु हो । रामदास म्हणे दयासिंधु हो

१७१

जैसें बेकारपण । जातसे कठिण
तैसा भजनाविण । परमार्थ जाण

मोलमजुरी करी । कष्टें पोट भरी
नित्य भजन करी । तयाचे परी

कथा निरूपण । न करी आपण
दास म्हणे प्रमाण । मानितो कोण

१७२

जिवींची जीवनकळा सहसा न धरी माइक माळा वो
नादबिंदु कळा त्याहीवरती जिची लीळा वो
तारी दीन जनांला शम विषम दुःखानळा वो
हरी निर्भ्रममंडळा दावी निजात्मसुखसोहळा वो

योग्यांची माउली ऐक्यपणेंविण वेगळी वो
सर्वरूपीं संचली पाहतां देहबुद्धि वेगळी वो
नवचे हे वर्णिली परादि वाचा पारुषली वो
अभिन्नभाव भली दासें नयनेविण देखिली वो

१७३

रे मानवा उगीच आमुचीं जिणीं । आम्हा ध्यानीं भेटीची शिराणी

नरापरिस वान्नर भले । जिहीं डोळां राम देखियेले
ज्यासी रघुराज हितगुज बोले । कोण्या भाग्यें भगवंत भेटले

रामीं मिनले ते असो नीच याती । त्यांच्या चरणांची वंदीन माती
नित्य नव्हाळी गाउनि करूं किती । तेणें रघुनाथीं उपजेल प्रीती

रामीरामदास म्हणे ऐका करूं । यारे आम्ही तैसाचि भाव धरूं
भक्तिप्रेमाचा दाऊं निर्धारू । तेणें आम्हां भेटेल रघुवीरू

१७४

पूर्ण ब्रह्म होय गे । वर्णू मी आतां काय गे
नंद ज्याचा बाप त्याची । यशोदा ती माय गे

क्षीरसागरवासी गे । लक्ष्मी त्याची दासी गे
अर्जुनाचे घोडे धुतां । लाज नाहीं त्यासी गे

अनाथाचा नाथ गे । त्याला कैसी जात गे
चोखामेळ्यासंगें जेवी । दही दूध भात गे

नंदाचा जो नंद गे । सर्व सुखाचा कंद गे
रामदास प्रेमें गाय । नित्य ज्याचा छंद गे

१७५

वय थोडें ठाकेना तीर्थाटन । बुद्धि थोडी घडेना पारायण
एका भावें भजावा नारयण । पुढें सहजचि सार्थकाचा क्षण

दास म्हणे भजनपंथ सोपा । हळुहळू पावसी पद बापा
कष्ट करुनी कासया देसि धांपा । रामकृपेनें अनुभव सोपा

१७६

रामाची करणी । अशी ही ।।
पहा दशगुणें आवरणोदकीं । तारियली धरणी
सुरवर पन्नग निर्मुनियां जग । नांदवी लोक तिन्ही
रात्रीं सुधाकर तारा उगवती । दिवसां तो तरणी
सत्तामात्रें वर्षति जलधर । पीक पिके धरणी
रामदास म्हणे आपण निर्गुण । नांदे हृदयभुवनीं

१७७

कृपा पाहिजे । राघव कृपा पाहिजे
मन उदासिन इंद्रियदमन । तरिच लाहिजे
निंदक जनीं समाधानी । तरिच राहिजे
दास निरंतर नीच उत्तर । तरिच साहिजे

१७८

नामचि कारण रे । महाभय नामें निवारण रे

नामें होय चित्त शुद्धि । नामें होय दृढ बुद्धि
नामें महा दोष जाती । पुढें संतांची संगति
रामदास सांगे खूण । नाम सिद्धांचें साधन

१७९

श्रीगुरुचें चरणकंज हृदयीं स्मरावें

निगमनिखिल साधारण । सुलभाहुनि सुलभ बहू
इतर योग याग विषमपथीं कां शिरावें

नरतनु दृढ नावेसी । बुडवुनि अति मूढपणें
दुष्ट नष्ट सुकर-कुकर तनू कां फिरावें

रामदास विनवि तुज । अझुनि तरी समज उमज
विषयवीष सेवुनियां फुकट कां मरावें

१८०

त्रिविध तापहारक हे गुरुपाय । भवसिंधूसि तारक हे गुरुपाय
स्वात्मसुखाचें बीज हे गुरुपाय । ज्ञानाचें निजगुज हे गुरुपाय
भक्तिपंथासि लाविती हे गुरुपाय । नयनीं श्रीराम दाविती हे गुरुपाय
सहज शांतीचें आगर हे गुरुपाय । पूर्ण कृपेचे सागर हे गुरुपाय
रामदासाचें जीवन हे गुरुपाय । सकल जीवासी पावन हे गुरुपाय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८१०५ वि: ३७०२
क्रमांक १८१ १६०१ नों: दि: 

आतां तरी जाय जाय जाय । धरिं सद्‌गुरुचे पाय
संकल्प विकल्प सोडुनि राहें । दृढ धरूनियां पाय पाय पाय
नामस्मरण ज्या मुखीं नाहीं । त्याणें वांचुनी काय काय काय
मानवतनु ही नये मागुती । बरें विचारुनि पाहें पाहें पाहें
आत्मानात्म विचार न करितां । व्यर्थ प्रसवली माय माय माय
सहस्र अन्याय जरी त्वां केले । कृपा करिल गुरुमाय माय माय
रामदास म्हणे नामस्मरणें । भिक्षा मागुनि खाय खाय खाय

१८२

करीं सीताराम मंत्र । होईल देह तुझा पवित्र
वरकड भिंतीवरील चित्र । कां भुललासी

कां रे बैसलास निश्चळ । करिशिल अनर्थास मूळ
सांडुनी विश्रांतीचें स्थळ । कां भुललासी

मुख्य असूं द्यावी दया । नाहींतर सर्व हि जाईल वायां
मिठी घाली रामराया । कां भुललासी

करिशील डोळयाचा अंधार । पाहें जनासी निर्वैर
सांडीं धन संपत्तीचें वारें । कां भुललासी

रामदासाचें जीवन । तूं कां न करिसी साधन
राम तोडिल भवबंधन । कां भुललासी

१८३

सुखदायक गायक नेमक साधक तो असावा
हरिभक्त विरक्त संयुक्त विवेकी तो भजावा

१८४

प्रपंच दुःखाचा द्रुम । वाढला चुंबित व्योम
तेथें पाहती संभ्रम । सुखाचीं फळें

सदा फळ आभासे । पाड लागला दिसे
परि तो निष्फळ भासे । पाहतां देठीं

तयावरी दोनी पक्षी । एक उदास उपेक्षी
येर तो सर्वत्र भक्षी । परि न धाये

सेवितां तयाची छाया । तापली परम काया
तरी ही बैसती निवाया । आत्मरूप प्राणी

रामीं रामदासी लक्ष । तोचि जाला कल्पवृक्ष
सेवी सज्जन दक्ष । स्वलाभें पूर्ण

१८५

ज्ञान पवाड पवाड गगनाहुनि वाड ।
मुक्ति जाड रे जाड रे अत्यंतचि जाड
भक्ति गोड रे गोड रे मुक्तिहुनी गोड ।
पुरे कोड रे कोड रे नाहीं अवघड

दास म्हणे रे म्हणे रे दास्यत्व करावें ।
भक्तियोगें रे योगें रे जन उद्धरावे
दया देवाची देवाची सर्वत्रीं पुरावें ।
वृत्ति संमंधें संमंधें कांहींच नुगवें

१८६

नाना पिकाची भोय । वाहिल्याविण जाय
शोधिल्याविण उपाय । व्यर्थचि होय

नाना औषधें घेतो । पथ्य न करितो
तैसा वचनें करितो । परि वर्तेना तो

रामदास म्हणे । भीकचि मागणें
आणि वैभव सांगणें । तैसें बोलणें

१८७

जना जन पाळिताहे
वृद्धा बाळपण बाळा वृद्धपण । अंतर शोधुनि पाहें
श्रेष्ठ कनिष्ठां कनिष्ठ श्रेष्ठां । उसिणें फिटत जाय
जग जगाचें जीवन साचें । कर्ता तो करिताहे
एका पाळितो पाळुनि घेतो । दोंहिकडे फिरताहे
अंतरवासी देव विलासी । दास समजत राहे

१८८

लागली बत्ती । ती कशि रे विझवूं पाहाती

बत्ती लागली दारूला । दारूसगट बुधला गेला
धूर अस्मानीं दाटला । नये तो पुढती

बत्ती लागली तोफेला । पुढें धणीच उभा केला
काय भीड त्या तोफेला । उडउनि देती

बत्ति लाविली कर्पूरा । ज्योतिस्वरूप भरला सारा
आला मुळिचीया घरा । न राहे रती

ऐसी सद्‌गुरु माउली । दासा बत्ती लाउन दिधली
निज वस्तु ते दाविली । स्वयंभु ज्योति

१८९

कोण मी मज कळतचि नाहीं । सारासार विचारुनि पाहीं
नर म्हणों तरि नारिचि भासे । नारि म्हणों तरि समूळ विनासे
दास म्हणों तरि रामचि आहे । राम म्हणों तरि नाम न साहे

१९०

काय पाहों मी आतां । रूप न दिसे पाहतां
खूण न ये सांगतां रे रामा

दृश्य पाहतां डोळां । वाटतो सोहळा
त्याहूनि तूं निराळा रे रामा

ज्ञान हातासी आलें । त्याचें विज्ञान जालें
तेंहि नाहीं राहिलें रे रामा

दासें घेतली आळी । पावावें ये काळीं
सगुणरूपें सांभाळीं रे रामा

१९१

चालत नाहीं बोलत नाहीं । हालत नाहीं तो निरंजन
दिसत नाहीं भासत नाहीं । नासत नाहीं तो निरंजन
करीत नाहीं धरीत नाहीं । हरीत नाहीं तो निरंजन
नामचि नाहीं रूपचि नाहीं । चंचळ नाहीं तो निरंजन
निर्मळ जो तो निश्चळ जो तो । दासचि होतो तो निरंजन

१९२

देखिला रे देव देखिला रे । ज्ञानें भक्तीचा रस चाखिला रे

विश्वामध्यें विस्तारला । भावें भक्तांसी पावला
भक्तीलागीं लांचावला । भक्तां पद देतसे

जगामध्यें आहे ईश । म्हणोनि बोलिजे जगदीश
जयाचेनि सुंदर वेश । नाना रूपें शोभती

जनीं श्रोता वक्ता होतो । तोचि देखतो चाखतो
वृत्ती सकळांच्या राखतो । मनीं मन घालुनी

ज्ञानी ज्ञानें विवरला एक त्रैलोक्यीं पुरला
धन्य धन्य तो एकला । नाना देह चाळवी

सर्व करितो दिसेना । एके ठायीं हि वसेना
जवळीच निरसेना । दास म्हणे तो गे तो

१९३

सर्वां अंतरीं आत्माराम । विश्रामधाम
मध्यें आडवा आला भ्रम । देह संभ्रम
यम नियम दम । नित्य प्राणायाम
आगमनिगम । संतसमागम
ठायीं पडेना वर्म । उभें राहिलें कर्म
सदा नित्य नेम । वाची सहस्रनाम
दास म्हणे राम । आहे पूर्ण काम

१९४

संसारीं संतोष वाटला । देव भेटला, मोठा आनंदु जाला
सुखसागर उचंबळे । जळ तुंबळे, दुःखसिंधु निमाला

सेवकासी ज्ञान दीधलें । काम साधलें, देवदर्शन जालें
आत्मशास्त्रगुरुप्रत्ययें । शुद्ध निश्चयें, ऐसें प्रत्यया आलें

देवचि सकळ चालवी । देह हालवी, अखंडिताची भेटी
उत्तम सांचला संयोग । नाहीं वियोग, अवघ्या जन्माशेंवटीं

दास म्हणे दास्य फळलें । सर्व कळलें, ज्ञानें सार्थक जालें
सार्थकचि जन्म जाला । मानवी भला, परलोकासी नेला

१९५

होतें वैकुंठींचे कोनीं । शिरले अयोध्याभुवनीं
लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय

जातां कौशिकराउळीं । अवलोकिली भयंकाळीं
ताटिका ते छळूनि मेली । तेंचि भूत०

मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी
पाषाणाची जाली नारी । तेंचि भूत०

जनकाचे रंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें
वैदेहीअंगीं संचरलें । तेंचि भूत०

जेणें सहस्त्रार्जुन वधिला । तोहि तात्काळचि भ्याला
धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि भूत०

पितयाचे भाकेसी । कैकेयीचें वचनासी
पाळूनि गेलें अरण्यासी । तेंचि भूत०

चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी
सांगातीं भुजंग पोसी । तेंचि भूत०

सुग्रीवाचें पालन । वालीचें निर्दालन
तारी पाण्यावरी पाषाण । तेंचि भूत०

रक्षी भक्त बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण
तोडी अमरांचें बंधन । तेंचि भूत०

वामांगीं स्त्रियेसी धरिलें । धांवूनि शरयूतीरा आलें
तेथें भरतासी भेटलें । तेंचि भूत०

सर्व भूतांचें हृदय । नांव त्याचें रामराय
रामदास नित्य गाय । तेंचि भूत गे माय

१९६

पळा पळा ब्रह्मपिसा येतो जवळी
रामनामें हांक देउनी डोई कांडोळी

वृत्तिसेंडी बंधनेंविण सदा मोकळी
संसाराची धुळी करुनि आंगीं उधळी

प्रपंच उकरड्यावरी बैसणें ज्याचें
भोंता पाळा फिरोनि पाहे जन हे अविद्येचे

धाउनि बैसे उठोनि पळे दृश्य वाटतें
अदृश्याचें राहणें घेतां नचलें कवणाचें

आर्ते भेटों येती त्यांस वेड लावितो
रामींरामदास ऐसें अबद्ध बोलतो

१९७

आम्ही काय कुणाचें खातों । श्रीराम आम्हांला देतो

बांधिले घुमट किल्याचे तट । तयाला फुटती पिंपळवट
नाहीं विहीर आणी मोट । बुडाला पाणी कोण पाजीतो

खडक फोडितां सजिव रोडकी । पाहिली सर्वांनीं बेडकी
सिंधु नसतां तिये मुखीं । पाणी कोण पाजीतो

नसतां पाण्याचे बुडबुडे । सदासर्वदा गगन कोरडें
दास म्हणे जीवन चहुंकडे । घालुनी सडे पीक उगवीतो

१९८

आम्हां तुम्हां मुळीं जाली नाहीं तुटी
तुटीविण भेटी इच्छितसां

सर्वकाळ तुम्ही आम्ही एके स्थळीं
वायां मृगजळीं बुडों नये

जवळीच आहे नका धरूं दुरी
बाह्य अभ्यंतरीं असोनीयां

लावूं नये भेद मायिकसंबंधीं
रामदासीं बोधीं भेटी जाली

१९९

माझी काया गेली खरें । मी तों आहें सर्वांतरें
ऐका स्वहित उत्तरें । सांगईन

राहा देहाच्या विसरें । वर्तो नका वाईट बरें
तेणें भक्तिमुक्तिचीं द्वारें । चोजवती

बुद्धि करावी स्वाधीन । मग हें मजूर आहे मन
हेंचि करावें साधन । दास म्हणे

२००

**सदा सर्वदा योग तूझा घडावा**
**तुझे कारणीं देह माझा पडावा**
**उपेक्षूं नको गूणवंता अनंता**
**रघूनायका मागणें हें चि आतां ।**

# बोध-बिंदु

# बोध-बिंदु
## अनुक्रमणिका


| दशक | ओवी | ओवी संख्या |
|---|---|---|
| १ | १ ते २० | २० |
| २ | २१ ते ३२ | १२ |
| ३ | ३३ ते ४३ | ११ |
| ४ | ४४ ते ७० | २७ |
| ५ | ७१ ते १०४ | ३४ |
| ६ | १०५ ते १५५ | ५१ |
| ७ | १५६ ते १९५ | ४० |
| ८ | १९६ ते २२७ | ३२ |
| ९ | २२८ ते २४८ | २१ |
| १० | २४९ ते २६३ | १५ |
| ११ | २६४ ते २८८ | २५ |
| १२ | २८९ ते ३३३ | ४५ |
| १३ | ३३४ ते ३४३ | १० |
| १४ | ३४४ ते ३६० | १७ |
| १५ | ३६१ ते ३७७ | १७ |
| १६ | ३७८ ते ३८३ | ६ |
| १७ | ३८४ ते ३९९ | १६ |
| १८ | ४०० ते ४२२ | २३ |
| १९ | ४२३ ते ४६५ | ४३ |
| २० | ४६६ ते ५०० | ३५ |
| | | ५०० |

# बोध-बिंदु

## दशक पहिला

१

भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव
ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं

२

श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ
तुटे संशयाचें मूळ । येकसरां

३

तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें
म्हणौन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें

४

स्तवन भजन भक्तिभाव । मायेवांचून नाहीं ठाव
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती

५

सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं
तैसा गुरुदास संदेहीं । पडों चि नेणे सर्वथा

६

सद्गुरूसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु
कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी

७

म्हणोनि सद्‌गुरु वर्णवेना । हे गे हे चि माझी वर्णना
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती

८

वस्तूसी वर्णिलें नवचे । तें चि स्वरूप संतांचें
या कारणें वचनाचें । कार्य नाहीं

९

मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत
जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले

१०

जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर
ज्ञातेपणें दृष्टीसमोर । ब्रह्मांड न ये

११

जे अखंड सावधान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान
सर्वकाळ निराभिमान । आत्मज्ञानी

१२

जेथें श्रवणाचा उपाये । आणि परमार्थसमुदाये
तेथें जनासी तरणोपाये । सहज चि होये

१३

नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार
वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये

१४

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी
या परमार्थाची सरी । कोणांस द्यावी

१५

अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरी च परमार्थ घडे
मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी

१६

जेणें परमार्थ ओळखिला । तेणें जन्म सार्थक केला
येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें

१७

भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें
पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ति करूनी

१८

या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले

१९

नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन
परंतु हा परोपकारीं झिजवून । कीर्तिरूपें उरवावा

२०

देह परमार्थीं लाविलें । तरी च याचें सार्थक जालें
नाहीं तरी हें व्यर्थ चि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें

## दशक दुसरा

२१

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा

२२

नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें

२३

ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक
सदा सन्निध विवेक । तो सत्त्वगुण

२४

सकळांचा आला वीट । परमार्थीं जो निकट
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्त्वगुण

२५

विषयीं धांवे वासना । परी तो कदा डळमळीना
ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्त्वगुण

२६

पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे आपण
समुद्राऐसी सांठवण । तो सत्त्वगुण

२७

नीच उत्तर साहणें । प्रत्योत्तर न देणें
आला क्रोध सांवरणें । तो सत्त्वगुण

२८

परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख
वैराग्य देखोन हरिख । मानी तो सत्त्वगुण

२९

बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार
पुण्यमार्गाचा विस्तार । बळें चि करावा,

३०

विरक्तें येकदेसी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें
विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी

३१

रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपले अवगुण
स्वहित आपलें आपण । नेणें तो एक पढतमूर्ख

३२

परममूर्खांमाजीं मूर्ख । जो संसारीं मानी सुख
या संसारदु:खाऐसें दु:ख । आणीक नाहीं

## दशक तिसरा

३३

जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे
धन्य ते चि दैवाचे । भाविक जन

३४

जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्राचा

३५

दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे
तयाचें सूत्र असे । आपणा च पासीं

३६

आयुष्य हे चि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं
ईश्वरीं अर्पूनियां लुटी । आनंदाची करावी

३७

धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैराश
तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी

३८

जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा
जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षै

३९

कर्मयोगें सकळ मिळालीं । एके स्थळीं जन्मास आलीं
तें तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा

४०

जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें

४१

जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे

४२

सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन
त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी

४३

जयास वाटे सुख चि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें
स्वजन सकळ हि त्यागावे । दुःखमूळ जे

## दशक चौथा

४४

आपुलिया सुखस्वार्था । केली च करावी हरिकथा
हरिकथेविण सर्वथा । राहों चि नये

४५

नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंत चि करावा
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा

४६

नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें

४७

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये

४८

संपत्ति अथवा विपत्ति । जैसी पडेल काळगति
नामस्मरणाची स्थिति । सांडूं च नये

४९

चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर
जड मूढ पैलपार । पावती नामें ।।

५०

काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें
सद्भावें भगवंत आर्चनें । या नांव आर्चनभक्ति

५१

जें जें आपणांस पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे
येणें प्रकारें कीजे । मानस-पूजा

५२

जेथें दिसती विशेष गुण । तें सद्‌गुरूचें अधिष्ठान
या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें

५३

साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली
सुगम पंथें नेऊन घाली । जेथील तेथें

५४

देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडों चि नेदावें
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें

५५

वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं
अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें

५६

देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तें हि वेंचावें

५७

सांडून आपली संसारवेथा । करीत जावी देवाची चिंता
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्या चि सांगाव्या

५८

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तो हि वेंचावा

५९

आपुलें आवघें चि जावें । परी देवासीं सख्य राहावें
ऐसी प्रीती जिवेंभावें । भगवंतीं लागावी

६०

देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे

६१

देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्व हि
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसी च नसे

६२

आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें
ऐसीं नव्हेत किं लक्षणें । सख्यभक्तीचीं

६३

देवाचें जें मनोगत । तें चि आपुलें उचित
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं

६४

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण
करावें तत्त्वविवरण । म्हणजे कळे

६५

भक्त म्हणजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे
विचारेंविण कांहीं च नव्हे । समाधान

६६

तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं

६७

मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्त्वझाडा
विचार करितां उघडा । आपण नाहीं

६८

तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे
आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहज चि झालें

६९

एक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें

७०

आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती

## दशक पांचवा

७१

जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान
तैसें सद्गुरुवचनें ज्ञान- । प्रकाश होये

७२

विघडले देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत
तया देवभक्तां एकांत । करी तो सद्गुरु

७३

फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार
तो चि गुरु माहेर । अनाथांचें

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २०१०६ वि: ७७
क्रमांक ७४१५०) नों: दि: १२।२।६

जें वेदांचे अभ्यंतरीं । तें काढून अपत्यापरी
शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें

७५

निःशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत
अवघ्यांवेगळें मत । अक्षै ज्याचें

७६

अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा
तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती

७७

सिद्धि आणि सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें
तेणें बेंचाड बळकावलें । देहबुद्धीचें

७८

सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख
कामनेसारिखें दुःख । आणिक कांहीं च नाहीं

७९

अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन
तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती

८०

नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार
कर्मेविण अनाचार । भ्रष्ट होती

८१

जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघें चि करणें लागे
पीक आलियां हि उगें । राहों चि नये

८२

तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें
एक वेळ उदंड जेविलें । तऱ्ही सामग्री पाहिजे

८३

येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्‌गुरूपासीं
सद्‌गुरु पालटी अवगुणासी । नाना यत्नेंकरूनी

८४

जो संसार दु:खें दुखवला । जो त्रिविधतापें पोळला
तो चि अधिकारी जाला । परमार्थविषीं

८५

सद्‌गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा
सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें

८६

लागतां सद्‌गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें
तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे

८७

संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें
ऐसें जाणोन अनहित केलें । ते दु:खी होती स्वयें

८८

असो सकळ कळाप्रविण । विद्यामात्र परिपूर्ण
तरी ते कौशल्यता परी ज्ञान । म्हणों चि नये

८९

जाणावें दुसऱ्याचें जीवींचें । हें ज्ञान वाटे साचें
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे

९०

महावाक्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला
तेथींचा तो विचार चि केला । पाहिजे साधकें

९१

महावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तु चि तत्त्वतां
त्याचा जप करितां वृथा । सीण चि होये

९२

महावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण
शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तु च आहे

९३

छप्पन्न भाषा तितुके ग्रंथ । आदिकरून वेदांत
या इतुकियांचा गहनार्थ । एक चि आहे

९४

ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें

९५

देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा
देहाभिमानें येरझारा । भोगिल्या च भोगी

९६

ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन
जया पुरुषास जें ध्यान । तयासि तें चि प्राप्त

९७

आतां बद्ध तो जाणिज ऐसा । अंधारींचा अंध जैसा
चक्षुविण दाही दिशा । शून्याकार

९८

परमार्थविषईं अज्ञान । प्रपंचाचें उदंड ज्ञान
नेणे स्वयें समाधान । या नांव बद्ध

९९

अहंता सांडूनि दूरी । आपणास निंदी नानापरी
मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्ष

१००

धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी
मननें अर्थांतर काढी । या नांव साधक

१०१

अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास
स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक

१०२

संशयाचें ज्ञान खोटें । संशयाचें वैराग्य पोरटें
संशयाचें भजन वोखटें । निर्फळ होये

१०३

निश्चयेंविण जें बोलणें । तें अवघें चि कंटाळवाणें
बाष्कळ बोलिजे वाचाळपणें । निरर्थक

१०४

म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान
तें चि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसी

## दशक सहावा

१०५

ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तो चि थोर
तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें

१०६

जेणें संसारीं घातलें । आवघें ब्रह्मांड निर्माण केलें
त्यासी नाहीं वोळखिलें । तो चि पतित

१०७

जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी

१०८

जो जनामधें वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे
ज्याचें अंतरीं ज्ञान जागे । तो चि साधु

१०९

एवं पोट भराव्याची विद्या । तयेसी म्हणो नये सद्विद्या
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान

११०

दृष्टीस लागली सवे । जें दिसेल तें चि पाहावें
परंतु गुज तें जाणावें । गोप्य आहे

१११

गुप्त तें चि प्रगटवावें । असाध्य तें चि साधावें
कानडें चि अभ्यासावें । सावकास

११२

बांधली आहे तों गांठोडी । जो कोणी विचारें सोडी
विचार पाहातां ही गांठोडी । आडळेना

११३

देहेबुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला
देहातीत होतां पावला । मोक्षपद

११४

आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां
तुटली मनांतील आशंका । जन्ममृत्याची

११५

उसांमध्यें घेईजे रस । येर तें सांडिजे बाकस
तैसा जगामध्यें जगदीश । विवेकें वोळखावा

११६

तत्त्वझाडा नि:शेष होतां । तेथें निमाली देहअहंता
निर्गुण ब्रह्मीं ऐक्यता । विवेकें जाली

११७

तत्त्वीं वेटाळून घेतला । प्राणी संशयें गुंडाळला
आपणासी आपण भुलला । कोहं म्हणे

११८

तत्त्वीं गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहतां म्हणे सोहं
अनन्य होतां अहं सोहं । मावळलीं

११९

चित्रीं लिहिली सेना । त्यांत कोण थोर कोण साना
हें तुम्ही विचाराना । आपुले ठाईं

१२०

जो जन्मासी येऊन गेला । तो मी थोर म्हणतां च मेला
परी याचा विचार पाहिला । पाहिजे श्रेष्ठीं

१२१

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण
ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद

१२२

अरे या संतांचा महिमा । बोलावया नाहीं सीमा
जयांचेनि जगदात्मा । अंतर चि होये

१२३

इंद्रियाणां मनश्चास्मि । कृष्ण म्हणे मन तो मी
तरी कां आवरावी ऊर्मी । चंचळ मनाची

१२४

ऐसें कृष्ण कां बोलिला । साधनमार्ग दाखविला
खडे मांडूनि सिकविला । ओनामा जेवी

१२५

पाषाणाचा देव केला । एके दिवसीं भंगोन गेला
तेणें भक्त दुखवला । रडे पडे आक्रंदे

१२६

धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडिली

१२७

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें
सारासारविचारें । संतसंगें

१२८

ज्ञानविवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें
तरी मग भजनें चि काय केलें । सांग बापा

१२९

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ
जो समर्थाचा हि समर्थ । देवां सोडविता

१३०

त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं

१३१

मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी
विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे

१३२

करी दुर्जनाचा संव्हार । भक्तजनासी आधार
ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले

१३३

मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघें चि नासोन जातें
कृपा केलियां रघुनाथें । प्रचित येते

१३४

रघुनाथभजनें ज्ञान जालें । रघुनाथभजनें महत्त्व वाढलें
म्हणोनियां तुवां केलें । पाहिजे आधीं

१३५

रघुनाथ स्मरोनि कार्य करावें । तें तत्काळ चि सिद्धि पावे
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं

१३६

कर्ता राम मी नव्हे आपण। ऐसें सगुणनिवेदन
निर्गुणीं तें अनन्य। निर्गुण चि होइजे

१३७

मी कर्ता ऐसें म्हणतां। कांहीं च घडेना सर्वथा
प्रचित पाहसी तरी आतां। सीघ्र चि पाहें

१३८

मी कर्ता ऐसें म्हणसी। तेणें तूं कष्टी होसी
राम कर्ता म्हणतां पावसी। येश कीर्ति प्रताप

१३९

ज्ञानवळें उपासना। आम्ही भक्त जरी मानूं ना
तरी या दोषाच्या पतना। पावों अभक्तपणें

१४०

देहास लागली उपासना। आपण विवेकें उरेना
ऐसी स्थिति सज्जना। अंतरींची

१४१

देखिलें तें सत्य चि मानावें। हें ज्ञात्याचें देखणें नव्हे
जड मूढ अज्ञान जीवें। हें सत्य मानिजे

१४२

देहबुद्धि केली बळकट। आणि ब्रह्म पाहों गेला धीट
तों दृश्यानें रुधिली वाट। परब्रह्माची

१४३

अस्थीचा देहीं मांसाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा
तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख

१४४

दिसेना जें गुप्त धन । तयासि करणें लागे अंजन
गुप्त परमात्मा सज्जन–। संगतीं शोधावा

१४५

संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधी न सांडितां
जनामध्यें सार्थकता । विचारें चि होये

१४६

पुढें जन्मांतरीं होणार । हा तों अवघा च उधार
तैसा नव्हे सारासार । तत्काळ लाभे

१४७

या चि जन्में येणें चि काळें । संसारीं होइजे निराळें
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें

१४८

ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्ध चि पावेल पतन
मिथ्या वदे त्यास आण । उपासनेची

१४९

देहीं च विदेह होणें । करून कांहीं च न करणें
जीवन्मुक्तांचीं लक्षणें । जीवन्मुक्त जाणे

१५०

जें बोलास आकळेना । बोलिल्याविण हि कळेना
जयासी कल्पितां कल्पना । हिंपुटी होये

१५१

सांगतां न ये तें सांगणें । गोडी कळाया गूळ देणें
ऐसें हें सद्गुरुविणें । होणार नाहीं

१५२

अत्यंत विचाराचे बोल । तरी ते माईक फोल
शब्द सबाह्य सखोल । अर्थ चि अवघा

१५३

भुंसाकरितां धान्य निपजे । धान्ये घेऊन भूंस टाकिजे
तैसें शब्द भूंस जाणिजे । अर्थ धान्य

१५४

भूंस सांडून कण घ्यावा । तैसा वाच्यांश त्यजावा
कण लक्ष्यांश लक्षावा । शुद्ध स्वानुभवें

१५५

तुज वाटे हे जागृति । मज जाली अनुभव प्राप्ति
या नांव केवळ भ्रांति । फिटली च नाहीं

## दशक सातवा

१५६

ऐसा सद्गुरु पूर्णपणी । तुटे भेदाची कडसणी
देहविण लोटांगणी । तया प्रभूसी

१५७

निजले असतां च मेले । पुन्हां उपजतां च निजेले
ऐसे आले आणी गेले । बहुत लोक

१५८

निदसुरेपणें चि सैरा । बहुतीं केल्या येरझारा
नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट

१५९

तया कष्टाचें निर्सन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान
म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथ

१६०

या कारणें अद्वैतग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ
पाहावया तो चि समर्थ । जो सर्वांगें श्रोता

१६१

जयाचें चंचळ हृदये । तेणें ग्रंथ सोडूं चि नये
सोडितां अलभ्य होये । अर्थ येथींचा

१६२

वेवसाईं जो मळिण । त्यासी न कळे निरूपण
येथें पाहिजे सावधपण । अतिशयेंसी

१६३

संग सोडावा आपुला । मग पहावें तयाला
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा

१६४

ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोवळें । शूद्राचें ब्रह्म तें वोवळें
ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना

१६५

उंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी
ऐसा भेद तयापासीं । मुळीं च नाहीं

१६६

साधु दिसती वेगळाले । परी तें स्वरूपीं मिळाले
अवघे मिळोन एक चि जाले । देहातीत वस्तु

१६७

हित आहे देहातीत । म्हणोनि निरोपिती संत
देहबुद्धीनें अनहित । हों चि लागे

१६८

सामर्थ्यबळें देहबुद्धि । योगियांसि ते हि बाधी
देहबुद्धीची उपाधि । पैसावों लागे

१६९

कल्पनेचें एक बरें । मोहरितां च मोहरे
स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं

१७०

निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता
निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे

१७१

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहो नेणें ।
अंतरवृत्तीचिये खुणे । अंतरवृत्ति साक्ष

१७२

शुक वामदेव मुक्त झाले । येर हे अवघे चि बुडाले
या वचना विश्वासले । ते पढतमूर्ख

१७३

म्हणसी काष्ठीं लागोन पडिला । तो चि एक मुक्त जाला
शुक तो हि अनुवादला । नाना निरूपणें

१७४

म्हणोनि बोलतां चालतां । निचेष्टित पडिलें नसतां
मुक्ति लाभे सायोज्यता । सद्गुरुबोधें

१७५

मीपणापासून सुटला । तो चि एक मुक्त जाला
मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त

१७६

तें आठवितां विसरिजे । कां तें विसरोनि आठविजे
जाणोनियां नेणिजे । परब्रह्म तें

१७७

मीपण कोणासि च न साहे । तें भगवंतीं कैसेनि साहे
म्हणोनि मीपण सांडून राहे । तो चि समाधानी

१७८

साधन आलें देहाच्या माथां । आपण देह नव्हे सर्वथा
ऐसा करूनि अकर्ता । सहज चि जाला

१७९

देह आपण ऐसें कल्पावें । तरी च साधन त्यागावें
देहातीत असतां स्वभावें । देह कैंचा

१८०

ना तें साधन ना तें देह । आपला आपण निःसंदेह
देहीं च असोन विदेह । स्थिति ऐसी

१८१

साधनेविण ब्रह्म होतां । लागों पाहे देहममता
आळस प्रबळे तत्त्वता । ब्रह्मज्ञानामिसें

१८२

परमार्थमिसें अर्थ जागे । ध्यानमिसें निद्रा लागे
मुक्तिमिसें दोष भोगे । अनर्गळता

१८३

तीर्थां व्रतांची फळश्रुती । पुढें होणार सांगती
तैसें नव्हे हातीचा हातीं । सप्रचित श्रवण

१८४

जेथें नाहीं नित्य श्रवण । तें जाणावें विलक्षण
तेथें साधकें एक क्षण । क्रमूं नये सर्वथा

१८५

जेथें नाहीं श्रवणस्वार्थ । तेथें कैंचा हो परमार्थ
मागें केलें तितुकें वेर्थ । श्रवणेविण होये

१८६

सेविलें चि सेवावें अन्न । घेतलें चि घ्यावें जीवन
तैसें श्रवणमनन । केलें चि करावें

१८७

एक्या ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला
तेणें संशयो चि वाढला । जन्मवरी

१८८

बहुत प्रकारें पाहतां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता
परमार्थास तत्त्वता । तारूं च कीं

१८९

ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती
जेथें नुपजे विरक्ति भक्ति । तो ग्रंथ चि नव्हे

१९०

ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यात्वें निर्विकार
जेथें पडे तें चि सार । पुण्य भूमी

१९१

उत्तरायण तें उत्तम । दक्षिणायन तें अधम
हा संदेहीं वसे भ्रम । साधु तो निःसंदेह

१९२

जनाचें विपरीत मत । अंतीं भेटतो भगवंत
ऐसें कल्पून घात । करिती आपुला स्वयें

१९३

जे कां जीवन्मुक्त ज्ञानी । त्यांचें शरीर पडो रानीं
अथवा पडो स्मशानीं । तरी धन्य जालें

१९४

जो जन्मला च नाहीं ठाईंचा । त्यास मृत्यु येईल कैंचा
विवेकबळें जन्ममृत्यूचा । घोट भरिला जेणें

१९५

तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा
दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शला चि नाहीं

## दशक आठवा

१९६

देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती
तयास चि देव म्हणती । विवेकहीन

१९७

तैसें जग निर्मिलें जेंणें । तो वेगळा पूर्णपणें
एक म्हणती मूर्खपणें । जग तो चि जगदीश

१९८

एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा
तो सर्वांमधें परी निराळा । असोन सर्वी

१९९

देव आला देव गेला । देव उपजला देव मेला
ऐसें बोलतां दुरिताला । काय उणें

२००

माया मिथ्या म्हणतां गेली । हे वार्ता नाहीं ऐकिली
मिथ्या म्हणतां च लागली । समागमें

२०१

सिद्धांचें जें निरूपण । तें साधकांस न मने जाण
पक्व नाहीं अंतःकरण । म्हणोनियां

२०२

अवघी माया विस्तारली । परी हे निःशेष नाथिली
ऐसिया वचनाची खोली । विरुळा जाणे

२०३

महाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें
तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनियां

२०४

मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडीं
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा

२०५

सावध साक्षपी आणि दक्ष । तयास तत्काळ चि मोक्ष
इतरांस तें अलक्ष । लक्षिलें नवचे

२०६

प्रज्ञेविण अर्थ न कळे । विश्वासेंविण वस्तु ना कळे
प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान

२०७

देहाभिमानाचे अंतीं । सहज चि वस्तुप्राप्ती
सत्संगें सद्गति । विलंब चि नाहीं

२०८

सावध साक्षपी विशेष । प्रज्ञावंत आणि विश्वास
तयास साधनीं सायास । करणें चि नलगे

२०९

इतर भाविक साबडे । तयांस हि साधनें मोक्ष जोडे
साधुसंगें तत्काळ उघडे । विवेकदृष्टि

२१०

हा नरदेह पडतां । तो चि पाविजे मागुता
ऐसा विश्वास धरितां । लाज नाहीं

२११

महापूजेचा अंतीं । देवास मस्तक वाहाती
तैसी आहे निकट भक्ति । आत्मनिवेदनाची

२१२

आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ति
तये नांव सायोज्यमुक्ति । सत्य जाणावी

२१३

जो संतांस शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला
मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं

२१४

देहासि होईल अंत । मग मी पावेन अनंत
ऐसें बोलणें निभ्रांत । मानूं चि नये

२१५

शैन्य अवघें चि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें
शैन्य असतां चि राज्य करावें । हें कळेना

२१६

अंतीं मति ते चि गति । ऐसें सर्वत्र बोलती
तुझा अंतीं तुझी प्राप्ती । सहज चि जाली

२१७

चौंदेहाचा अंत । आणि जन्म मुळाचा प्रांत
अंतांप्रांतासी अलिप्त । तो तूं आत्मा

२१८

सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण
जनीं असोन आपण । जनावेगळा

२१९

बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं
सिद्ध लक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें

२२०

राजीं बैसतां अवलिळा । आंगीं बाणे राजकळा
स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती

२२१

एरव्हीं अभ्यास करितां । हातां न चढती सर्वथा
स्वरूपीं राहावें तत्त्वता । स्वरूप होउनी

२२२

अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ति रहावी निर्गुणीं
संतसंगें निरूपणीं । स्थिति बाणे

२२३

सकळ धर्मामधें धर्म । स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म
हें चि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें

२२४

दृश्य अवघें वोलांडिलें । अदृश्य शून्यत्वीं पडिलें
ब्रह्म म्हणोनि मुरडलें । तेथुनी च मागें

२२५

इकडे दृश्य तिकडे देव । मध्यें शून्यत्वाचा ठाव
तयास मंदबुद्धिस्तव । प्राणी ब्रह्म म्हणे

२२६

भिन्नपणें अनुभविलें । तयास शून्य ऐसें वोलिलें
वस्तु लक्षितां अभिन्न जालें । पाहिजे आधीं

२२७

वस्तु आपण चि होणें । ऐसें वस्तूचें पाहणें
निश्चयेंसीं भिन्नपणें । शून्यत्व लाभे

## दशक नववा

२२८

स्वयें मी च आहें ब्रह्म । ऐसा अहंतेचा भ्रम
ऐसिये सूक्ष्मीं सूक्ष्म । पाहतां दिसे

२२९

सर्व विमल दोनी पक्ष । वाच्यांशीं आटती प्रत्यक्ष
लक्ष्यांशीं लावितां लक्ष । पक्षपात घडे

२३०

करावें तत्त्वविवरण । शोधावें ब्रह्म निर्गुण
पहावें आपणास आपण । म्हणजे कळे

२३१

हें न बोलतां च विवरिजे । विवरोन विरोन राहिजे
मग अबोलणें चि साजे । महापुरुषीं

२३२

योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें
महाचतुर तो चतुरें । वोळखावा

२३३

जळोन काष्ठाचा आकार । अग्नि दिसे काष्ठाकार
परी काष्ठ होईल हा विचार । बोलों च नये

२३४

सुवर्ण नव्हे लोखंड । साधूस जन्म थोतांड
अज्ञान प्राणी जडमूढ । तयास हें उमजेचिना

२३५

न जाणतां कोटीवरी । साधनें केलीं परोपरीं
तरी मोक्षास अधिकारी । होणार नाहीं

२३६

प्रचीतिविण जें बोलणें । तें अवघें चि कंटाळवाणें
तोंड पसरून जैसें सुणें । रडोन गेलें

२३७

जयास जैसें भासलें । तेणें तैसें कवित्व केलें
परी हें पाहिजे निवडिलें । प्रचीतीनें

२३८

ये प्रकृतीचा निरास । विवेकें वारावा सावकास
मग परमात्मा परेश । अनन्यभावें भजावा

२३९

स्वयें आपण जेविला । त्यास वाटे लोक धाला
परंतु हें समस्तांला । घडलें पाहिजे

२४०

मोकळा म्हणे नाहीं बंधन । आणि प्रत्यक्ष बंदीं पडिले जन
त्यांचें कैसें समाधान । तें तुम्ही पहा

२४१

कांहीं च नेणिजे तें अज्ञान । सकळ जाणिजे तें ज्ञान
जाणीव राहतां विज्ञान । स्वयें चि आत्मा

२४२

आपण विवेकें विशाळला । मर्यादेवेगळा जाला
मग ब्रह्मगोळ देखिला । वटबीजन्यायें

२४३

आपण भ्रमें लहानाळला । केवळ देहधारी जाला
तरी मग ब्रह्मांड त्याला । कवळेल कैसें

२४४

सिद्धास आणि साधन । हा तों अवघा च अनुमान
मुक्तास आणि बंधन । आडळेना

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक ... वि: ... नों. दि: ...

२४५

साधनें जें कांहीं साधावें । तें तों आपण चि स्वभावें
आतां साधकाच्या नावें । शून्याकार

२४६

कुल्लाळ पावला राजपदवी । आतां रासभें कासया राखावीं
कुल्लाळपणाची उठाठेवी । कासया पाहिजे

२४७

वेदें वेदाज्ञेनें चालावें । सच्छास्त्रें शास्त्र अभ्यासावें
तीर्थें तीर्थास जावें । कोण्या प्रकारें

२४८

साध्यें करावें साधनासी । ध्येयें धरावें ध्यानासी
उन्मनें आवरावें मनासी । कोण्या प्रकारें

## दशक दहावा

२४९

सर्प जाणोन डंखूं आला । प्राणी जाणोन पळाला
दोहींकडे जाणिवेला । बरें पहा

२५०

जाणीवरूपें अंत:करण । सकळांचें एक हें प्रमाण
जीवमात्रास जाणपण । एक चि असे

२५१

ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगें चि चाले
कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनियां

२५२

सांडील सगुणभजनासी । तरी तो ज्ञाता परी अपेसी
म्हणोनियां सगुणभजनासी । सांडूं चि नये

२५३

नि:काम बुद्धीचिया भजना । त्रैलोक्यीं नाहीं तुळणा
समर्थेंविण घडेना । नि:काम भजन

२५४

कामनेनें फळ घडे । नि:काम भजनें भगवंत जोडे
फळभगवंता कोणीकडे । महदांतर

२५५

नाना फळें देवापासीं । आणि फळ अंतरी भगवंतासी
याकारणें परमेश्वरासी । नि:काम भजावें

२५६

भक्तें जें मनीं धरावें । तें देवें आपण चि करावें
तेथें वेगळें भावावें । नलगे कदा

२५७

दोनी सामर्थ्यें एक होतां । काळास नाटोपे सर्वथा
तेथें इतरांची कोण कथा । कीटकन्यायें

२५८

विचार न करितां जें जें केलें । तें तें वाउगें वेर्थ गेलें
म्हणोनि विचारीं प्रवर्तलें । पाहिजे आधीं

२५९

विचार पाहेल तो पुरुष । विचार न पाहे तो पशु
ऐसीं वचनें सर्वेशु । ठाईं ठाईं बोलिला

२६०

श्रवण मनन निजध्यास । प्रचीतीनें बाणतां विश्वास
रोकडा साक्षात्कार सायास । करणें चि नलगे

२६१

सत्याएवढें सुकृत नाहीं । असत्याएवढें पाप नाहीं
प्रचीतिविण कोठें चि नाहीं । समाधान

२६२

वेष वरीवरी केला । परी अंतरीं दोष भरला
त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान पाहिजे

२६३

आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा
दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली

## दशक अकरावा

२६४

पाहे निश्चळाचा विवेक । ऐसा लक्षांमधें एक
निश्चळाऐसा निश्चयात्मक । निश्चळ चि तो

२६५

देव जाले उदंड । देवांचें मांडलें भंड
भूतादेवतांचें थोतांड । एक चि जालें

२६६

मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला
जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर

२६७

असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन
म्हणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती

२६८

क्षीर नीर निवडिती । ते राजहंस बोलिजेती
सारासार जाणती । ते महानभाव

२६९

अरे जो चंचळास ध्याईल । तो सहज चि चळेल
जो निश्चळास भजेल । तो निश्चळ चि

२७०

प्रकृतिसारिखें चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें
सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें

२७१

ऐक सदेवपणाचें लक्षण । रीकामा जाऊं नेदी एक क्षण
प्रपंचवेवसायाचें ज्ञान । बरें पाहे

२७२

आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें
मूळ तुटे उद्वेगाचें । येणें रीतीं

२७३

प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचिकर्ण
महावाक्याचें विवरण । करितां सुटे

२७४

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण
तिसरें तें सावधपण । सर्वविषयीं

२७५

चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना आक्षप
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे

२७६

दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी

२७७

दु:ख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटून घ्यावें
बरें वाईट सोसावें । समुदायाचें

२७८

राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें
परपीडेवरी नसावें । अंत:करण

२७९

आहे तरी सर्वांठाई । पाहों जातां कोठें चि नाहीं
जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाई । गुप्त जाला

२८०

ऐसा पुरुष धारणेचा । तो चि आधार बहुतांचा
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा

२८१

एक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमास गेले
उगमदर्शनें पवित्र जाले । तीर्थरूप

२८२

आरे हें पाहिलें च पाहावें । विवरलें चि मागुतें विवरावें
वाचिलें चि वाचावें । पुन:पुन्हां

२८३

देहसंगें विषय भोगिले । देहसंगें प्राणी मिरवले
देहधर्त्यास चुकले । नवल मोठें

२८४

चोविसनामी सहस्रनामी । अनंतनामी तो अनामी
तो कैसा आहे अंतर्यामीं । विवेकें वोळखावा

२८५

एक चि जगाचा जिव्हाळा । परी देहलोभाचा आडताळा
देहसंबंधें वेगळा । अभिमान धरी

२८६

अखंड एकांत सेवावा । अभ्यास चि करीत जावा
काळ सार्थक चि करावा । जनासहित

२८७

हें प्रचीतीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीएकें

२८८

महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे
जाणते करून विखरावे । नाना देशीं

## दशक बारावा

२८९

आधीं प्रपंच करावा नेटका । मग घ्यावें परमार्थविवेका
येथें आळस करूं नका । विवेकी हो

२९०

प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा

२९१

पर्णाळी पाहोन उचले । जीवसृष्टि विवेकें चाले
आणि पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावें

२९२

चाळणेचा आळस केला । तरी अवचिता पडेल घाला
ते वेळें सावरायाला । अवकाश कैंचा

२९३

जाणोन पाहिजेत सर्व । हें चि तयाचें अपूर्व
ज्याचें त्यापरी गौरव । राखों जाणे

२९४

लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा जो न करी
तेणेंकरितां बराबरी । होत जाते

२९५

जंवरी चंदन झिजेना । तंव तो सुगंध कळेना
चंदन आणि वृक्ष नाना । सगट होती

२९६

जनीं जनार्दन वोळला । तरी काये उणें तयाला
राजी राखावें सकळांला । कठिण आहे

२९७

हें आवघें आपणांपासीं । येथें बोल नाहीं जनासी
शिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणा

२९८

खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला
तरी मौनें चि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें

२९९

पतितपावनाचे दास । ते हि पावन करिती जगास
ऐसी हे प्रचीत मनास । बहुतांच्या आली

३००

विवेकेंविण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें
अवघें वेर्थ चि गेलें । दोहींकडे

३०१

कां वेर्थ चि ज्ञान बडबडिला । परी वैराग्ययोग नाहीं घडला
जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे

३०२

विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला
अंतरर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी

३०३

आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिति बाणली वैराग्याची
यत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं

३०४

विवेकवैराग्य तें ऐसें । नुसतें वैराग्य हेंकाडपिसें
शब्दज्ञान येळिलसें । आपण चि वाटे

३०५

पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघा चि देवाचा
जड आत्मनिवेदनाचा । विचार ऐसा

३०६

चंचळकर्ता तो जगदीश । प्राणीमात्र त्याचा अंश
त्याचा तो चि आपणास । ठाव नाहीं

३०७

चंचळ आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण
कर्ता देव तो आपण । कोठें चि नाहीं

३०८

ठाव चि नाहीं चंचळाचा । तेथें आधीं आपण कैंचा
निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा

३०९

पुस्तकज्ञानें निश्चय धरणें । तरी गुरु कासया करणें
याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्ययें

३१०

वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य
वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे

३११

वैराग्यें करून भ्रष्टेना । ज्ञानें भजन सांडीना
वित्पन्न आणि वाद घेना । ऐसा थोडा

३१२

शबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें
विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं

३१३

प्रवृत्ति चाले अधोमुखें । निवृत्ति धावे ऊर्ध्वमुखें
ऊर्ध्वमुखें नाना सुखें । विवेकी जाणती

३१४

प्रपंचीं असोन परमार्थ पाहे । तो हि ये स्थितीतें लाहे
प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमधें

३१५

जगदीशापरता लाभ नाहीं । कार्यकारण सर्व कांहीं
संसार करीत असतां हि । समाधान

३१६

मागां होते जनकादिक । राज्य करितां हि अनेक
तैसे चि आतां पुण्यश्लोक । कित्येक असती

३१७

ह्राट भरला संसाराचा । नफा पह्रावा देवाचा
तरी च या कष्टाचा । परियाय होतो

३१८

जैसें बोलणें बोलावें । तैसें चि चालणें चालावें
मग महंतलीळा स्वभावें । आंगीं बाणे

३१९

उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी

३२०

घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण

३२१

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे

३२२

तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तें चि ज्ञान जनास सांगावें
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी

३२३

उदंड धि:कारून बोलती । तरी चळोंनेदावी शांति
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु

३२४

बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें
आत्मवत् परावें तें । मानीत जावें

३२५

कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें
तरी मग वाईट बोलावें तें । काये निमित्त

३२६

आपणास चिमोटा घेतला । तेणें कासाविस जाला
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें

३२७

पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें
तरी मग कर्कश बोलावें तें । काये निमित्त

३२८

आपण अवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें
या कारणें भजनास लावावे । बहुत लोक

३२९

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मगावें शिष्यासी
आपणामागें जगदीशासी । भजत जावें

३३०

याकारणें समुदाव । जाला पाहिजे मोहोछाव
ह्यातोह्यातीं देवाधिदेव । वोळेसा करावा

३३१

आतां समुदायाकारणें । पाहिजेती दोनी लक्षणें
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें

३३२

जेणें बहुतांस घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति
बहुतांचें मनोगत ह्यातीं । घेतलें पाहिजे

३३३

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं

## दशक तेरावा

३३४

ज्ञान आणि उपासना । दोनी एक चि पाहाना
उपासनेकरितां जना । जगोद्धार

३३५

संगत्यागेंविण कांहीं । परब्रह्म होणार नाहीं
संगत्याग करून पाहीं । मौन्यगर्भा

३३६

जाणतां जाणतां जाणीव जाते । आपली वृत्ति तद्रूप होते
आत्मनिवेदन भक्ति ते । ऐसी आहे

३३७

एक शीत चांचपावें । म्हणजे वर्म पडे ठावें
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें

३३८

विचारें प्रकृति संहारे । दृश्य असतां च ओसरे
अंतरात्मा निर्गुणीं संचरे । अध्यात्म-श्रवणें

३३९

चढता अर्थ लागला । तरी अंतरात्मा चढत चि गेला
उतरल्या अर्थें उतरला । भूमंडळीं

३४०

सर्व सांडूनि शोधा मजला । ऐसें देव चि बोलिला
लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा

३४१

म्हणोनि नाना दुःखें भोगिती । सर्वकाळ कष्टी होती
मनीं सुख चि इच्छिती । परी तें कैचें

३४२

मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें
तैसें जनास शिकवावें । हळूहळू

३४३

वेड्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये
तरी च घडे दिग्विजये । निःस्पृहासी

## दशक चौदावा

३४४

नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या

३४५

निःस्पृहें अवघें चि करावें । परी आपण तेथें न सांपडावें
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी

३४६

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा
ॐ भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे

३४७

भक्तिहीन जें कवित्व । तें चि जाणावें ठोंबें मत
आवडीहीन जें वग्तृत्व । कंटाळवाणें

३४८

जया अंतरीं भगवंत । अचळ राहिला निवांत
तो स्वभावें जें बोलत । तें ब्रह्मनिरूपण

३४९

निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें
दोहीकडे अभिमानें । वोस केलें

३५०

छप्पन्न भाषा नाना कळा । कंठमाधुर्य कोकिळा
परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती

३५१

श्रीहरिविण जे कळा । ते चि जाणावी अवकळा
देवास सांडून वेगळा ; प्रत्यक्ष पडिला

३५२

सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न
तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें

३५३

जनास दिसे हा दुश्चित । परी तो आहे सावचित
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं

३५४

संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला
तेणें जन पावन केला । आपणाऐसा

३५५

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे
तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं

३५६

नयनें चि पहावा नयन । मनें शोधावें मन
तैसा चि हा भगवान । सकळां घटीं

३५७

ध्यान देवाचें करावें । किंवा देवाल्याचें करावें
हें चि बरें विवरावें । आपले ठाईं

३५८

देह देऊळ आतमा देव । कोठें धरूं पाहतां भाव
देव वोळखोन जीव । तेथें चि लावावा

३५९

फुटकें मन एकवटिलें । तेणें तुटकें ध्यान केलें
तेथें कोण सार्थक जालें । पहाना कां

३६०

प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोरें फुलें गुंफावी न लगती
कल्पनेची माळ थिटी करिती । काये निमित्त

## दशक पंधरावा

३६१

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा
राहराहों शोध घ्यावा । परांतरांचा

३६२

जो जगदांतरें मिळाला । तो जगदांतर चि जाला
अत्रीं परत्रीं तयाला । काय उणें

३६३

सत्याचा जो साभिमान । तो जाणावा निराभिमान
न्याय अन्याय समान । कदापि नव्हे

३६४

वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये

३६५

खनाळामध्यें जाऊन राहे । तेथें कोणी च न पाहे
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ

३६६

श्वेताश्वेतास गांठी पडतां । मधें कृष्ण मिश्रित होतां
इहलोकसार्थकता । होत आहे

३६७

रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें
डोळेझांकणी करावी ते । कायेनिमित्त

३६८

धके चपेटे सोसावे । नीच शब्द साहत जावे
पस्तावोन परावे । आपले होती

३६९

सकळांवडिल अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा
दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा । अंतरला तया

३७०

तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें

३७१

नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी
या कारणें तोषवावी । कोणीतरी काया

३७२

उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली
न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा

३७३

उपासना सकळां ठाई । आत्माराम कोठें नाहीं
याकारणें ठाईं ठाईं । रामें आटोपिलें

३७४

ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना
नेऊन घाली निरंजना । पैलीकडे

३७५

विवरतां विवरतां सेवटीं । निवृत्तिपदीं अखंड भेटी
जालियानें तुटी । होणार नाहीं

३७६

महावाक्याचा विचारु । तेथें सन्याशास अधिकारु
दैवीकृपेचा जो नरु । तो हि विवरोन पाहे

३७७

संन्यासी म्हणजे षड्न्यासी । विचारवंत सर्व संन्यासी
आपली करणी आपणासी । निश्चयेंसी

## दशक सोळावा

३७८

अगाध गुण भगवंताचे । शेष वर्णूं न शके वाचें
वेदविधि ते हि काचे । देवेंविण

३७९

आत्माराम सकळां पाळी । आवघें त्रैलोक्य सांभाळी
तया एकेविण धुळी । होय सर्वत्रांची

३८०

उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली
याकारणें पाहिजे केली । विचारणा देवाची

३८१

उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेविण निराश्रयो
उदंड केलें तरी तो जयो । प्राप्त नाहीं

३८२

समर्थाची नाहीं पाठी । तयास भलता च कुटी
याकारणें उठाउठी । भजन करावें

३८३

भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास
दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे

## दशक सतरावा

३८४

देहदेउळामधें बैसला । न भजतां मारितो देहाला
म्हणोनि त्याच्या भेणें तयाला । भजती लोक

३८५

चालतीं बोलतीं देउळें । त्यामधें राहिजे राउळें
जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळलीं पाहिजे

३८६

मननशीळ लोकांपाशीं । अखंड देव अहर्निशीं
पाहतां त्यांच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं

३८७

भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी
पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें

३८८

जे सद्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथें चि वसे

३८९

वीट नाहीं कंटाळा नाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं
इतुकी माया कोठें चि नाहीं । मातेवेगळी

३९०

ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें
लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें

३९१

एकांतीं नाजुक कारभार । तेथें असावें अति तत्पर
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं

३९२

गत गोष्टीस ऐकिलें । तेणें काय हातास आलें
म्हणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना कीं

३९३

मायादेवीच्या धांदली । सूक्ष्मीं कोण मन घाली
समजला त्याची तुटली । संदेहवृत्ति

३९४

करून अवघा तत्त्वझाडा । सारासाराचा निवाडा
सावधपणें ग्रंथ सोडा । सुखिनावें

३९५

लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दारिद्रय आधीक सांदे
नवल केलें परमानंदें । परमपुरुषें

३९६

अंतरीं वसतां नारायणें । लक्ष्मीस काय उणें
ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा

३९७

एका योगें सकळ योग । एका योगें सकळ वियोग
विवेकयोगें सकळ प्रयोग । करीत जावे

३९८

एक भरें एक रितें । रितें मागुतें भरतें
भरतें हि रितें होतें । काळांतरीं

३९९

जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव
गुण चि नाहीं गौरव । येईल कैचें

## दशक अठरावा

४००

अरे या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहींएक

४०१

परमेश्वराचे गुणानुवाद । अखंड करावा संवाद
तेणेंकरितां आनंद । उदंड होतो

४०२

जितुकें कांहीं निर्माण जालें । तितुकें जगदेश्वरें निर्मिलें
निर्माण वेगळें केलें । पाहिजे आधीं

४०३

उपासनेचे शेंवटीं । देवा भक्तां अखंड भेटी
अनुभवी जाणेल गोष्टी । प्रत्ययाची

४०४

दुल्लभ शरीरीं दुल्लभ आयुष्य । याचा करूं नये नाश
दास म्हणे सावकास । विवेक पहावा

४०५

अखंड एकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा
प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनीं

४०६

देहे सकळामधें उत्तमु । देहीं राहिला आत्मारामु
सकळां घटीं पुरुषोत्तमु । विवेकी जाणती

४०७

देह ब्रह्मांडाचें फळ । देह दुल्लभ चि केवळ
परी या देहास केवळ । उमजवावें

४०८

आत्म्याकरितां देह जाला । देहाकरितां आत्मा तगला
उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग

४०९

देहावेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना
जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें

४१०

पूज्य पूजेसी अधिकार । उगे चि तोषवावे इतर
दुखवूं नये कोणाचें अंतर । म्हणजे बरें

४११

शब्दरत्नें परीक्षावीं । प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं
येर ते अवघीं सांडावीं । एकीकडे

४१२

नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें
विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारिजे

४१३

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार
जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें

४१४

जनाचा लालची स्वभाव । आरंभीं च म्हणती देव
म्हणजे मला कांहीं देव । ऐसी वासना

४१५

आधीं कष्टाचें दुःख सोशिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती
आधीं आळसें सुखावती । त्यासी पुढें दुःख

४१६

इहलोक अथवा परलोक । दोहींकडे सारखा चि विवेक
दीर्घ सूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे

४१७

आत्मा वर्तवितो शरीर । तो चि देव उत्तरोत्तर
जाणीवरूपें कळिवर । विवेकें वर्तवी

४१८

तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां

४१९

ज्ञाता तत्त्वें सांडून पळाला । तुर्येपैलिकडे गेला
आत्मनिवेदनें जाला । ब्रह्मरूप

४२०

आपणाहून देव थोर । ऐसा जयाँस कळला विचार
सकळ कांहीं जगदांतर । तेहीं राखावें

४२१

बहुत जनांस चालवी । नाना मंडळें हालवी
ऐसी हे समर्थपदवी । विवेकें होते

४२२

विवेक एकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा
लोक आपला आणि परावा । म्हणों चि नये

## दशक एकोणीसावा

४२३

काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी
चटक लाउनी सोडावी । कांहीं एक

४२४

जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र
कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें

४२५

कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें
तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं

४२६

पापाकरितां दरिद्र प्राप्त । दरिद्रें होय पापसंचित
ऐसें चि होत जात । क्षणक्षणा

४२७

भल्याची संगती धरीना । आपणासी शाहणे करीना
तो आपला आपण वैरी जाणा । स्वहित नेणे

४२८

तो परोपकार करितां चि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला
मग काय उणें तयाला । भूमंडळीं

४२९

सकळांसीं नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें
अखंड कोणीएकाचें उणें । पडों चि नेदी

४३०

प्रपंचीं जाणें राजकारण । परमार्थीं साकल्य विवरण
सर्वांमधें उत्तम गुण । त्याचा भोक्ता

४३१

मागें एक पुढें एक । ऐसा कदापी नाहीं दंडक
सर्वत्रांसीं अलोलिक । तया पुरुषाची

४३२

अंतरासी लागेल ढका । ऐसी वर्तणूक करूं नका
जेथें तेथें विवेका । प्रगट करीं

४३३

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहान थोर
तैसा चि करी परोपकार । मनापासुनी

४३४

दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे
आवघे चि सुखी असावे । ऐसी वासना

४३५

उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी
तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष

४३६

जयास कोणाचें सोसेना । जयाची निःकांचन वासना
धीकारिल्यां धीकारेना । तो चि महापुरुष

४३७

मिथ्या शरीर निंदलें । तरी यांचें काय गेलें
ज्ञात्यासी आणि जिंतिलें । देहेबुद्धीनें

४३८

बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार
धीर उदार गंभीर । महापुरुष

४३९

देहे मुळीं च केला वाव । तरी भजनासी कैंचा ठाव
म्हणोनि भजनाचा उपाव । देहात्मयोगें

४४०

मायावल्ली फांपावली । नाना देहफळीं लगडली
मुळींची जाणीव कळों आली । फळामधें

४४१

भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना
मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या

४४२

कर्तुत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पहावें
तरी च कांहींएक पडे ठावें । गोप्यगुह्य

४४३

अखंड हरिकथेचा छंदु । सकळांस लागे नामवेदु
प्रगट जयाचा प्रबोधु । सूर्य जैसा

४४४

उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन
उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं

४४५

कांहीं एक उत्कटेविण । कीर्ति कदापि नव्हे जाण
उगें च वणवण हिंडोन । काय होतें

४४६

आपणास जें जें अनुकूल । तें तें करावें तत्काळ
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा

४४७

विवेकामधें सांपडेना । ऐसें तों कांहीं च असेना
एकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी

४४८

अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहतां काय उणें तेथें
एकांतेविण प्राणीयांतें । बुद्धि कैंची

४४९

एकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा
येथून तेथवरी गोवा । कांहीं च नाहीं

४५०

परलोकीं वास करावा । समुदाव उगा च पहावा
मागण्याचा तगादा न लावावा । कांहीं एक

४५१

जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक
रात्रीदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती

४५२

जो जो लोक दृष्टीस पडला । तो तो नष्ट ऐसा कळला
अवघे च नष्ट एकला भला । कशावरुनी

४५३

सकळ अवगुणांमधें अवगुण । आपले अवगुण वाटती गुण
मोठें पाप करंटपण । चुकेना कीं

४५४

आपणास उपाधी मुळीं च नाहीं । रुणानुबंधें मिळाले सर्व हि
आल्यागेल्याची क्षिति नाहीं । ऐसें जालें पाहिजे

४५५

कांहीं गलबला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ
जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे

४५६

उपाधी कांहीं राहत नाहीं । समाधानाएवढें थोर नाहीं
नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा

४५७

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास
तेणें अखंड सावकाश । एकांत सेवावा

४५८

उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें
अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी

४५९

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपण चि कष्टत गेला । तो चि भला

४६०

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे
सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनी

४६१

जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट
याकारणें ते वाट । बुझून टाकावी

४६२

उपासना करूनियां पुढें । पुरवलें पाहिजे चहुंकडे
भूमंडळीं जिकडे तिकडे । जाणती तया

४६३

जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळूहळू शिकवावें
शाहणे करूनि सोडावे । बहुत जन

४६४

आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें
आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी

४६५

संसार मुळीं च नासका । विवेकें करावा नेटका
नेटका करितां फिका । होत जातो

## दशक वीसावा

४६६

जीव एकदेशी नर । विचारें जाला विश्वंभर
विश्वंभरास संसार । चुकेना कीं

४६७

ज्ञान आणि अज्ञान । वृत्तिरूपें हें समान
निवृत्तिरूपें विज्ञान । जालें पाहिजे

४६८

जिकडे पहावें तिकडे अपार । कोणीकडे नाहीं पार
एकजिनसी स्वतंत्र । दुसरें नाहीं

४६९

परब्रह्माएवढें थोर नाहीं । श्रवणापरतें साधन नाहीं
कळल्याविण कांहीं च नाहीं । समाधान

४७०

पिपीलिकामार्गें हळू हळू घडे। विहंगमें फळासी गांठी पडे
साधक मननीं पवाडे । म्हणजे बरें

४७१

मुळापासून शेवटवरी । विचारणा केली च करी
प्रत्ययाचा निश्चयो अंतरीं । तयासी च फावे

४७२

पृथ्वीमधें बहुत जन । त्यामधें असती सज्जन
परी साधूस वोळखतो कोण । साधुवेगळा

४७३

म्हणोन संसार सांडावा । मग साधूचा शोध घ्यावा
फिरफिरों ठाईं पाडावा । साधुजन

४७४

रात्रंदिवस पहावा अर्थ । अर्थ पाहेल तो समर्थ
परलोकींचा निजस्वार्थ । तेथें चि घडे

४७५

म्हणोन पाहिलें चि पहावें । आणि शोधिलें चि शोधावें
अवघें कळतां स्वभावें । संदेह तुटती

४७६

पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकीं भगवंताचीं घरें
नाना सुखें येणें द्वारें । प्राप्त होती

४७७

त्याचा महिमा कळेल कोणाला । माता वांटून कृपाळु जाला
प्रत्यक्ष जगदीश जगाला । रक्षितसे

४७८

सत्ता पृथ्वीमधें वांटली । जेथें तेथें विभागली
कळेनें सृष्टि चालिली । भगवंताचे

४७९

जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहणें हें चि ध्यान
ध्यान आणि तें ज्ञान । एकरूप

४८०

प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे

४८१

संगती असावी भल्यांची । धाटी कथा निरूपणाची
कांहीं एक मनाची । विश्रांति आहे

४८२

सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे

४८३

कर्ता जगदीश हें तों खरें । परी विभाग आला पृथकाकारें
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना

४८४

नर तो चि नारायण । जरी प्रत्ययें करी श्रवण
मननशीळ अंतःकरण । सर्वकाळ

४८५

जेणें स्वयें चि पोहावें । त्यास कासेस नलगे लागावें
स्वतंत्रपणें शोधावें । सकळ कांहीं

४८६

मिळतां प्रत्ययाचे संत । एकांतापरीस एकांत
केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा

४८७

कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं एक शुद्ध घ्यावें
जाणजाणों निवडावें । सारासार

४८८

अस्थिमांसाचें शरीर । त्यामधें गुणप्रकार
शरीरासारखें यंत्र । आणीक नाहीं

४८९

सकळ करणें ईश्वराला । म्हणोनी भेद निर्माण केला
ऊर्ध्वमुख होतां भेदाला । ठाव कैंचा

४९०

देहसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर
थोर सामर्थ्यें अवतार । बोलिजेती

४९१

ऐसे अनंत भेद आत्मयाचे । सकळ जाणती ऐसे कैंचे
विवरतां विवरतां मनाचे । फडके होती

४९२

ऐसी माझी उपासना । उपासकीं आणावी मना
अगाध महिमा चतुरानना । काय कळे

४९३

आवाहन विसर्जन । हें चि भजनाचें लक्षण
सकळ जाणती सज्जन । मी काय सांगों

४९४

सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें
मानत मानत घालावें । मुळाकडे

४९५

धरूं जातां धरितां न ये । टाकूं जातां टाकितां न ये
जेथें तेथें आहे च आहे । परब्रह्म तें

४९६

जिकडे तिकडे जेथें तेथें । विन्मुख होतां सन्मुख होतें
सन्मुखपण चुकेना तें । कांहीं केल्यां

४९७

जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ
निर्गुणब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें

४९८

भक्तांचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध

४९९

सकळ करणें जगदीशाचें । आणि कवित्व चि काय मानुशाचें
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें

५००

सकळ देहाचा झाडा केला । तत्त्वसमुदाव उडाला
तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें

# मनाचीं शातें

प्रार्थी
अनुक्रम .................... दि: ....................
[illegible] .................... लौ: दि: ....................

# प्रकरणें


| | | |
|---|---|---|
| १. **मंगलाचरण** | श्लोक | १ |

## शतक पहिलें

| | | |
|---|---|---|
| २. सदाचरण | ,, | २ ते २१ |
| ३. ईश्वर-निष्ठा | ,, | २२ ते ४६ |
| ४. भक्त-अभक्त-लक्षण | ,, | ४७ ते ६६ |
| ५. नाम-स्मरण | ,, | ६७ ते १०१ |

## शतक दूसरें

| | | |
|---|---|---|
| ६. कीर्तन-भक्ति | ,, | १०२ ते १३५ |
| ७. सत्य-शोधन | ,, | १३६ ते १७० |
| ८. गुरुकृपा-लब्धि | ,, | १७१ ते २०१ |
| ९. **उपसंहार आणि फलश्रुति** | ,, | २०२ ते २०५ |

## मंगलाचरण

।। श्रीराम ।।

( १ )

# सदाचरण

१. गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा
**मुळारंभ** आरंभ तो **निर्गुणाचा**
नमूं शारदा मूळ **चत्वार वाचा**
गमूं पंथ आनंत **या राघवाचा**

---

१.१ गणेश = गुणेश
सृष्टीचा मुळारंभ, निर्गुणाचा फळारंभ
चत्वार वाचा : संकल्प, भावना, विचार, शब्द
'या' राघवाचा–साक्षात् अपरोक्षात्
१, २६, ६६, ७७, ८८, १९६, १९७

## शतक पहिलें

२. **मना, सज्जना** ! **भक्तिपंथें** चि जावें
* तरी **श्रीहरी** पाविजेतो स्वभावें
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें

३. प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
पुढें वैखरी राम आधीं वदावा
सदाचार हा थोर सांडूं नये तो
जनीं तो चि तो मानवी धन्य होतो

४. मना **वासना** दुष्ट कामा नये रे
मना सर्वथा पापबुद्धि नको रे
मना धर्मता नीति सोडूं नको हो
मना अंतरीं सार वीचार राहो

५. मना पाप**संकल्प** सोडूनि द्यावा
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा
मना **कल्पना** ते नको वीषयांची
विकारें घडे हो जनीं सर्व छी छी

---

मना सज्जना २, ८, २१, २२, ३८–४३, ६६, १२८, १८६
भक्ति-पंथ २, ११५, १८८ * ९०/४
श्रीहरी २, ४७, ८९, ११६, ११८
वासना ४, १३, २१; ५८, ६५, १२७, १२८
संकल्प ५, १३०
कल्पना ५, ४०, ५४, ५८, ५९; ६१, १०४, १०५, १२८, १६४, १७१, १७२, १९०

६ नको रे मना क्रोध हा खेदकारी
नको रे मना काम नाना विकारी
नको रे मना सर्वदा अंगिकारू
नको रे मना मच्छरु दंभ भारू

७ मना **श्रेष्ठ धारिष्ट** जीवीं धरावें
मना बोलणें नीच सोशीत जावें
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें
मना सर्व लोकांसि रे नीववावें

८ देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हे चि क्रीया धरावी
मना चंदनाचे परी त्वां झिजावें
परी अंतरीं.सज्जना नीववावें

९ नको रे मना द्रव्य तें पूढिलांचें
अती **स्वार्थबुद्धी** न रे, पाप सांचें
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें
न होतां मनासारिखें दुःख मोठें

---

श्रेष्ठ धारिष्ट = अहिंसक धैर्य
स्वार्थ बुद्धि—लोभ परिणाम १३.

१० सदा सर्वदा **प्रीति** रामीं धरावी
दुखाची स्वयें सांडि जीवीं करावी
देहेदु:ख हें सूख मानीत जावें
विवेकें सदा सस्वरूपीं भरावें

११ जनीं सर्वसूखी असा कोण आहे
विचारें मना तूं चि शोधून पाहें
मना त्वां चि रे पूर्वसंचीत केलें
तया सारिखें भोगणें प्राप्त झालें

१२ मना मानसीं दु:ख आणूं नको रे
मना सर्वथा शोक चिंता नको रे
* विवेकें देहेबुद्धि सोडून द्यावी
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी

---

प्रीति, प्रेम १०, ४७, ५३, ५५, ५९
प्रिय इ० ६५, १०३, १०६, ११७
श्लोक १० आध्यात्मिक विवेक
,, ११ व्यावहारिक विचार
,, १२ उभय-निगमन
* हा उपदेश येथें भारी वाटतो. उपसंहारांत तो शोभतो.
पहा १९७, २०१ तदनुसार येथें

१३ मना सांग पां रावणा काय झालें
अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं
बळें लागला काळ हा पाठिलागीं

१४ जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला
* परी शेवटीं काळमूखीं निमाला
महा थोर ते मृत्युपंथें चि गेले
कितीएक ते जन्मले आणि मेले

१५ मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी
जितां बोलती सर्व ही जीव मी मी
चिरंजीव हें सर्व ही मानिताती
अकस्मात सांडूनियां सर्व जाती

१६ मरे एक त्याचा दुजा शोक वाहे
अकस्मात तो ही पुढें जात आहे
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें

१७ मनीं मानव व्यर्थ चिंता वहातें
अकस्मात होणार होऊनि जातें
घडे भोगणें सर्व ही कर्मयोगें
मतीमंद तें खेद मानी वियोगें

---

अकस्मात १३, १५, १६, १७ इ० काळ १३, १४, २३, २६, २८ इ०
पूर्व कर्म १४, १७. कर्म खोटें ९, १३७. कर्म साधन ७६, १००.
* २/२

१८ मना राघवेंवीण आशा नको रे
मना मानवाची नको कीर्ति तूं रे
* जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें
तया वर्णितां सर्व ही श्लाघ्यवाणें

१९ मना सर्वथा सत्य सांडूं नको रे
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे
मना सत्य तें सत्य वाचें वदावें
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें

२० बहू हिंपुटी होइजे मायपोटीं
नको रे मना यातना ते चि मोठी
निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं
अधोमूख रे दुःख त्या बाळकासी

२१ मना वासना चूकवीं येरझारा
मना कामना सांडि रे द्रव्यदारा
मना यातना थोर हे गर्भवासीं
मना सज्जना भेटवीं राघवासी

---

* ३९/१
वेद, श्रुति १८, ३२. ३४, ३९, ९०, ९५, १२५, १४८, १५७
पुराण, शास्त्र १५८, १९३
रामाची भेट २१, ५९, ११७, १७०. १८६, २०१
स्वामी २२, २७, ३७, ७८
मौन १८, १९, २३, २४, ४३, ४४
+ १४६/३ ● १४/२ × ७९/२
२३ वा संग्राहक श्लोक, चरण २, ३, ४ = श्लोक २४, २५, २६

## ( २ )
## ईश्वर-निष्ठा

२२ मना सज्जना हीत माझें करावें
रघूनायका दृढ चित्तीं धरावें
महाराज तो स्वामि वायूसुताचा
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा

२३ न बोलें मना राघवेंवीण कांहीं
जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो

२४ रघूनायकावीण वायां सिणावें
जनासारिखें व्यर्थ कां वोसणावें
सदा सर्वदा नाम वाचें वसों दे
अहंता मनीं पापिणी ते नसों दे

२५ मना वीट मानूं नको बोलण्याचा
पुढें मागुता राम जोडेल कैचा
सुखाची घडी लोटतां सूख आहे
\+ पुढें सर्व जाईल कांहीं न राहे

२६ देहेरक्षणाकारणें यत्न केला
● परी शेंवटीं काळ घेऊन गेला
करीं रे मना भक्ति या राघवाची
× पुढें अंतरीं सोडि चिंता भवाची

२७ भवाच्या भयें काय भीतोसि लंडी
धरीं रे मना धीर धाकासि सांडीं
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी

---

टीपा पान १४० वर पहा.

२८ दिनानाथ हा राम कोदंडधारी
पुढें देखतां काळ पोटीं थरारी
जना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

२९ पदीं राघवाचें सदा ब्रीद गाजे
बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे
पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३०* समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३१ महा संकटीं सोडिले देव जेणें
प्रतापें बळें आगळा सर्वगूणें
जयातें स्मरे शैलजा शूळपाणी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३२ अहिल्या शिळा राघवें मुक्त केली
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली
+ जया वर्णितां शीणली वेदवाणी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३३ वसे मेरु मांदार हे सृष्टिलीला
शशी सूर्य तारांगणें मेघमाला
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

---

टीपा पान १४३ वर पहा

३४ उपेक्षा कदा रामरूपीं असेना
जिवां मानवां निश्चयें तो वसेना
शिरीं भार वाहेन बोले पुराणीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३५ असे हो जया अंतरीं भाव जैसा
वसे हो तया अंतरीं देव तैसा
अनन्यास रक्षीतसे चापपाणी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३६ ● सदा सर्वदा देव सन्नीध आहे
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे
सुखानंद आनंद कैवल्य दानी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

३७ सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा
× हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

---

* उदाहरण हनुमान २२, ८७
+ $१\frac{२}{3}५$
श्लोक ३२ अहिंसेसाठीं रामावतार, १२३
श्लोक २८ ते ३३ रामचरित्र, ३४ ते ३७ तत्-सार
● गुरूची दृष्टि. × $१\frac{२}{3}3$

३८ मना प्रार्थना तूजला एक आहे
रघूराज थकीत होऊनि पाहे
अवज्ञा कदा हो यदर्थीं न कीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे

३९ * जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें
जयाचेनि योगें **समाधान** बाणें
तयालागि हें सर्व चांचल्य दीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे

४० मना पाविजे सर्व ही सूख जेथें
अती आदरें ठेविजे लक्ष तेथें
विवेकें कुडी कल्पना पालटीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे

४१ बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं
सिणावें परी नातुडे हीत कांहीं
विचारें बरें अंतरा बोधवीजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे

४२ बहूतांपरीं हें चि आतां धरावें
रघूनायका आपुलेंसें करावें
दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे

---

* ॐ
समाधान ३९, ४५ । १५३, १८३
समाधान. सुख, सौख्य, हित ३९–४१, ४३–४५

४३ मना सज्जना एक जीवीं धरावें
जनीं आपुलें हीत तूंवां करावें
रघूनायकावीण बोलों नको हो
* सदा मानसीं तो निजध्यास राहो

४४ मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी
**कथा** आदरें राघवाची करावी
नसे राम तें धाम सोडून द्यावें
सुखालागिं **आरण्य** सेवीत जावें

४५ जयाचेनि संगें समाधान भंगे
अहंता अकस्मात येऊनि लागे
तये संगतीची जनीं कोण गोडी
जये संगतीनें मती राम सोडी

४६ मना जे **घडी** राघवेवीण गेली
जनीं आपुली ते तुवां हानि केली
× रघूनायकावीण तो **सीण** आहे
जनीं **दक्ष** तो लक्ष लावूनि पाहे

---

श्लोक ४३ ते ४६=२२ ते २५ चा उपसंहार
* ८१/२ × श्लोक २४
कथा कीर्तन ४४, ७७, १०३, १२७
आरण्य ४४, ५४
घडी २३, २५, ४६, १६७
शीण २४, ४१, ४६, ८६
राघवीं वस्ती ३८–४२ वि. जनीं वस्ती ४३–४६ तसें च,
सज्जनीं वस्ती १२८
दक्ष पुरुषाचें लक्षण श्लोक ४६

## ( ३ )

## भक्त-अभक्त-लक्षण

४७ मनीं लोचनीं श्रीहरी तो चि पाहे
जनीं **जाणता** भक्त होऊनि राहे
* गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

४८ सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामें वदे नित्य वाचा
**स्वधर्मे चि चाले** सदा उत्तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

४९ सदा बोलण्यासारिखें चालताहे
अनेकीं सदा एक देवासि पाहे
**सगूणीं भजे** लेश नाहीं भ्रमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५० नसे अंतरीं कामकारी विकारी
उदासीन जो **तापसी** ब्रह्मचारी
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५१ मदें मत्सरें सांडिला स्वार्थबुद्धी
प्रपंचीक नाहीं जयातें **उपाधी**
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

---

जाणता वि. भक्त
* साधनेपेक्षां साधनेचा क्रम महत्त्वाचा
स्वधर्मे चि चाले वि. सदा उत्तमाचा
सगूणीं भजे वि लेश नाहीं भ्रमाचा
तापसी वि. निवाला
निरुपाधिक वि. नम्र

५२ क्रमी वेळ जो **तत्त्वचिंतानुवादें**
न लिपे कदा दंभवादें विवादें
करी सूखसंवाद जो ऊगमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५३ सदा **आर्जवी** प्रीय जो सर्व लोकीं
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५४ **सदा सेवि आरण्य** तारुण्यकाळीं
मिळेना कदा कल्पनेचेन मेळीं
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५५ **नसे मानसीं नष्ट आशा** दुराशा
वसे अंतरीं प्रेमपाशा पिपासा
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

५६ दिनाचा दयाळु मनाचा मवाळु
स्नेहाळु कृपाळु जनीं **दासपाळु**
तया अंतरीं क्रोध संताप कैचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

---

तत्त्वज्ञानी वि. वादरहित
आर्जवी वि. सत्यवादी
एकांतवासी वि. कल्पनामुक्त
नसे नष्ट आशा वि. प्रेम-पिपासा
दासपाळु वि. दास

५७ जगीं होइजे धन्य या रामनामें
क्रिया भक्ति ऊपासना नित्यनेमें
§ उदासीनता तत्त्वता **सार** आहे
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे

५८ नको वासना वीषयीं वृत्तिरूपें
पदार्थीं जडे कामना पूर्वपापें
सदा राम निःकाम चिंतीत जावा
मना कल्पनालेश तो ही नसावा

५९ मना कल्पना कल्पितां कल्पकोटी
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी
मनीं कामना राम नाहीं जयाला
अती आदरें प्रीति नाहीं तयाला

६० मना राम कल्पतरु कामधेनु
निधी सार चिंतामणी काय वानूं
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता
तया साम्यता कायसी कोण आतां

---

सार ५७, ६०, ६३, ६६ इ० § $\frac{५७}{३}$ वि. $\frac{६६}{१}$
श्लोक ५८–६६ यांना उपसंहाराचें स्वरूप आहे.
वाद ५२, ६१, ६३ । १०८–११२, ११५ । १६०
बळें=वादबळें, अहंकारबळें
दैन्यवाणा–अती विषयी ६४, लोभी १३४, दुराशागुणें १६८
* $\frac{१६}{३}$, + $\frac{१८६}{२}$

६१ उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे
तया अंतरीं सर्वदा तें चि आहे
जनीं सज्जनीं **वाद** हा वाढवावा
पुढें मागुता शोक जीवीं धरावा

६२ निजध्यास तो सर्व तुटोनि गेला
बळें अंतरीं शोक संताप ठेला
सुखानंद आनंद भेदें बुडाला
मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला

६३ घरीं कामधेनु पुढें ताक मागे
हरीबोध सांडूनि वेवाद लागे
करीं सार चिंतामणी काचखंडें
तया मागतां देत आहे उदंडें

६४ अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना
अती काम त्या राम चित्तीं असेना
* अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा
अती वीषयी सर्वदा **दैन्यवाणा**

६५ नको दैन्यवाणें जिणें भक्तिऊणें
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें
धरीं रे मना आदरें प्रीति रामीं
नको वासना हेमधामीं विरामीं

६६ नव्हे सार संसार हा घोर आहे
\+ मना सज्जना सत्य शोधूनि पाहें
जनीं वीष खातां पुढें सूख कैचें
करीं रे मना ध्यान या राघवाचें

---

टीपा पान १४८ वर पहा

## ( ४ )

## नाम-स्मरण

६७ घनःश्याम हा राम लावण्यरूपी
महां धीर गंभीर पूर्णप्रतापी
करी संकटीं सेवकाचा कुढावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

६८ बळे आगळा राम कोदंडधारी
महां काळ विक्राळ तो ही थरारी
पुढें मानवा किंकरा कोण केवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

६९ सुखानंदकारी निवारी भयातें
जनीं भक्तिभावें भजावें तयातें
विवेकें त्यजावा **अनाचार हेवा**
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७० सदा रामनामें वदा पूर्णकामें
कदा बाधिजेनापदा नित्यनेमें
**मदालस्य** हा सर्व सोडूनि द्यावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७१ जयाचेनि नामें महादोष जाती
जयाचेनि नामें गती पाविजेती
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

---

रामवर्णन ६७–६९, पहा २८, ३१, ३६.

भक्तिभाव हा सदाचार श्लोक ३, त्या विरुद्ध अनाचार-हेवा ६९

मद, आलस्य नामस्मरणाचे वैरी.

७२ **न वेचे** कदा ग्रंथिचे अर्थ कांहीं
मुखें **नाम** उच्चारितां कष्ट नाहीं
महां घोर संसार शत्रु जिणावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७३ देहेदंडणेचें महां दुःख आहे
महां दुःख तें नाम घेतां न राहे
सदाशीव चिंतीतसे देवदेवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७४ बहूतांपरी संकटें साधनाचीं
व्रतें दान उद्यापनें तें धनाचीं
दिनाचा दयाळु मनीं आठवावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७५ **संमस्तांमधें सार साचार** आहे
कळेना तरी सर्व शोधून पाहें
जिवा संशयो वाउगा तो त्यजावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

७६ नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं
म्हणे दास विश्वास नामीं धरावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

---

न वेचे, फुकाचे ७२, ८८, ९१, ९३ १००
नाम २४,४८,५७, ७०–७३,७६,८१,८२,८३,८६,८८–९०, ९२–१०१
समस्तांमधें सार नाम ७५, ८१
सार साचार ७५, १५२, १७१

७७ +करी **काम** निःकाम या राघवाचें
करी रूप स्वरूप सर्वां जिवाचें
करी छंद निर्द्वंद्व हे गूण गातां
हरीकीर्तनीं वृत्ति**विश्वास** होतां

७८ अहो ज्या नरा राम विश्वास नाहीं
तया **पामरा** बाधिजे सर्व कांहीं
महाराज तो स्वामि कैवल्यदाता
वृथा वाहणें देहसंसार **चिंता**

७९ मना पावना भावना राघवाची
❀धरी अंतरीं सोडि चिंता भवाची
भवाची जिवा मानवा भूलि ठेली
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली

८० ×धरा श्रीवरा त्या हरा-अंतरातें
तरा दुस्तरा त्या परा सागरातें
सरा वीसरा त्या * **भरा दुर्भरातें**
करा नीकरा त्या खरा मत्सरातें

---

काम = कर्म ?
+ वासना-निरसनाची भक्ति-मार्गाची कुशल युक्ति.
विश्वास ७६, ७७, ७८, ८३
पामर ७८, ८२ वि. महाराज ७८, २२.
पोटाची चिंता ७८, ७९, ९३ ‘दुर्भर’ ८०
* भरायला दुर्भर ?
❀ $\frac{२}{४}^{६}$ × $\frac{[illegible]}{२}^{४}$

८१ मना **मत्सरें** नाम सांडूं **नको** हो
* अती **आदरें** हा **निजध्यास** राहो
समस्तांमधें नाम हें सार आहे
दुजी तूळणा तूळितां ही न साहे

८२ **बहू नाम** या रामनामीं तुळेना
**अभाग्या** नरा पामरा हें कळेना
विषा औषध घेतलें पार्वतीशें
जिवा मानवा किंकरा कोण पूसे

८३ जेणें जाळिला काम तो राम ध्यातो
उमेसीं अती आदरें **गूण गातो**
× बहू ■ ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें
परी अंतरीं नामविश्वास तेथें

---

मत्सर–श्रीमंतांचा, सुखी जीवांचा ८०–८१
आदरानें नाम ८१, ८३, ८९, ९१, ९२, ९४ १०१
ध्यास, निजध्यास ४३, ६२, ८१, ८४
बहुनाम–भाराभर शब्दकीं अन्य देवता नाम ?
अभाग्य की अभागी ? ८२, १३९
* ४३/४ × २०५/३
गुण-गान ७७, ८३
■ ज्ञान अज्ञान मिळून १८ वेळां हा शब्द आला पैकीं हें एक च स्थळ पूर्वार्धांत.

८४ विठोनें शिरीं वाहिला **देवराणा**
तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी
जिवा सोडवी राम हा अंतकाळीं

८५ भजा राम विश्राम योगेश्वरांचा
जपू नेमिला नेम गौरीहराचा
स्वयें नीववीं तापसी चंद्रमौळी
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं

८६ मुखीं राम विश्राम तेथें चि आहे
**सदानंद** आनंद सेवूनि राहे
तयावीण तो सीण संदेहकारी
**निजधाम** हें नाम शोकापहारी

८७ मुखीं राम त्या काम बांधूं शकेना
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना
हरीभक्त तो शक्त कामास मारी
जगीं धन्य तो मारुति ब्रह्मचारी

८८ बहू चांगलें नाम या राघवाचें
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें
**जिवां मानवां** हें चि कैवल्य साचें

---

देवराणा–शंकर, ज्ञान-वैराग्य-साधन संपन्न
सदानन्द–सदा + आनन्द, सत् + आनन्द ?
निजधाम–विश्रामधाम. जिवां=जीवंतपणीं
हरि ३७, ६३, ७७, ८७, ८९, ९०, ९२, ९८, १०३, १३३, १६५
श्रीहरि २. ४७, ८९, ११६, ११८
जिवां मानवा ७९, ८२, ८८ इ०

८९ जनीं भोजनीं नाम वाचे वदावें
अती आदरें गद्यघोषें म्हणावें
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें
* तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें

९० न ये राम वाणी तया थोर हाणी
जनीं व्यर्थ प्राणी तया नाम काणी
हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं
बहू आगळें बोलिली व्यासवाणी

९१ नको वीट मानूं रघूनायकाचा
अती आदरें बोलिजे राम वाचा
न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा
करी घोष त्या जानकीवल्लभाचा

९२ अती आदरें सर्व ही नामघोषें
गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें
हरी तिष्ठतु तोषला नामतोषें
विशेषें हरा-मानसीं रामपीसें

९३ जगीं पाहतां देव हा अन्नदाता
तया लागली तत्त्वता **सार-चिंता**
तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें
मना सांग पा रे तुझें काय वेचे

---

अन्न-प्रकरण ८९–९३
घोष ८९, ९१, ९२. * $\frac{३}{२}$
श्लोक ८९ च्या उलट श्लोक ९०
सार-चिंता=आमचें वास्तविक कल्याण कसें होईल ही चिंता
पहा "तत्त्वता सार" ५७

९४ तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां
निवाला हरु तो मुखें नाम घेतां
जपे आदरें पार्वती विश्वमाता
म्हणोनी म्हणा तें चि हें नाम आतां

९५ अजामेळ पापी वदे पुत्रकामें
तया मुक्ति नारायणाचेनि नामें
शुकाकारणें कुंटणी रामवाणी
मुखें बोलतां ख्याति झाली पुराणीं

९६ महाभक्त प्रह्लाद हा दैत्यकूळीं
जपे रामनामावळी नित्यकाळीं
पिता पापरूपी तया देखवेना
जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना

९७ मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची
अहंतागुणें यातना ते फुकाची
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा
म्हणोनी म्हणा रे ! म्हणा देवराणा

---

नाम वि. अहंता ९७, पहा २४, उदाहरण ९६

९८ हरीनाम नेमस्त पाषाण तारी
बहू तारिले मानव देहधारी
तया रामनामीं सदा जो **विकल्पी**
वदेना कदा जीव तो पापरूपी

९९ जगीं धन्य वाराणसी पुण्यराशी
तयेमाजि जातां गती पूर्वजांसी
मुखें रामनामावळी नित्यकाळीं
जिवा हीत सांगे सदा **चंद्रमौळी**

१०० यथासांग रे कर्म तें ही घडेना
घडे धर्म तों पुण्य गांठीं पडेना
**दया** पाहतां सर्वभूतीं असेना
फुकाचें मुखीं नाम तें ही वसेना

१०१ जया नावडे **नाम** त्या यम जाची
विकल्पें उठे तर्क त्या नर्क छी छी
म्हणोनी अती आदरें **नाम** घ्यावें
मुखें बोलतां **दोष जाती** स्वभावें

---

विकल्प ९८, १०१, १३०
शंकर ३१, ७३, ८०, ८२–८५, ९२, ९४, ९९।१७५
दया ५६, ७४, १००, १०६, १३४, १७४
'नाम' शब्द उत्तरार्धात नाहीं
दोष जाती–नाम-स्मरणाची फलश्रुति ती च ७१ पूर्वार्घ फल-श्रुति २०५

## शतक दुसरें

### (५)

### कीर्तन-भक्ति

१०२ अती लीनता सर्वभावें स्वभावें
* जना सज्जनालागिं संतोषवावें
× देहे कारणीं सर्व लावीत जावें
सगूणीं अती आदरेंसीं भजावें

१०३ { हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी
+ { देहेबुद्धि नीरूपणीं वीसरावी
० परद्रव्य आणीक कांता परावी
यदर्थीं मना सांडि जीवीं करावी

१०४ § क्रियेवीण नानापरी वोलिजेतें
परी चित्त दुश्चीत तें लाजवीतें
मना कल्पना धीट सैराट धावे
तया मानवा देव कैसेनि पावे

---

* श्लोक ७, ८
× पूर्वार्ध-सार
+ उत्तरार्धाचे विषय
० श्लोक ९, २१
कीर्तन-भक्तीचें पथ्य १०३–१०५
§ सक्रिय वि. काल्पनिक विचार १०४, १०५

१०५ विवेकें **क्रिया** आपुली पालटावी
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी
* जनीं बोलण्यासारिखें चाल बापा
मना कल्पना सोडि संसारतापा

१०६ वरी स्नानसंध्या करीं एकनिष्ठा
विवेकें मना आवरीं स्थानभ्रष्टा
दया सर्व भूतीं जया मानवाला
सदा प्रेमळु भक्तिभावें निवाला

१०७ मना कोपआरोपणा ते नसावी
मना बुद्धि हे साधुसंगीं वसावी
मना **नष्ट चांडाळ** तो संग त्यागीं
मना होइ रे मोक्षभागीं विभागी

---

क्रिया ८, ५७, १०४, १०५, १०८, ११४, ११५, १३१, १८२
* $\frac{११५}{३}$
विवेक-युक्त बोल १०४,१०५ । ११४,११५ । १३२ शिवाय ४९,१८२
नष्ट चांडाळ १०७, १२६

१०८ सदा सर्वदा **सज्जनाचेनि योगें**
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे
क्रियेवीण वाचाळता ते निवारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी

१०९ जनीं वाद वेवाद सोडूनि द्यावा
जनीं सूखसंवाद सूखें करावा
जगीं तो चि तो शोकसंतापहारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी

११० तुटे वाद **संवाद** त्यातें म्हणावें
विवेकें अहंभाव यातें जिणावें
अहंतागुणें वाद नाना विकारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी

१११ हिताकारणें बोलणें सत्य आहे
हिताकारणें सर्व शोधूनि पाहें
हिताकारणें बंड पाषांड वारीं
तुटे वाद संवाद तो हीतकारी

११२ जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला
परी वादवेवाद तैसा चि ठेला
उठे संशयो वाद हा दंभधारी
तुटे वाद संवाद तो हीतकारी

---

सज्जनाचेनि योगें १०८, १५१, १५३ १८८ (बोले)
११० 'संवाद'—व्युत्पत्ति

११३ जनीं हीत पंडीत सांडीत गेले
अहंतागुणें ब्रह्मराक्षस झाले
तयाहूनि व्युत्पन्न तो कोण आहे
* मना सर्व जाणीव सांडूनि राहें,

११४ फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे
दिसेंदीस अभ्यंतरीं गर्व साचे
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
विचारें तुझा तूं चि शोधून पाहें

११५ + तुटे वाद संवाद तेथें करावा
विवेकें अहंभाव हा पालटावा
● जनीं बोलण्यासारिखें आचरावें
क्रियापालटें भक्तिपंथें चि जावें

---

* $\frac{१५८}{४}$ ● $\frac{१०५}{3}$

क्रियापालटें भक्ति १०८, ११५

+ सारभूत श्लोक

श्लोक ११५ भक्तिपंथ=हरिकीर्तन-प्रीति १०३. श्लोक ११६ ते १२७

११६ बहु श्रापितां कष्टला **अंबऋषी**
तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी
दिला क्षीरसिंधू तया **ऊपमानी**
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

११७ **धुरु** लेंकरूं बापुडें दैन्यवाणें
कृपा भाकितां दीधली भेटि जेणें
चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

११८ **गजेंद्रू** महां संकटीं वास पाहे
तयाकारणें श्रीहरी धांवताहे
उडी घातली जाहला जीवदानी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

११९ **अजामीळ** पापी तया अंत आला
कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला
अनाथासि आधार हा चक्रपाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

---

१०३ आणि १२७ या श्लोकांत उल्लेखिलेलें हें हरिकीर्तन आहे. तत्परिणामीं देह-बुद्धि विसरावी, देह-भावना उडावी, अशी अपेक्षा आहे.

१२० विधीकारणें जाहला **मत्स्य** वेगीं
धरी **कूर्मरूपें** धरा पृष्ठभागीं
जना रक्षणाकारणें **नीच योनी**
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

१२१ **महां भक्त प्रह्लाद** हा कष्टवीला
म्हणोनी तयाकारणे **सिंह** झाला
न ये ज्वाळ वीषाळ सन्नीध कोणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

१२२ कृपा भाकितां जाहला वज्रपाणी
तया कारणें **वामनु** चक्रपाणी
द्विजाकारणें **भार्गव** चापपाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

१२३ अहिल्ये सतीलागिं आरण्यपंथें
कुढावा पुढें देव बंदी तयांतें
बळें सोडितां घाव घाली निशाणी
नुपेक्षी कदा **राम** दासाभिमानी

१२४ तये **द्रौपदीकारणें** लागवेगें
त्वरें धांवतु सर्व सांडूनि मागें
कलीलागि झाला असे **बौद्ध मौनी**
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

१२५ अनाथां दिनांकारणें जन्मताहे
**कलंकी** पुढें देव होणार आहे
* जया वर्णितां सीणली वेदवाणी
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी

---

लीलावतारी १२०–१२५
'महां भक्त' प्रह्लाद ९६, १२१
* ३२/3

१२६ जनाकारणें देव लीलावतारी
बहूतांपरी आदरें वेषधारी
तया नेणती ते जन पापरूपी
दुरात्मे महा नष्ट चांडाळ पापी

१२७ जगीं धन्य तो रामसूखें निवाला
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला
देहेभावना रामबोधें उडाली
* मनोवासना रामरूपीं बुडाली

१२८ मना वासना **वासुदेवीं** वसों दे
मना कामना कामसंगीं नसों दे
मना कल्पना वाउगी ते न कीजे
मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे

१२९ गतीकारणें संगती सज्जनाची
मती पालटे सूमती दुर्जनाची
रतीनाइकेचा पती नष्ट आहे
म्हणोनी मनातीत होऊनि राहें

१३० मना अल्प संकल्प तो ही नसावा
मना सत्य संकल्प चित्तीं वसावा
जनीं जल्प वीकल्प तो ही त्यजावा
रमाकांत एकांतकाळीं भजावा

१३१ भजाया जनीं पाहतां राम एकु
करीं बाण एकु मुखीं शब्द एकु
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकु
धरा जानकीनायकाचा विवेकु

---

* $\frac{७७}{२}$ मधील युक्ति
श्लोक ११६ – १३१ गाळून हि संगति जुळते
'वासुदेव'–निरुक्ति १२८
श्लोक १२८–१३० ह्यांना उपसंहाराचें स्वरूप आहे. तसें च पहा ५८
१३१ इष्ट-देवता–अनुवर्तनीय

१३२ विचारूनि बोले विवंचूनि चाले
तयाचेनि संतप्त ते ही निवाले
बरें शोधिल्यावीण बोलों नको हो
जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो

१३३ हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी
जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासी
तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे
तया भाषणें नष्ट संदेह मोडे

१३४ नसे गर्व आंगीं सदा वीतरागी
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा
इहीं लक्षणीं जाणिजे **योगिराणा**

१३५ धरीं रे मना संगती सज्जनाची
जेणें **वृत्ति हे पालटे** दुर्जनाची
**बळें** भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे
महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे

---

योगिराणा–गुरु १३४, १८३
क्रिया-पालट, वृत्ति-पालट ४०। १०५, १०८, ११५। १२९, १३५.
बळें=अवश होऊन, सत्संगति बळें

(६)

## सत्य-शोधन

१३६ **भयें** व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे
भयातीत तें **संत आनंत पाहें**
जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना
भय मानसीं सर्वथा ही असेना

१३७ जिवा, श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले
परी जीव **अज्ञान** तैसे चि ठेले
देहेबुद्धिचें कर्म खोटें टळेना
जुनें ठेवणें मीपणें आकळेना

१३८ भ्रमें नाडळे वित्त तें गुप्त झालें
जिवा जन्मदारिद्रय ठाकूनि आलें
* { देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना
जुनें ठेवणें मीपणें आकळेना }

१३९ पुढें पाहतां सर्व ही कोंदलेंसें
अभाग्यास **हें दृश्य** पाषाण भासे
**अभावें** कदा पुण्य गांठीं पडेना
जुनें ठेवणें मीपणें आकळेना

१४० जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं
गुणें गोविलें जाहलें दुःख देहीं
गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना
जुनें ठेवणें मीपणें आकळेना

१४१ म्हणे दास सायास **त्याचे** करावे
जनीं जाणता पाय त्याचे धरावे
गुरुअंजनेवीण तें आकळेना
जुनें ठेवणें मीपणें तें कळेना

---

टीप पान १६७ वर पहा.

१४२ कळेना कळेना कळेना ढळेना
ढळे नाढळे संशयो ही ढळेना
गळेना गळेना अहंता गळेना
**बळें** आकळेना मिळेना मिळेना

१४३ अविद्यागुणें मानवा ऊमजेना
भ्रमें चूकलें हीत तें आकळेना
परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें
परी सत्य मिथ्या असें कोण जाणें

१४४ जगीं पाहतां साच तें काय आहे
अती आदरें सत्य शोधूनि पाहें
\+ पुढें पाहतां पाहतां **देव** जोडे
● **भ्रमें भ्रांति आज्ञान** हें सर्व मोडे

१४५ सदा वीषयो चिंतितां जीव जाला
अहंभाव अज्ञान जन्मासि आला
× विवेकें सदा सस्वरूपीं भरावें
जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें

---

अभय—ज्ञानानें १३६, १८५, भक्तीनें २७, ६९
भय=काळभय १३५. अज्ञान १३७, १४४, १४५, १९१
सत्यं अनंतं १३६, १४६,–१५०, १६९, १८४
* श्लोक $\frac{१९१}{१} \times \frac{१०}{४}$. हें दृश्य=मूर्ति, सृष्टि
अभाव=अश्रद्धा त्याचे=त्या संबंधीं
बळें=बाह्य साधना-बळें, ज्ञानहीन साधनेच्या जोरावर
\+ उत्तरोत्तर सत्य-शोधनाअंतीं. परम सत्य–देव १४४
● ज्या भ्रांतिरूप अज्ञानानें विषय-चिंतन करून जीव **जन्म-मरण-चक्रांत** भ्रमतो—पहा १४५, १३८
भ्रम १३८, १४३, १४४ १६६

१४६ दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी
अकस्मात अकारलें काळ मोडी
* पुढें सर्व जाईल कांहीं न राहे
मना संत आनंत शोधूनि पाहें

१४७ फुटेना तुटेना चळेना ढळेना
**सदा संचलें** मीपणें तें कळेना
तया एकरूपासि दूजें न साहे
मना संत आनंत शोधूनि पाहें

१४८ निराकार आधार ब्रह्मादिकांचा
जया सांगतां सीणली वेदवाचा
विवेकें **तदाकार** होऊनि राहें
मना संत आनंत शोधूनि पाहें

१४९ + जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे
× जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे
जगीं पाहतां पाहणें जात आहे
मना संत आनंत शोधूनि पाहे

१५० { नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं
● नसे व्यक्त अव्यक्त ना नील नाहीं
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे
मना संत आनंत शोधूनि पाहें

---

सदा संचले १४७, १९५. तदाकार १४८, १७०

* श्लोक २५/४ ● ध्यान हि कल्पना च

+ दृश्य × द्रष्टा

१४८ 'निराकार आधार ब्रह्मादिकांचा' म्हणून 'जया सांगतां सीणली वेदवाचा'

१५१ खरें **शोधितां** शोधितां शोधताहे
मना बोधितां बोधितां बोधताहे
परी सर्व ही **सज्जनाचेनि योगें**
**बरा निश्चयो** पाविजे सानुरागें

१५२ बहूतां परीं कूसरी तत्त्वझाडा
परी पाहिजे अंतरीं तो निवाडा
मना सार साचार तें वेगळें रे
समस्तांमधें एक तें आगळें रे

१५३ नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें
समाधान कांहीं नव्हे तानमानें
नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें
समाधान तें सज्जनाचेनि योगें

१५४ महावाक्य तत्त्वादिकें पंचिकर्णें
खुणें पाविजे संतसंगें विवर्णें
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो

१५५ **दिसेना जनीं तें चि शोधूनि पाहें**
बरें पाहतां गूज तेथें चि आहे
करीं घेऊं जातां कदा आढळेना
जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना

---

शोधणें ११, ६६, ७५,। १११, ११४, १३२, १४४, १४६–१५०,
१५१, १५५, १६१, १७०, १७८, १८२, १८४ १८६

सज्जन-संगतींत शोधन, साधन, अध्ययन करावें १५१–१५५

बरा निश्चयो १५१, १६७

श्लोक १५५ दिसत नाही ते च शोधण्याची गरज. तें च सार. त्या उलट श्लोक १४६

१५६ म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहें
अतर्क्यासि तर्की असा कोण आहे
* { जनीं **मीपणें** पाहतां पाहवेना
तया लक्षितां वेगळें राहवेना }

१५७ बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे,
जया निश्चयो एक तो ही न साहे
+ मती भांडती **शास्त्रबोधें विरोधें**
गती खुंटती शास्त्रबोधें प्रबोधें

१५८ श्रृती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें
स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें
स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे
× मना सर्व जाणीव सांडून राहें

---

* श्लोक १४९ × $\frac{११३}{४}$
मीपण, जाणीव, अहंभाव—ह्यांतून पतन १६२
+ तर्क-परिणाम

१५९ जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची
तया भोजनाची रुची प्राप्ति कैंची
अहंभाव ज्या मानसींचा विरेना
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना

१६० नको रे मना वाद हा खेदकारी
* नको रे मना भेद नाना विकारी
नको रे मना शीकवूं पुढिलांसी
अहंभाव जो राहिला तूजपासीं

१६१ अहंतागुणें सर्व ही दुःख होतें
मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें
**सुखी** राहतां सर्व ही सूख आहे
**अहंता** तुझी तूं चि शोधूनि पाहें

१६२ अहंतागुणें नीति सांडी विवेकी
अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं
परी अंतरीं सर्व ही साक्ष येते
× **प्रमाणांतरें बुद्धि सांडूनि** जाते

---

* श्लोक ६

सुखी=निरहंकार

१६१/४ अहंता सूक्ष्म आहे. ज्याची त्यानें च शोधली पाहिजे.

× १ बुद्धि प्रमाणांतरांना सांडून जाते } ?
२ प्रमाणांतरानें बुद्धि सांडून जाते }

बुद्धि सांडूनि १६३

१६३ देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला
देहातीत तें हीत सांडीत गेला
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी
सदा संगती सज्जनाची धरावी

१६४ मनें कल्पिला वीषयो सोडवावा
मनें देव निर्गूण तो वोळखावा
मनें कल्पितां कल्पना ते सरावी
सदा संगती सज्जनाची धरावी

१६५ देहादीक प्रपंच हा चिंतियेला
परी अंतरीं लोभ निश्चीत ठेला
हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी
सदा संगती सज्जनाची धरावी

१६६ अहंकार विस्तारला या **देह्याचा**
स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा
**बळें** भ्रांति हे जन्मचिंता हरावी
सदा संगती सज्जनाची धरावी

१६७ वरा निश्चयो शाश्वताचा करावा
म्हणे दास संदेह तो वीसरावा
घडीनें घडी सार्थकाची करावी
सदा संगती सज्जनाची धरावी

---

देह-बुद्धि–अष्टक १६३–१७०

देह्याचा–देह, देही ?

बळें–ज्ञानबळें ?

देह भावना-निरसनासाठीं मत्-संगति

१६७/३ संदेह गेला तरी आठवण उरते ती हि विसरावी १६९/४

१६८ करी वृत्ति जो संत तो **संत** जाणा
दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा
उपाधी देहेबुद्धितें वाढवीते
परी सज्जना केवि बाधूं शके ते

१६९ नसे अंत आनंत संता पुसावा
**अहंकारविस्तार** हा नीरसावा
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा
देहेबुद्धिचा आठवू नाठवावा

१७० * { देहेबुद्धि हे ज्ञानबोधें त्यजावी
**विवेकें** तयें वस्तुची **भेटि** घ्यावी }
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें
म्हणोनी सदा तें चि **शोधीत** जावें

•

---

संत–निरुक्ति १६८
अहंकार–विस्तार :
देह–बुद्धि १६३–विषय-वासना १६४, लोभ १६५, मोहे १६६, संदेह १६७,
विवेक नैतिक ५३, ६९, १०५, १०६, ११० ? ११५ ? १३१, १६२
विवेक आध्यात्मिक १०, १२, ४० ? १४५, १४८, १७०, १७२, १७३, १८३ ?
भेट २१, ५९, ११७, १७०, १८६, २०१
भेटीनंतर हि शोध १७० पहा २०२
*श्लोक १८८

## ( ७ )

## गुरुकृपा-लब्धि

१७१ असे सार साचार तें **चोरलेंसे**
इहीं **लोचनीं** पाहतां दृश्य भासे
निराभास निर्गूण तें आकळेना
अहंतागुणें कल्पितां ही कळेना

१७२ स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या
मुळीं कल्पना दों रुपें ते चि जाली
विवकें तरी सस्वरूपीं मिळाली

१७३ स्वरूपीं उदेला अहंकारराहो
तेणें संर्व आच्छादिलें व्योम पाहो
दिशा पाहतां ते निशा वाढताहे
विवेकें विचारें विवंचूनि पाहें

चोरल १७१, १७९
लोचन–चर्म चक्षु. 'निशा' १७१, १७३, १७४, १७७
ब्रह्म, माया, अविद्या, आत्मा १४३, १६३, १७२, १९१
साक्षिनें पक्ष घेतो = तटस्थ कैवारी
§ विष्णूची मुरवत राहून गेलेली दिसते.
* १४७ / १०२

१७४ जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना
भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना
क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो
दयादक्ष तो **साक्षिनें पक्ष घेतो**

१७५ § विधी निर्मितां लीहितो सर्व भाळीं
परी लीहिता कोण त्याचे कपाळीं
हरु जाळितो लोक संहारकाळीं
परी शेंवटीं शंकरा कोण जाळी

१७६ जगीं द्वादशादित्य हे रुद्र अक्रा
असंख्यात संख्या करी कोण शक्रा
जगीं देव धुंडाळितां आडळेना
जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना

१७७ तुटेना फुटेना कदा देवराणा
* चळेना ढळेना कदा दैन्यवाणा
कळेना कळेना कदा लोचनासी
वसेना दिसेना जनीं मीपणासी

१७८ जया मानला देव तो पूजिताहे
परी देव शोधूनि कोणी न पाहे
जगीं पाहतां देव कोट्यानकोटी
जया मानली भक्ति जे ते चि मोठी

१७९ तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले
तया देवरायासि कोणी न बोले
जगीं थोरला देव तो चोरलासे
गुरूवीण तो सर्वथा ही न दीसे

---

टीपा १७४ पानावर पहा

१८० गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी
मनीं कामना चेटकें धातमाता
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता

१८१ नव्हे चेटकी चाळकु द्रव्यभोंदु
नव्हे निंदकु मत्सरु भक्तिमंदु
नव्हे उन्मतु व्यसनी संगबाधु
जनीं ज्ञानिया तो चि साधु अगाधु

१८२ नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं
क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी
मुखें बोलण्यासारिखें चालताहे
मना सद्गुरु तो चि शोधूनि पाहें

१८३ जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी
कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी
प्रभु **दक्ष** व्युत्पन्न चातुर्य जाणे
तयाचेन योगें **समाधान** बाणे

---

दक्ष–दास, गुरु ४६, १८३
दयादक्ष–योगी, ईश्वर (१३४, १७४)
समाधान सत्संगतीनें १५३, १८३

१८४ नव्हे तें चि जालें नसे तें चि आलें
कळों लागलें सज्जनाचेनि बोलें
अनिर्वाच्य तें वाच्य वाचें वदावें
मना संत आनंत शोधीत जावें

१८५ लपावें अती आदरें रामरूपीं
भयातीत निश्चीत ये सस्वरूपीं
कदा तो जनीं पाहतां ही दिसेना
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना

१८६ सदा सर्वदा राम सन्नीध आहे
* मना सज्जना सत्य शोधून पाहें
अखंडीत भेटी रघूराज योगु
मना सांडि रे मीपणाचा वियोगु

अनुक्रम.......... दि. ..........

---

१७९ पूर्वार्धाशीं संबंध—१८४
सत्य अनंत = तें च भयातीत १८४, १८५ पहा १३६
मीपणाचा वियोग सोडणें म्हणजे च 'रघूराज योग' १८६
* $\frac{६६}{२}$

१८७ भुतें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे
परी सर्व ही सस्वरूपीं न साहे
**मना** भासलें सर्व कांहीं पहावें
परी संग सोडूनि **सूखी** रहावें

१८८ देहेभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें
**विदेहीपणें भक्तिमार्गें** चि जावें
विरक्तीबळें निंद्य सर्वं त्यजावें
परी **संग** सोडूनि सूखें रहावें

१८९ मही निर्मिली देव तो ओळखावा
जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा
तया निर्गुणालागि गूणीं पहावें
परी संग सोडूनि सूखें रहावें

१९० नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता
परेहून पर्ता न लिंपे विवर्ता
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें
परी संग सोडूनि सूखें रहावें

---

१८७ मना : संबोधन ?
१८७ सूखी : सुखी कीं सुखें ?
विदेहीपणें भक्तिमार्गें : विरोधाभास समन्वय स्वरूप ?
सृष्टि-निरीक्षण, परमार्थ-साधना, कारण-जिज्ञासा, पर-ध्यान. } "संग"

१९१ देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना
* तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना
**परब्रह्म** तें **मीपणें आकळेना**
मनीं **शून्य अज्ञान** हें मावळेना

१९२ मना ना कळे ना ढळे **रूप** ज्याचें
दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें
तया खूण ते हीण दृष्टांत पाहे
तेथें **संग निःसंग** दोन्ही न साहे

१९३ नव्हे जाणता नेणता देवराणा
न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा
श्रुती **नेणती नेणती** अंत त्याचा

---

* श्लोक १३८

**परब्रह्म = सर्वोत्तम = देवराणा** १९१, १९२, १९३

मीपणें आकळेना, १३७–१४१ । १४७ । १५६ । १९१

१९१ शून्य— { महा विघ्न
"सूक्ष्म अडथळा" (दा. बो. ८. १०)

अज्ञान १३७, १४४, १४५ । १९१

रूप–१२७, १८५, १९२, १९७, १९९, २००

रूप–सौंदर्य ६७, ७७, १२७

संग, निःसंग—दोन्ही मीपणांत येतात

नेणती नेणती = नेति नेति

१९४ वसे हृदयीं देव तो कोण कैसा
पुसे आदरें **साधकु** प्रश्न ऐसा
देहे टाकितां देव कोठें रहातो
परी मागुता ठाव कोठें पहातो

१९५ वसे हृदयीं देव तो जाण ऐसा
**नभाचे** परी व्यापकु जाण तैसा
सदा संचला येत ना जात कांहीं
तयावीण कोठें रिता ठाव नाहीं

१९६ नभीं वावरे जो अणुरेणु कांहीं
रिता ठाव या राघवेंवीण नाहीं
तया पाहतां पाहतां तें चि जालें
तेथें लक्ष आलक्ष सर्वै बुडालें

१९७ **नभासारिखें रूप या राघवाचें**
मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें
तया पाहतां **देहबुद्धी** उरेना
सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना

---

साधकु--वेणाबाईसारखा ?
नभ १९५–१९८ व्योम १७३
प्रश्न १९४ : गुरु-शिष्य संवाद
उत्तर १९५–२००
शिष्याचा उद्गार २०१
देह-बुद्धि १२ । १०३, १२७ । १३७, १३८ । १६३, १६५, १६६
१६८, १६९, १७० । १८८, १९१ । १९७ ।
$\frac{१९७}{१}$ वर टीका १९८

१९८ नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे
रघूनायका ऊपमा ते न साहे
**दुजेवीण** जो तो चि तो हा स्वभावें
तया व्यापकु व्यर्थ कैसें म्हणावें

१९९ अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे
तिथें तर्कसंपर्क तो ही न साहे
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें
दुजेवीण जे खूण स्वामीप्रतापें

२०० कळे आकळे रूप तें ज्ञान होतां
तिथें आटली सर्वसाक्षी अवस्था
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे
तो गे ! तो चि तो राम सर्वत्र पाहें

२०१ कदा ओळखीमाजि दूजें दिसेना
मनीं मानसीं द्वैत कांहीं वसेना
बहूतां दिसां आपुली भेटि जाली
* **विदेही**पणें सर्व काया निवाली

---

**द्वैत, दुजें** १३६ । १४७ । १९२ । १९८, १९९, २०१, २०४
**विदेही** १२, १८८, २०१
*** येथें ग्रंथ** संपला आहे.

## उपसंहार आणि फलश्रुति

२०२ मना गूज रे तूज हें प्राप्त जालें
परी अंतरीं पाहिजे यत्न केले
सदा **श्रवणें** पाविजे निश्चयासी
धरी सज्जन-संगती **धन्य** होसी

२०३ मना सर्व ही संग सोडूनि द्यावा
अती आदरें सज्जनाचा धरावा
जयाचेनि संगें महा दुःख भंगे
जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे

२०४ मना संग हा सर्व संगास तोडी
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी
मना संग हा साधका शीघ्र सोडी
मना संग हा द्वैत निःशेष मोडी

२०५ मनाचीं शतें ऐकतां दोष जाती
* मतीमंद ते साधना योग्य होती
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं
**म्हणे दास** विश्वासतां मुक्ति भोगी

---

श्रवणें : एक च उल्लेख

धन्य ३, ४७–५७, ८७, ९९, १२७, २०२

ज्ञानोत्तर साधना २०२

संत, गुरु, ८, (४५)। १०२, १०७, १०८, १२८,१२९, १३३–१३५
१४१, १५१, १५३, १५४, १६३–१६९, १७९–१८४
१९९, २०२–२०४

* जनतेची काळजी

म्हणे दास ७६, १४१, १५०, १६७, २०५

## परिशिष्ट

# समर्थांचें स्मरण

सुमारें तीनशें वर्षांपूर्वी " **शुभ-मंगल ! सावधान** ! " हें सूचक शब्द ऐकून बारा वर्षांच्या एका निर्बुद्ध बालकाच्या मतांत, उपनिषदांतील कुमार नचिकेतस्प्रमाणें, ' श्रद्धा ' उत्पन्न झाली. तो विचार करूं लागला,--" खरोखर 'शुभ-मंगल' ह्या नांवाखालीं कांहीं तरी अशुभ-अमंगल प्रकार चालला असावा काय? नाहीं तर हे ऋजुबुद्धीचे वैदिक ब्राह्मण मला ' सावधान ' होण्याचा इशारा कां देत आहेत ? '**भद्रं भद्रमिति ब्रूयात्** '--अभद्राला हि भद्र म्हणावें, हा ब्राह्मणांचा नियम असल्यामुळें, कांहीं तरी अशुभ-अमंगल ध्वनित करण्याच्या संकेतानें तर सावधान होण्याची सूचना नसेल ना ?" झालें. श्रद्धेनें विचारांना धक्का देतां च पायांना हि गति मिळून, व्याधाच्या हातून निसटलेल्या एखाद्या हरिणाप्रमाणें, भयभीत बालक धूम धावत सुटला !-- समर्थांच्या चरित्रांतील ही पहिली निवृत्त क्रिया होय. समर्थांच्या पुढील सर्व चरित्रावर ह्या पहिल्या त्यागाचे स्पष्ट परिणाम दिसून येतात. ' **संसार सुखें करावा** ' अशी संसार करण्याची परवानगी त्यांनीं आम्हांला दिली असली, तरी त्यांचें स्वतःचें संसाराविषयीं काय मत होतें हें त्यांच्या ह्या पहिल्या च उडीवरून दिसून येतें. '**शुभ-मंगल**' आणि '**सावधान**' ह्यांतील सूचक विसंगतता त्यांच्या अगदीं हृदयाला जाऊन भिडली होती ह्यांत शंका नाहीं. संसाराच्या दुःखमयत्वाचें त्यांना जें भयानक दर्शन झालें होतें, त्याची कल्पना दासबोधाचा तिसरा दशक वाचल्याशिवाय येणार नाहीं.

**जन्म हाचि विषमकाळ । जन्म हेचि वोखटी वेळ**
**जन्म हा अति कुश्चीळ । नरक पतन**

अशासारखे संसाराच्या अमंगळपणाविषयीं त्यांनीं जे जे उद्‌गार काढले आहेत, ते सर्व अतिशय जिव्हाळ्याचे असून कोणा हि सहृदय पुरुषाच्या अंत:करणांत भाल्यासारखे घुसल्याशिवाय राहत नाहींत. अशा स्थितींत राम-दासांनीं संसार करण्याची परवानगी दिली, आणि काम-दासांनीं ती उचलली, तरी त्यांमधील अंतर हृदयापासून छपून राहील काय ? वस्तुत: संसार आणि परमार्थ ह्यांमधील कांहीं तरी तडजोड समर्थांनीं स्वीकारली, असें मानणें म्हणजे समर्थांचें हृदय न समजणें होय. त्यांची ह्या बाबतींतली वृत्ति अगदीं बिन-तडजोडीची आणि निखालस आहे.

**जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।**
**स्वजन सकळ हि त्यागावें । दु:खमूळ जे**

हा त्यांचा कायमचा सिद्धांत असून तो त्यांनीं शेंकडों वेळां एकसारखा सांगितला आहे. तुकाराम निवृत्ति-मार्गी म्हणविला जात असून बिचारा संसारांत कसाबसा वागत तरी होता. पण समर्थांनीं तर पहिल्यापासून च मुलोत्पाटी धोरण स्वीकारलें होतें. श्रीशंकराचार्यांनीं घालून दिलेलें वळण अक्षरश: जर कोणीं गिरविलें असेल तर तें समर्थांनीं. "**येच क्षणीं मरून जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी**" ह्या वचनांत जी घाबरेपणाची वृत्ति दिसून येत आहे, तिच्याकडे पाहतां त्यांच्या हृदयांत काय जळत होतें हें सूर्यप्रकाशासारखें स्पष्ट आहे. मृत्यूच्या साम्राज्याखालचें जीवन ही किती भयंकर वस्तु आहे ह्याची पूर्ण जाणीव त्यांना होती. जीवनांतील कोणतें च कार्य स्वातंत्र्यानें होत नसून, मृत्यूच्या सार्वभौम सत्तेखालीं जीवनांतील सर्व चळवळी चाललेल्या असतात. चरकांत सांपडलेल्या

ऊंसाला ज्याप्रमाणें पिरगळलें जाऊन रस ओकण्याच्या कर्मणि-प्रयोगाशिवाय, दुसरा प्रयोग च माहीत नाहीं, त्याप्रमाणें मृत्यूच्या चाबकाखालीं एखाद्या जनावराप्रमाणें वागण्याशिवाय आम्हांला स्वतंत्र कर्तृत्व च नसतें. आम्ही निजतों, उठतों, काम करतों, जगतों, मरतों, सर्व च कर्मणि-प्रयोगाचीं उदाहरणें आहेत. आम्ही झोंप घेतों कीं झोंप आम्हांला घेते ? आम्हीं उठतों कीं जागृति आम्हांला उठविते ? आम्ही मरेपर्यंत जगतों आणि जगत नाहीं म्हणून मरतों, असें आमच्या जीवनाचें अर्थशून्य स्वरूप आहे. "**स्वतंत्रः कर्ता**" असें पाणिनीचें सूत्र आहे. आमच्या सबंध जीवनांत स्वातंत्र्य कोठें च नसल्यामुळें कर्तरि-प्रयोग च नाहीं. असलें कर्तृत्वशून्य बावळें जीवन जगण्यांत काय पुरुषार्थ ? समर्थांना जीवनांतील कर्तरि-प्रयोग शिकावयाचा होता, '**मरणाआधींच मरून**' आपलें मरण डोळ्यांनीं पहावयाचें होतें, '**यांचि जन्में येणेंचि काळें**' स्वातंत्र्य मिळवायचें होतें. म्हणून त्यांनीं स्वतः गृहत्याग केला, आणि '**सदा सेवि आरण्य तारुण्य-काळीं**' अशी सर्व जगास हांक मारली, "**कौमार आचरेत् प्राज्ञो धर्मान् भागवतानिह**"--धर्माचें आचरण लहानपणीं च (सुरू) झालें पाहिजे--ही भगवद्भक्त प्रह्लादाची भागवत-धर्मातील आज्ञा त्यांनीं स्वतः शिरसामान्य केली आणि महाराष्ट्रास शिकविली.

तथापि लौकिकदृष्टया कां होईना, समर्थांनीं संसाराला मान्यता दिल्यासारखें करून व्यावहारिक प्रश्नांना आपल्या ग्रंथांतील एक कोंपरा दिला आहे. पूर्वीच्या संतांनीं "**जोडोनियां धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेंच करी**" इत्यादि प्रकारें सांसारिक लोकांना गोंजारून घेण्याचा क्वचित् प्रयत्न केला असला तरी समर्थांच्या इतका तो व्यापक नाहीं. म्हणून ह्या पूर्वींच्या संतांची गणना निवृत्ति-मार्गांत करून प्रपंच-परायण लोकांनीं समर्थांना

प्रवृत्ति मार्गांत ओढण्याचा उपक्रम केला आहे. वास्तविक पाहतां पूर्व-संतांच्या मानानें समर्थांची भाषा थोडीशी अधिक संग्राहक स्वरूपाची असली, तरी असल्या वृत्तिभेदावरून जातिभेदाचें अनुमान निघूं शकत नाहीं. शिवाय, संसाराला वाचनिक मान्यता देण्याचा च सवाल असल्यास, समर्थांच्या किंवा इतर संतांच्या हि फार पूर्वीं आमच्या शास्त्रकारांनीं च चार आश्रमांमध्यें गृहस्थाश्रमाला व्यवस्थित स्थान देऊन, आणि त्यांतील कर्तव्यधर्मांचें विस्तृत वर्णन करून, ही मान्यता केव्हां च देऊन टाकली आहे. खरें म्हटलें तर ह्या बाबतींत शास्त्रकारांच्या हि मान्यतेची बिलकुल जरूर नसून, हा व्यवहार प्रायः सर्वांस च रागतःप्राप्त झालेला असतो. ह्या रागतःप्राप्त व्यवहारांना **मर्यादा** घालण्याच्या हेतूनें शास्त्रकारांनीं मान्यता दिलेली असते; **मान्यता** देण्याच्या हेतूनें नव्हे. आणि ही मान्यता हि **प्रवर्तक** स्वरूपाची नसून **निवर्तक** स्वरूपाची असते. उदाहरणार्थ, गरीब, श्रीमंत सर्वांचीं च घरें लुटणाऱ्या एखाद्या बेरड दरवडेखोराला कोणा साधूनें "निदान गरीबांच्या घरीं चोरी करूं नकोस" अशा अर्थाचा उपदेश केल्यास त्याचा अर्थ "श्रीमंतांच्या घरीं चोरी कर अशी माझी तुला आज्ञा आहे" असा तर नाहीं च, पण "श्रीमंतांच्या घरीं चोरी केल्यास **माझी** तुला हरकत नाहीं" असा हि नसून, "श्रीमंतांच्या घरीं चोरी न करण्यास **तुझी** हरकत असल्यामुळें श्रीमंतांच्या घरीं चोरी करण्यास मी हरकत **घेत** नाहीं (यद्यपि घेऊं इच्छितों)" असा आहे. सेंट पॉलनें बायबलच्या नव्या करारांत गृहस्थाश्रमाची परवानगी देतांना "वस्तुतः ज्या संन्यस्तवृत्तीनें मी राहतों त्या च वृत्तीनें तुम्हीं हि रहावें अशी माझी इच्छा आहे, तथापि तुमच्या प्रकृतीचा निग्रह मीं करणें अशक्य असल्यामुळें ही माझी (निवर्तक अथवा नाइलाजाची) **अनुज्ञा** आहे, **आज्ञा** नव्हे;"

असें म्हटलें आहे. हा च अर्थ शास्त्रीय भाषेंत सांगावयाचा म्हणजे शास्त्रांमधें संसारविषयक 'विधि' नसून 'अनुवाद' असतो असें म्हणत असतात. शास्त्रांमधें केलेला कर्माचा उपदेश आमच्या वृत्तीस अनुकूल असल्यामुळें 'मिळिमिळीत' संन्यासापेक्षां हा 'दणकट' कर्मयोग आम्हांस प्रिय वाटणें स्वाभाविक आहे. पण ह्या दणकट कर्मयोगाच्या डोक्यांत शास्त्रानें 'निष्कामपणाचा' दणका दिलेला असतो हें मात्र आम्ही विसरून जातों. 'सविनय-कायदाभंग' किंवा 'अहिंसात्मक असहकार' ह्यांतील विशेषणें अतिशय महत्त्वाचीं असून त्यांच्या योगानें विशेष्यांचें मूळ स्वरूप पार बदलून जातें; असें महात्माजी म्हणत असतात. तो च न्याय 'निष्काम-कर्माला' हि लागू आहे. आमच्या राजस बुद्धीच्या एकाक्ष तर्काला विशेष्यांचें 'घी' दिसतें, पण विशेषणांचा 'बडगा' दिसत नाहीं. निष्काम-कर्माचा योग आणि सकाम-कर्माचा त्याग, या दोहोंत भाषेचा काय फरक असेल तो असो, अर्थ एक च आहे. कोणी योगाची भाषा बोलतो, कोणी त्यागाची भाषा बोलतो, दोघांचें हि हृदय एक च. "**साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले**" ह्या समर्थांच्या च वचनाप्रमाणें सर्व संतांचा संदेश एक च असून वृत्तिभेदानें किंवा अधिकार-भेदानें भाषेंत मात्र फरक राहतो. नाथां-सारख्या आदर्श गृहस्थानें संन्यासाची केलेली स्तुति, आणि समर्थां-सारख्या आदर्श फकीरानें गृहस्थाश्रमाला दिलेली अनुमति, हीं दोन्ही कां व कशीं शोभतात ह्याची कल्पना रसिकांनीं च करावी.

पण "**एकं सांख्य च योगं च**"—कर्म-योग आणि कर्म-संन्यास हीं दोन्ही तत्त्वत: एक च—असलीं तरी व्यवहारामधें त्यांचीं विकृत स्वरूपें एकमेकांच्या विरुद्ध उभीं राहत असतात. समर्थ जेव्हां गृहत्याग करून अरण्यायनाच्या तयारीला लागले असतील, तेव्हां

कर्मयोगाचें विकृत स्वरूप त्यांना म्हणू लागलें असेल,—" निष्काम-वृत्तीनें संसारांत राहून च जनकादिकांनी मुक्ति मिळविली आहे. मुक्तीसाठीं संसार सोडण्याची जरूर नसून निष्कामवृत्ति राखावी म्हणजे झालें. अरण्यवासानें मुक्ति मिळत असती तर वाघ-सिंहांना मुक्ति कां मिळू नये? शीतोष्ण सहन करण्यानें मुक्ति मिळत असती तर झाडांनीं मुक्त कां होऊं नये? शिवाय, जेथें विकार होण्याचा संभव आहे तेथें राहून हि वृत्ति निर्विकार राखणें ह्यांत च खरें शौर्य आहे. संसारांतून पळ काढण्यांत काय पराक्रम?" असले अनेक बुद्धिवाद समर्थांच्या कानीं आले असतील. त्या सर्वांना त्यांनीं सरळ जबाब दिला असेल कीं,—" निष्काम कर्म-योग ही च निर्भयतेची परम भूमिका असूं शकेल. पण निष्काम कसें व्हावें हा च माझ्यापुढें प्रश्न आहे. निष्कामत्वाचा परीस हातीं लागल्यानंतर कर्मयोगाच्या लोखंडाचें सोनें होऊन जात असेल. पण हा परीस मिळेपर्यंत लोखंडाचा संग्रह मी कोठें बाळगत बसूं? आधीं **शुभ-मंगल** आटोपून घेऊन मग **सावधान** होण्याच्या उपद्व्यापापेक्षां, आधीं **सावधान** होणें च मला तरी बरें वाटतें."

संन्यास आणि कर्मयोग हीं दोन्ही संपूर्ण जीवनाचीं सारख्या च महत्त्वाचीं अंगें आहेत. संन्यास हें जीवनाचें शास्त्र म्हटल्यास योग्य म्हणजे जीवनाची कला असें म्हणतां येईल. शास्त्रांवांचून कला आंधळी आणि कलेवांचून शास्त्र लंगडें असल्यामुळें, '**संन्यास-योग-युक्तात्मा**' संन्यास आणि योग ह्यांचा समुच्चय, हा गीतेनें जीवनाचा आदर्श ठरविला आहे. "**अभ्यास-वैराग्याभ्यां तन्निरोधः**" ह्या योग-सूत्रांत अभ्यास आणि वैराग्य हीं जीं मनोजयाचीं दोन साधनें सांगितलीं आहेत, आणि गीतेंत हि ज्यांचा अनुवाद केलेला आहे (गी. ६. ३५) तीं संन्यास आणि कर्मयोग अशा च अर्थाचीं आहेत.

वैराग्यानें प्रतिकूल प्रवृत्तींचा त्याग होत असल्यामुळें, त्याचें स्वरूप निवर्तक, अकरणात्मक किंवा संन्यासरूप असतें. परमार्थाच्या प्रवासांतील सर्व अंतराय दूर करण्यास ह्या वैराग्यरूप संन्यासाचा उपयोग होतो. पण हे अंतराय दूर केल्यानंतर पुढील रचनात्मक कार्याच्या दृष्टीनें अभ्यासाचा कर्मयोग अवश्य असतो. वैराग्यानें शेत वेणून काढल्यानंतर अभ्यासानें त्यांत नवीन बीजारोपण होतें. ह्या अभ्यासाला समर्थांनीं विवेक अशी संज्ञा दिली असून, ह्या विवेकावांचून '**नुसतें वैराग्य हेंकाड पिसें**' असल्यामुळें, "**विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य**" असें '**मोक्ष-श्रिया-विराजित**' पुरुषाचें त्यांनीं वर्णन केलें आहे. अभ्यास-वैराग्य किंवा समर्थांच्या भाषेंत विवेक-वैराग्य, ह्या दोन पंखांच्या साहाय्यानें संसाराच्या घरट्यांतील जीव परमार्थाच्या आकाशांत उच उडू शकतो. पण संन्यास आणि कर्मयोग साधकाच्या दृष्टीनें परस्पर पोषक असले, तरी व्यवहारांत वैराग्यरूप संन्यासाला कर्मयोगाच्या विकृत स्वरूपाशीं लढण्याचे अनेक प्रसंग येत असतात. उलटपक्षीं, अभ्यास-रूप कर्मयोगाला हि पुष्कळ वेळां कर्मसंन्यासाच्या विकृत स्वरूपाबरोबर झुंजावें लागतें. कर्मयोगाचें विकृत स्वरूप व्यवहारांतील हलकट कर्मांना हि मंजूरी देऊन दुराशेचा कर्मयोग करवितें, आणि संन्यासाचें विकृत स्वरूप आळसाला उत्तेजन देऊन निराशेचा कर्मसंन्यास करवितें. व्यावहारिकांच्या तमसावृत बुद्धीला सर्व च अर्थांचें विपरीत दर्शन होत असल्यामुळें (गी. १८. ३२.), ह्या माकड-आरशांतून (Laughing mirror) पाहिल्यास कोणत्या हि 'विनायकी' तत्त्वज्ञानाला 'वानराचें' स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय राहत नाहीं. माकड-आरशांतला कर्मयोग मनुष्याला अत्युत्साहानें जाळतो, आणि माकड-आरशांतला संन्यास निरुत्साहानें विझवितो. दुरुद्योगी कर्म-

योग बहुधा कामाला वश होतो, निरुद्योगी संन्यास क्रोधाला बळी पडतो. दोन्ही पक्षांत धोक्याच्या जागा असून त्या टाळल्याशिवाय मनुष्याची प्रगति होऊं शकत नाहीं. पुरुरवस् कामी, दुर्वासस् क्रोधी, दोघे हि मोक्षसुखाला सारखे च वंचित्. काम ही कोमल मनोवृत्ति असल्यामुळें तिचा जय करण्यास कठोर वृत्तीचा स्वीकार करावा लागतो. पण कठोर वृत्तीचा (म्हणजे वैराग्याचा) आश्रय करून मनुष्यानें कामावर जय मिळविला तरी तो जय तात्कालिक च ठरतो. कारण सामान्यत: व्यवहारांत काम हा कोमल मनोवृत्तीचें सोंग घेऊन फिरत असला, तरी प्रसंग पडेल तसें रूप धारण करण्याचा गुण, किंवा काम-रूपत्व, हें च त्याचें खरें स्वरूप असल्यामुळें त्याच्या कोमल रूपाचा पराजय झाल्यानंतर वैराग्यानुकूल भासणाऱ्या क्रोधाचें रूप घेऊन तो मनुष्याच्या मानगुटीवर बसतो, आणि मग त्याला जिंकण्याचा पुन्हां उलट दिशेनें प्रयत्न करावा लागतो, असा साधकांचा अनुभव आहे. अशाप्रकारें ह्या '**कामरूप दुरासद**' शत्रूवर जय मिळविण्याच्या प्रयत्नांत एकप्रकारें आत्मवंचना होत असल्यामुळें ह्याला ठार करण्याशिवाय गत्यंतर राहत नाहीं. (गी. ३. ४३) आणि तसें करण्यास नुसतें वैराग्याचें बळ पुरें न पडतां, अभ्यासाची मदत घ्यावी लागते. संन्यास आणि कर्मयोग हीं दोन्ही शस्त्रें नीट पाजळून ठेवून, यथासंभव ह्या दोन्ही शस्त्रांचा उपयोग केल्याशिवाय साधकाची साधना यशस्वी होत नाहीं.

"वैराग्याच्या" प्रखर शस्त्रानें देह-गेहाविषयींचा स्नेह छाटून टाकून ह्यापुढील 'अभ्यासा' साठीं समर्थ गोदावरी-परिसरीं दाखल झाले. संन्यासानें सांसारिक कर्मयोगाचा छेद केल्यानंतर पारमार्थिक कर्मयोगाच्या अभ्यासास प्रारंभ व्हावयास पाहिजे; नाहीं तर वर दर्शविल्याप्रमाणें विकृत कर्मयोगाच्या आगींतून निघाल्यानंतर विकृत

कर्मसंन्यासाच्या फुपाट्यांत पडण्याचा संभव राहतो. हा संभव टाळण्यासाठीं समर्थांनीं ह्यापुढें बारा वर्षें उपासनेच्या कर्मयोगाचें अनुष्ठान केलें. त्यांच्या ह्या बारा वर्षांच्या कार्यक्रमाची फारशी माहिती आज उपलब्ध नाहीं, आणि पुढें हि उपलब्ध होण्याचा संभव नाहीं. कारण गूढ एकांतांतील पवित्र साधनेची बहिर्मुख इतिहासाला कशी माहिती मिळणार ? कंबरभर पाण्यांत उभें राहून गायत्रीचें आणि राममंत्राचें पुनश्चरण ह्या बारा वर्षांत समर्थांनीं केलें असें सांगण्यांत येतें. ह्या पलीकडे जगास कांहीं च माहिती मिळालेली नाहीं आणि जगास ही माहिती मिळविण्याची मनापासून इच्छा हि नाहीं. समर्थांनीं उत्तर-चरित्रांत जें समाज-संघटनेचें काम केलें त्यांचीं वर्णनें आम्हांस मोठी गोड लागतात. पण ही संघटना करण्याची शक्ति मिळविण्यासाठीं त्यानीं पूर्वतयारीचे जे कठोर कष्ट केले त्यांचें आम्हांस महत्त्व वाटत नाहीं. "**पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः**"--मनुष्यास पुण्याचें फळ हवें असतें पण पुण्य मात्र नको असतें,--ह्या उक्तीचा प्रत्यय पदोपदीं दिसून येतो. '**आधीं कष्ट मग फळ**' हा सृष्टीचा निष्ठुर नियम माहीत असून हि '**जनाचा लालची स्वभाव**' कष्ट केल्यावांचून च फलाची अपेक्षा राखतो. समर्थांनीं सांगितल्याप्रमाणें "**जितुकें कांहीं आपणासी ठावें । तें हि शिकवून टाकावें**" अशी लोकांची उत्कट मनीषा असते. प्रथमतः कोणातरी बापाचा मुलगा बनल्याशिवाय मनुष्य कोणत्या हि मुलाचा बाप होऊं शकत नाहीं, असा ईश्वरी सृष्टीमधील अबाध्य नियम असला तरी ह्या नियमाला हरताळ फांसून शिष्यत्वाचा अनुभव घेतल्याशिवाय 'गुरुत्वाची आचार्य-पदवी' मिळविण्याविषयीं आम्हांस उत्कंठा लागून राहिलेली असते. अवधूतांप्रमाणें सर्व जगास गुरु मानल्याशिवाय जगद्गुरूची पदवी मिळणें शक्य नाहीं. पण 'जगद्गुरु

हा समास (‘जग आहे गुरु’ ज्याचा–असा) बहुव्रीहि असला तरी आम्हांस तो (‘जगाचा जो गुरु असा’–) षष्ठीतत्पुरुष हवा असतो. समर्थांना लोकांनीं ‘समर्थ’ म्हटलें तरी ते स्वतःस ‘रामदास’ ह्या नम्र नांवानें संबोधीत असत. आम्हांला ‘सामर्थ्य’ हवें पण ‘राम-दास्य’ नको, अशी आमची वाष्कळ वृत्ति बनली आहे. आम्हांला कष्टाशिवाय फळ हवें, शिष्यत्वाशिवाय गुरुत्व हवें, उपासनेशिवाय सामर्थ्य हवें, स्वदेशीशिवाय स्वराज्य हवें—असा आमचा हावरा स्वभाव आहे. आम्हांला निष्काम कर्मयोग नको, सकाम आळस पाहिजे. **‘रघुनाथभजनें ज्ञान झालें। रघुनाथ-भजनें महत्त्व वाढलें’** असें आपल्या सामर्थ्याचें बीज समर्थांनीं स्वतः च सांगितलें आहे. पण आम्हांस हें सर्व थोतांड वाटतें.

**भक्तीचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव ।**
**ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं**

असें दासबोधाचें रहस्य समर्थांनीं स्वशब्दानें च ग्रंथारंभीं प्रकट केलें असलें, तरी तें स्वीकारिलें तर पूर्वींचे संत आणि समर्थ ह्यांत फरक काय उरला? जें पूर्वसंतांनीं प्रतिपादन केलें तें च जर समर्थांनीं सांगितलें असेल, तर त्यांच्या उपदेशाची ‘अपूर्वता’ ती काय? ग्रंथामध्यें ‘अपूर्वता’ काय आहे हें पाहून ग्रंथाचें तात्पर्य ठरवावें असा अर्थ-निर्णय-कुशल मीमांसकांचा सर्वमान्य सिद्धांत आहे. तिकडे लक्ष देतां पूर्वसंतांनीं घातलेलें भक्तिमार्गाचें दळण च समर्थ दळत राहिले असतील असें आम्हीं कल्पूं च शकत नाहीं. सबंध दासबोधांत अध्यात्माची कटकट च मुख्यतः भरलेली दिसली तरी दासबोधाच्या उत्तर भागांत राजकारणाचा मधून मधून उल्लेख आलेला आहे, आणि समर्थांच्या ग्रंथांतील हा भाग ‘अपूर्व’ असल्यामुळें, हें च त्यांच्या ग्रंथाचें तात्पर्य होय असें आम्ही मानतों. एकदां एका योग्य

समर्थ-भक्ताला कोणीं प्रश्न केला कीं, 'समजा, दासबोधाचा पूर्वार्ध किंवा उत्तरार्ध कांहीं तरी एक च भाग तुम्हांस मिळेल, असें जर ब्रह्मदेवानें जाहिर केलें, तर तुम्ही कोणता भाग घ्याल ?' सदर गृहस्थ आपली जबाबदारी समजूं शकत असल्यामुळें त्यांनीं इतकें च उत्तर दिलें, 'मला याचा विचार करावा लागेल, आज मी कांहीं सांगूं शकत नाहीं.' पण प्रायः ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास आम्हांस कांहीं च विलंब लागूं नये. आमच्यापैकीं कोणी तर असें स्पष्ट उत्तर देणारे भेटतील कीं,—"आम्हांला पूर्वार्ध हि नको आणि उत्तरार्ध हि नको,

**राजकारण बहुत करावें । परंतु कळोंचि न द्यावें**

एवढी अर्धी च ओंवी लिहून समर्थांनीं लेखणी रामप्रभूच्या चरणीं अर्पण केली असती तर अधिक बहार झाली असती. पण पूर्वीच्या संतांनीं घालून दिलेलें प्रेम-संप्रदायांतील सात्त्विकतेचें कर्मकांड त्यांच्या हि डोक्यांतून पुरतेंपणीं जाऊं न शकल्यामुळें,

**परपीडेवरी नसावें । अंतःकरण**

असले अनत्याचारी वळणाचे चरण लिहून समस्या पूर्ण करण्याची बुद्धि त्यांना सुचली आहे."

रामोपासनेचा कर्मयोग म्हणजे नुसता दंभ असून राजकीय चळवळीच्या बचावापुरता त्याचा उपयोग करून घ्यावयाचा असतो असें आम्हांस वाटत असलें, तरी असली '**धोरणी**' उपासना समर्थांना अभिप्रेत नसून, त्यांच्या जिभेवर च नव्हे, पण आंतल्या हृदयांत, '**रामोपासना**' हीं अक्षरें कोरलेलीं आहेत, हें त्यांच्या चरित्राचें आणि उपदेशाचें वरवर अवलोकन करणाराच्या हि ठळकपणें नजरेस आल्याशिवाय राहत नाहीं.

**नाहीं देहाचा भरंवसा । केव्हां सरेल वयसा ।**
**प्रसंग पडेल कैसा । कोण जाणे ?**

अशी ही 'दों दिवसांची' अश्वस्थ वस्ती असल्यामुळें,

**या कारणें 'सावधान' असावें। जितुकें होईल तितुकें करावें ।**
**भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ**

ही एक च प्रेरणा समर्थांच्या आत्म्याला झालेली होती. म्हणून,

**ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।**
**संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं**

ह्या उद्योगांत समर्थांनीं आपलें पुढील सर्व आयुष्य खर्च केलें.

**कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।**
**विवेकबळें जन लावावें । भजनाकडे**

अशी त्यांची दीक्षा असे. किंबहुना राजकारणाच्या समासांत हि

**उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।**
**अवकाश कैचा कृत्रिमें । करावयासि ?**

असें आपलें राजकारण त्यांनीं सांगितलें आहे. 'कृत्रिम' उद्योग करीत बसण्याइतकी स्वस्थता आयुष्यांत नसल्यामुळें सर्व उद्योग उपासनेचा सामुदायिक प्रचार करण्याच्या दृष्टीनें केले पाहिजेत, अशी त्यांची महंतांस आज्ञा होती. स्वतः परमेश्वराची उपासना करणें हा **धर्म** म्हटला तर समाजाकडून उपासना करविणें हें समर्थांच्या दृष्टीनें, **राजकारण** होय.

**दीक्षा बरी मैत्री बरी । 'तीक्षण बुद्धि राजकारणीं' बरी ।**
**आपणांसि राखे नानापरी । अलिप्तपणें**

**अखंड हरिकथेचा छंद । 'सकळांसि लागे नामवेध' ।**
**प्रगट जयाचा प्रबोध । सूर्य जैसा**

ह्या एकापुढें एक आलेल्या दोन ओंव्यांकडे पाहिलें म्हणजे समर्थांच्या राजकारणाचा हेतु आणि स्वरूप हि स्पष्ट होणार आहे. '**रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी**' हें समर्थांनीं आपलें जीवित-कार्य मानलें असून, तत्सिध्द्यर्थ राजकारण आणि सर्व-सावध-वृत्ति ही अनिवार्य असल्यामुळें त्यांनीं अंगिकारिलीं होतीं. महाराष्ट्र-धर्माच्या विवेचनांत,

(१) **मुख्य हरिकथा-निरूपण । 'दुसरें' तें राजकारण ।**
**तिसरें तें सावधपण । सर्व-विषयीं**

(२) **हरिकथा-निरूपण । 'नेमस्तपणें' राजकारण ।**
**वर्तायाचें लक्षण । तें हि असावें**

आणि (३) **हरिकथा-निरूपण । 'बरेंपणें' राजकारण ।**
**प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें**

अशीं निरनिराळ्या प्रसंगीं तीन समानार्थक वचनें आलीं आहेत. तीन्ही ठिकाणीं राजकारण आणि समाजकारण ह्यांचा 'मुख्य' हेतु रामोपासनेचा प्रचार हा च मांडला आहे. धार्मिक तत्त्वांचा समाजांत प्रसार करण्यास कोणत्या हि राष्ट्रांत, आणि विशेषत: परतंत्र राष्ट्रांत, नुसतीं शांकरभाष्यें अगर त्यांवरील प्रवचनें उपयोगी न पडतां, साक्षात् राजकारणांत आणि समाजकारणांत उतरून लोकांकडून त्यांच्या नित्याच्या व्यवहारांत तीं तत्त्वें आचरवून घ्यावीं लागतात. उदाहरणार्थ, ज्या समाजांतील लोकांना इंग्रजांत दीड आत्मा आणि अंत्यजांत अर्धा आत्मा दिसतो, त्या समाजाला '**सर्वां भूतीं देख । एक आत्मा**' हें तत्त्व पटविण्यास सत्याग्रहासारखे

धीट प्रयोग किंवा अस्पृश्यतानिवारणासारखीं नम्र प्रायश्चित्तें प्रत्यक्ष करवून घेतल्याशिवाय, नुसतीं अद्वैताचीं विद्वत्तापूर्ण प्रवचनें उपयोगी पडतील काय ? सर्वसामान्य समाज प्रायः मूर्तिपूजक असल्यामुळें, निर्भयतेचें तात्त्विक, अव्यक्त, निर्गुण स्वरूप समाजाला शिकविण्यास राजकारणांतील प्रत्यक्ष, व्यक्त, सगुण सत्याग्रहाची मूर्तिपूजा करवून घेतल्याशिवाय इलाज नसतो. तसें च अस्पृश्यता-निवारणाचा लघुरुद्राभिषेक करवून घेतल्याशिवाय **'पंडिताः समदर्शिनः'** असल्या कोरड्या वेदान्ताचा कांहीं च परिणाम होऊं शकत नाहीं. ज्याप्रमाणें---**न कर्मणामनारम्भात् नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते**---नैष्कर्म्याची पूर्वतयारी म्हणून कर्मयोगाचें आचरण करावें लागतें, त्या च प्रमाणें कंगाल समाजाला त्यागवृत्ति शिकविण्यास मर्यादित भोग मिळविण्याची लायकी उत्पन्न करावी लागते. सामान्य लोकांचें पुण्य-पाप बऱ्या च अंशीं सुखदुःखांवर अवलंबून असल्यामुळें समाजाला पुण्यवृत्ति शिकविण्यासाठीं च (आणि शिकविण्यापुरतें च) सुख मिळविण्याचा मार्ग हि दाखवावा लागतो. पाप-पुण्याचा प्रश्न सोडविण्यास प्रायः पोटापाण्याचा सवाल सोडवावा लागतो. म्हणून स्वार्थी मनुष्य ज्याप्रमाणें, पोटासाठीं सारें ढोंग असलें तरी, 'पॉलिसी' म्हणून पांडुरंगाचें नांव घेत असतो, त्याप्रमाणें सत्पुरुषांना पोटांत धर्म असला तरी पुष्कळ वेळां ओठांत राजकारण राखावें लागतें. तथापि हें राजकारण धर्मप्रचाराचें साधन असल्यामुळें पवित्र राखण्याविषयीं त्यांचा आग्रह असतो, हें **'नेमस्तपणें राजकारण'**, **'बरेंपणें राजकारण'** असल्या भाषेवरून स्पष्ट होतें. सारांश समर्थांचें राजकारण धर्मप्रचाराच्या हेतूनें प्रवृत्त झालें असल्यामुळें आणि रामोपासना हा च समर्थांचा धर्म होता,---रामोपासनेशीं नुसतें **अ-विरुद्ध** होतें असें च नव्हे, पण रामोपासनेला

**साक्षात् साधक** होतें. म्हणून, राजकारणाच्या प्रकरणांत रामोपासनेच्या सामुदायिक प्रचाराचे मार्ग समजावून सांगणें त्यांना गैरवाजवी किंवा अप्रस्तुत वाटत नाहीं. पण "**आपण करावें करवावें । आपण विवरावें । विवरवावें आपण धरावें धरववावें । भजनमार्गासी**" हें संतांचें आचारसूत्र असल्यामुळें असल्या लोक-संग्रहांत पडण्यापूर्वीं आत्मनिग्रहाचा अनुभव घेण्याकरितां समर्थांनीं आपल्या आयुष्यांतील जोमाचीं, ऐन उमेदीचीं, कर्तृत्वाचीं वर्षे रामोपासनेच्या आत्मिक कर्मयोगाला अर्पण केलीं, आणि शेंवटीं ह्या कर्मयोगाकडून आत्मसाक्षात्काराची पावती हि लिहून घेतली. '**निश्चयाचें बळ**' हें च स्वतःसिद्ध फळ असल्यामुळें सत्पुरुष बाह्य फळाविषयीं अपेक्षा राखीत नाहींत.

समर्थांनीं रामोपासनेच्या कर्मयोगाचें जें द्वादश-वार्षिक सत्र आरंभिलें होतें त्याविषयीं सविस्तर माहिती मिळण्यासारखी नसली तरी अनुमानानें कल्पना करणें शक्य आहे. '**नान्यः पंथा विद्यते अयनाय**'—साधनेच्या भिन्न भिन्न मार्गांचें स्वरूप तत्त्वतः एक च असतें,—असा सर्वमान्य सिद्धान्त असल्यामुळें, उपासकाच्या कर्मयोगाचे (१) **तपस्** (२) **स्वाध्याय** (३) **ईश्वर-प्रणिधान** म्हणजे आत्म-समर्पण अथवा भक्ति, असे तीन विभाग करीत असतात (योगसूत्र २. १). हीं तीन्हीं अंगें उपासनेच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं असून, त्यांमध्यें तपश्चर्येला प्राथमिक स्थान द्यावें लागतें. कारण सर्व कर्तृत्वशक्तीचें बीज तपश्चर्येंत असतें. "**स तपोऽतप्यत् । स तपस्तप्त्वा । इदं सर्वं असृजत**"—परमेश्वरानें तपश्चर्या करून विश्व-रचना केली,—असें ऋषींच्या प्रतिभेला दर्शन झालें आहे. तसें च म्हणावयाचें तर परमेश्वर च कशाला, सर्व संसारी माणसें हि तपश्चर्या करीत असतात. "**एतद् वै परमं तपो यद् व्याहितस्त-**

**प्यते**"—संसारामधें ज्या अनंत आधि-व्याधि-उपाधींमधून मनुष्यास पसार व्हावें लागतें ती हि कांहीं लहानसहान तपश्चर्या नाहीं. खरोखर, टॉल्स्टॉय्नें म्हटल्याप्रमाणें, ही तपश्चर्या इतकी भयंकर आहे कीं, ती जर ज्ञानपूर्वक असती तर, तिच्यापुढें ख्रिस्तादिकांनीं केलेली तपश्चर्या अगदीं च अल्प ठरली असती. पण ही तपश्चर्या किती हि घोर असली तरी, तिच्यामागें कांहीं च ज्ञान किंवा शास्त्र नसल्यामुळें, असल्या अ-शास्त्र-विहित तपश्चर्येची तामसी श्रद्धेंत गणना करून, ह्या तामसी श्रद्धेनें आमरण संसारांत राबणाऱ्या '**तपस्वी**' पुरुषांस भगवंतांनीं '**आसुर-निश्चय**' ही पदवी दिली आहे. (गी. १७.६) ही आसुरी तपश्चर्या जीवनांतील सर्व रस सुकवून टाकून शेंवटीं स्मशानाचा रस्ता दाखविते ह्याचा प्रत्यय सर्वांस येत च आहे. ह्याच्या उलट साधकाची तपश्चर्या ब्रह्मचर्यादि इंधनांनीं इंद्रिय-निग्रहाचा अग्नि पेटवून, शरीरांतील कषाय किंवा कचरा जाळून टाकणारी असल्यामुळें सर्व जीवन सुगंधी आणि पुष्ट करीत असते. ह्या तपश्चर्येचा थोडासा अभ्यास झाल्यानंतर हिला 'तपश्चर्या' कां म्हणावें हें हि समजेनासें होतें. पोहण्याचा सराव झाल्यानंतर ज्याप्रमाणें पोहणें म्हणजे एक मौज, आनंद किंवा विलास होऊन बसतो, त्याप्रमाणें च ही तपश्चर्या साधकाला थोड्याशा अभ्यासानंतर आनंदमय वाटूं लागते. रोगट प्रकृतीच्या पुरुषास स्वादेंद्रियांचा संयम करणें जड जात असलें तरी, ज्यांच्या शरीरांत नैसर्गिक आरोग्याचें स्फुरण खेळत असतें, अशा माणसांना मिताहार करणें म्हणजे मोठी इंद्रिय-निग्रहाची बाब आहे, अशी कल्पना च होऊं शकत नाहीं, इतकी ती गोष्ट त्यांना स्वाभाविक होऊन गेलेली असते. अशा माणसांपुढें, '**इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः**'—आमचीं दांडगीं इंद्रियें

आम्हांला आवरत नाहींत--अशीं आमच्या आत्म-प्रतीतीचीं रडगाणीं गाऊन दाखविलीं, किंवा '**स्वभावतो विषय-विषयाणि इंद्रियाणि**'--इंद्रियें स्वभावतः विषयांकडे झुकलेलीं असतात-- '**पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः**' --ब्रह्मदेवानें इंद्रियांचीं तोंडें विषयांकडे वळविलेलीं आहेत--असलीं शास्त्रप्रतीतीचीं वाद्यें वाजविलीं, आणि जोडीला '**बलवान् इंद्रिय-ग्रामो विद्वांसमपि कर्षति**'--मोठमोठ्या ऋषींना हि इंद्रियांनीं लोळविलें आहे-- अशीं वृद्धस्मरणें उकरून काढून गुरु-प्रतीतीचा नाच नाचविला, तरी ह्या गीत-वादित्र-नृत्यात्मक तिहेरी संगीताचा ह्यांच्यावर कांहीं च परिणाम न होतां, ह्याचें आपलें म्हणणें कायम च असतें कीं, "**घुरुं लेकरूं बापुडें दैन्यवाणें**, त्याला हि जी गोष्ट साधली, प्रह्लादासारख्या उग्र-पुत्राला हि जिचें भय वाटलें नाहीं, त्या गोष्टीचा नसता बाऊ करून ठेवण्यांत कांहीं च अर्थ नाहीं." सारांश, पूर्व-दुष्ट अभिरुचीमुळें इंद्रिय-निग्रह असाध्य वाटला तरी तो असाध्य खास नाहीं. नैसर्गिक अभिरुचीच्या माणसाला तो जसा सहज असतो, तसा तो आम्हांस सहज नाहीं, कष्ट-साध्य आहे, इतकें च फार तर म्हणावें लागेल. शिवाय '**असाध्य तेंचि साधावें**' ह्यांत च खरा पुरुषार्थ असल्यामुळे, '**उत्पतति आर्यः पतन्नपि**'-- आर्य पुरुष पडला तरी पुनः चढतो,--इकडे नजर देऊन, प्रारंभीं किती हि कष्ट झाले तरी ते सोसून, साधकानें ज्ञानपूर्वक इंद्रिय-निग्रहाची तपश्चर्या केली च पाहिजे. तपश्चर्येनें विषयवासनांचा खडक फ़ोडून काढला म्हणजे अमृताचा जिवंत मधुर झरा हाताला लागतो, म्हणून हे प्राथमिक परिश्रम करण्यास कोणी हि चुकूं नये.

तपस्, स्वाध्याय, आणि ईश्वर-भक्ति हीं तीन्ही आत्म-शुद्धीचीं च साधनें असलीं, तरी तपानें मुख्यतः शरीर-शुद्धि,

स्वाध्यायानें वाक्-शुद्धि आणि भक्तीनें चित्त-शुद्धि होऊन शेंवटीं सर्वांचा एकत्र जोर झाला म्हणजे संपूर्ण आत्म-शुद्धि होत असल्यामुळें, '**प्राधान्येन व्यपदेशः**' ह्या न्यायानें, तप कायिक, स्वाध्याय वाचिक आणि भक्ति मानसिक असें ठोकळ मानानें म्हणतां येतें. शरीर-शुद्धीचें कार्य प्राथमिक म्हटलें तरी तें पूर्ण झाल्याशिवाय वाक्-शुद्धीचा अथवा चित्त-शुद्धीचा प्रयत्न करूं नये असा ह्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. तीन्ही प्रयत्न एकसारखे चालवावयाचे असतात. वाक्-शुद्धीच्या हेतूनें स्वाध्यायाची प्रवृत्ति असल्यामुळें, त्यांत संत-वचनांचा श्रवण-मनन-निदिध्यासन-पूर्वक अभ्यास करणें आणि विशेषतः ऋषींचा अनुभव ज्यांत सांकेतिक रीतीनें थोडक्यांत सुचविलेला असतो अशा मंत्रांचा जप करणें ह्यांचा समावेश होतो. '**उपवास आणि प्रार्थना**' (fast and prayer) हीं जीं दोन साधनें बायबल्मध्यें येत असतात, त्यांपैकीं उपवासाची गणना तपांत केल्यास, (बाह्य) प्रार्थनेचा समावेश स्वाध्यायांत करण्यास हरकत नाहीं. स्वाध्यायाचें, जपाचें किंवा प्रार्थनेचें हि सामर्थ्य केवळ अद्भुत आहे ह्यांत शंका नाहीं. '**दुसरें कांहीं असो वा नसो, नुसत्या जपानें च ब्राह्मण्य सिद्ध होतें**' (मनु. २.८७), असें जपाचें सर्वार्थकारित्व वर्णिलें आहे. "मनुष्य भाषेच्या साहाय्यानें च विचार करतो, भाषेशिवाय विचार करणें शक्य नाहीं, किंवा निराळ्या शब्दांत, घडा जसा मातीचा बनलेला असतो त्याप्रमाणें विचार हे भाषेचे बनलेले असतात;"—असें मानणारा एक पक्ष तत्वज्ञान्यांमध्यें प्रचलित आहे. भाषा म्हणजे 'स्पष्टोच्चारित व्यक्त-शब्दात्मक भाषा' असा अर्थ येथें विवक्षित नाहीं. मनुष्य बोलतांना आधीं एकापुढें एक शब्द बोलत असतो आणि त्या शब्दांचें मागून वाक्य बनतें, पण मनामध्यें आधीं **वाक्य** तयार असतें, आणि बाहेर

पडतांना एकदम अखंडरूपानें तें बाहेर निघूं शकत नसल्यामुळें तुकडे तुकडे होऊन शब्दरूपानें तें बाहेर पडतें. ही मानसिक वाक्यात्मक भाषा मनुष्यापाशीं सिद्ध असल्याशिवाय तो विचार **प्रकट** करूं शकत नाहीं, एवढें च काय पण मुळीं तो विचार **करूं च** शकत नाहीं, असें ह्या पक्षाचें म्हणणें आहे. तर्कशास्त्रांत व्यवहाराच्या भाषेहून निराळी च 'विचारांची भाषा' वापरीत असतात. त्या भाषेचा अर्थ विचार प्रकट करण्याची भाषा एवढा च नसून, ह्या पक्षाच्या मतें, विचार करण्याची भाषा असा हि आहे. ह्या मताचें परीक्षण करणें हा मानसशास्त्रीय तर्काचा विषय असला तरी भाषेचा विशिष्ट परिणाम विचारांवर होतो एवढा अनुभव व्यवहारांत हि येतो. विचार एक च, पण इंग्रजी शब्दानें प्रकट केला म्हणजे त्याला आंतून व्यापारी वृत्तीचा थोडासा वास येतो, आणि संस्कृत भाषेंत प्रकट केला म्हणजे त्याला आध्यात्मिक स्वरूप येतें, असें भाषाशास्त्राच्या सूक्ष्म अभ्यासकांचें म्हणणें आहे. 'मानव-**धर्म**' आणि '**ड्यूटीझ्** ऑफ मॅन' ह्यांतील अंतर कांहीं केल्या झांकलें जात नाहीं. 'शूद्राला वेदांचा **अधिकार** नाहीं' हें उदार तत्त्व आहे, 'पण शूद्राला वेदांचा हक्क नाहीं' ह्यांत कार्पण्य भरलेलें आहे. '**आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्**' ह्या वाक्याचें स्पष्टीकरण करतांना, "दुसरे लोक जर अन्यायानें वागूं लागले तर पुष्कळांच्या च काय पण सर्व पृथ्वीच्या हि हितापेक्षां **आत्म-संरक्षणाचा** म्हणजे **आपला बचाव करण्याचा** नैतिक हक्क बलवत्तर असतो," असें जें गीता-रहस्यकारांनीं म्हटलें आहे (गी. र. पृ ३९९), त्यांत हि भिन्न भिन्न भाषांच्या भिन्न भिन्न स्वभावामुळें होणारा जमीन-अस्मानाचा फरक दिसून येतो. सारांश, भाषेचा आणि विचारांचा गाढ संबंध असल्यामुळें, पवित्र

विचार अंत:करणांत येण्यास वाणींत पवित्र भाषा दाखल झाली पाहिजे हें उघड आहे. सांसारिक आईबाप, मुलाला लहानपणीं 'आई' 'बाबा' 'काका' इत्यादि भाषा शिकवीत असल्यामुळें ह्या भाषेच्या साहाय्यानें विचार करावयाचा म्हटला, म्हणजे तो संसारापलिकडे जाऊं च शकत नाहीं. सांसारिक भाषेच्या जपानें सांसारिक विचार उत्पन्न होऊन संसाराचे संस्कार उत्तरोत्तर दृढ होत जातात. अशा प्रकारें विशिष्ट जपानें बनलेले संस्कार काढून टाकण्यास तद्विरोधी जप करणें हें साधन अर्थत: च प्राप्त होतें. म्हणून व्यावहारिक भाषेविषयीं मौन स्वीकारून विशिष्ट आध्यात्मिक मंत्रांचा जप करण्याची सुंदर कल्पना शास्त्रकारांनीं शोधून काढली असून, तिला अनुसरून च संतांनीं रामनामाचा महिमा, अतिशयोक्तीचा दोष स्वीकारून हि, परोपरीनें वर्णन करण्यांत भूषण मानिलें आहे. 'बाबा' 'बाबा' ह्या शब्दाऐवजीं, 'आत्मा' 'आत्मा' हा शब्द जर लहानपणीं कानीं पडला असतां, तर कदाचित् मुलाच्या मनांत आत्म्याशिवाय दुसरा कसला हि विचार उत्पन्न झाला नसता हें संभवनीय आहे. पण हें व्हावें कसें ? बापाला वाटतें, 'माझें सार्वभौम महत्त्व मी मुलाच्या मनांत कसें ठसवूं ?' इंग्रजांना वाटतें,'आमच्या संस्कृतीशिवाय हिंदुस्थानचें चालणार नाहीं, असें आम्हीं शस्त्रद्वारां, शास्त्रद्वारां कसें हि करून हिंदी लोकांच्या मनावर बिंबविलें, म्हणजे आमचें राज्य स्थिर होईल.' जो तो आपापलें पोंकळ महत्त्व स्थापित करण्याच्या हेतूनें प्रयत्न करीत असतो. म्हणून निरहंकार ऋषींनीं परमेश्वराची अमर सत्ता चित्तावर ठसविण्यासाठीं '**स्वल्प सोपें फुकाचें**' सुटसुटीत मंत्र तयार करून ठेवले आहेत. त्यांचा जप आध्यात्मिक श्रद्धा वाढविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त व्हावा अशी योजना आहे. शिवाय, भाषेवांचून **विचार** होऊं शकत नाहीं, हें तत्त्व

जरी कित्येकांस संमत न झालें, तरी भाषेशिवाय कोणता हि बुद्धि-पुरस्सर **आचार** होऊं शकत नाहीं, हें मात्र बहुतेकांस मान्य आहे असें दिसतें. 'मला लेख लिहावयाचा आहे' ही भाषा मनांत प्रथम तयार झाल्याशिवाय, 'मला लेख लिहावयाचा आहे' हा अव्यक्त **विचार** उत्पन्न होण्यास हरकत नाहीं असें मानलें तरी, ह्या विचाराला मानसिक वाक्यात्मक भाषेचें स्वरूप प्राप्त झाल्याशिवाय मी लेख लिहिण्याचें व्यक्त **कर्म** करूं शकत नाहीं. विचारांचा उगम अव्यक्तांतून होत असून आचार व्यक्त सृष्टींत व्हावयाचा असल्यामुळें अव्यक्तांतून व्यक्तांत येण्याच्या मधली भूमिका— जिला योगाच्या भाषेंत '**अर्धनारी नटेश्वर**' अशी संज्ञा आहे— वाणीची समजली जाते. वाणी ही कांहीं अंशीं व्यक्त आणि कांहीं अंशीं अव्यक्त अशी असल्यामुळें,विचार आणि आचार ह्यांच्यामधील सांखळीचा योग्य दुवा होऊं शकते. म्हणून '**स भूरिति व्याहरत् स भूमिमसृजत**'— प्रजापतीनें '**भूः**' असा शब्द उच्चारिला आणि भूमीची उत्पत्ति केली— असें श्रुतींत सांगितलें असून, तदनुसार 'वैदिक शब्दापासून देवादिक जगताची उत्पत्ति झाली' असें सूत्रकारांचें मत आहे. (ब्रह्मसूत्र १. ३. २८). आणि व्यवहारांत हि सुतार, कपाट तयार करण्यापूर्वी 'कपाट' शब्दाचें (म्हणजे एका अर्थानें कपाटाच्या आकाराचें) स्मरण करून मग कपाट तयार करतो असा अनुभव आहे. आणि '**काशीस जावें नित्य वदावें**' ह्या म्हणींत हि त्याचें च प्रतिबिंब दिसून येत आहे. अशा रीतीनें वाणीचा विचाराशीं आणि आचाराशीं नित्य-संबंध असल्यामुळें कोणता हि साधन-मार्ग स्वाध्यायावांचून पुरा होत नाहीं. व्यवहाराविषयीं यावच्छक्य मुनि-वृत्ति स्वीकारून,स्वाध्यायाची किंवा जपाची संतत धार सुरू झाली म्हणजे, वाणीचे सर्व दोष धुतले जाऊन तिच्या ठिकाणीं '**यद् यदेव वदति तद् तद् भवति**'—

जें जें बोलाल तें तें होईल–– असें दिव्य, अमोघ वीर्य उत्पन्न होत असेल अशी कल्पना करणें अशक्य असूं नये.

तपानें शरीर-शुद्धि आणि वाक्-शुद्धि करण्याच्या प्रयत्नाबरोबर च ईश्वरार्पण बुद्धीनें किंवा भक्तीनें चित्त-शुद्धि करण्याकडे लक्ष नसेल, तर ह्या शरीर-शुद्धीला किंवा वाक्-शुद्धीला **शुद्धीचें** स्वरूप न राहतां **सिद्धीचें** स्वरूप येऊन या सिद्धि, उपासनेला नेहमीं च साधक न होतां विघ्नरूप होण्याचा हि संभव असल्यामुळें, '**जो जो प्रयत्न रामाविण। तो तो दुःखासि कारण।**' ह्या समर्थोक्तीप्रमाणें, शेंवटीं जगताच्या दुःखाचें कारण होत असतात. '**तपःस्वाध्याय-निरत**' हें विशेषण ऋषींप्रमाणें च, पुष्कळ राक्षसांनीं हि प्राप्त करून घेतल्याचें दिसून येतें. वाल्मीकीनें रामायणांत मारीच आणि सुबाहु ह्या राक्षसांविषयीं बोलतांना, "**मारीचश्च सुबाहुश्च वीर्यवन्तौ सुशिक्षितौ**" असें वर्णन केलें आहे. तपस्वी आणि स्वाध्याय-संपन्न अशा पुष्कळ विभूति, जगताच्या क्षयासाठीं आजपर्यंत निर्माण झालेल्या आहेत. म्हणून चित्त-शुद्धीच्या भक्ति-योगाशिवाय उपासना **पूर्ण** होत नाहीं हें तर काय, पण आधीं उपासना **होत च** नाहीं. नुसत्या तपाला 'अविद्या' आणि स्वाध्यायाला 'विद्या' अशा संज्ञा देऊन '**विद्यां चाविद्यां च यस्तद् वेद उभयं सह**' ह्या ईशावास्योपनिषदांतील वाक्याचा "विद्या आणि अविद्या ह्यांसह **त्याला** (म्हणजे ईश्वराला) ओळखलें पाहिजे," असा कोणी अर्थ केल्यास तो मननीय होईल, ह्यांत शंका नाहीं. भागवतांत हि "**नैष्कर्म्यमप्यच्युत-भाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरंजनम्**"––ईश्वरार्पण-बुद्धीच्या किंवा भक्तीच्या अभावीं निष्काम-कर्म अथवा ज्ञान हि फुकट आहे,–– असें म्हणण्यांत तप आणि स्वाध्याय ह्यांच्या जोडीला ईश्वराविषयींचें प्रेम अवश्य असलें पाहिजे हा च अर्थ सुचविला आहे. '**निष्काम-कर्म**' आणि '**ईश्वरार्पणपूर्वक निष्काम-कर्म**' ह्यांमधें पुष्कळांना कांहीं च फरक दिसत नाहीं. पण '**तुला जर ईश्वरार्पणपूर्वक कर्म करणें कठिण वाटलें तर निष्काम कर्म कर**'

(गी. १२.११), असें भगवंतांनीं म्हटलें असल्यामुळें त्यांना ह्या दोहोंत फरक वाटत आहे हें स्पष्ट आहे. आणि समर्थांनीं हि '**चळवळीचें सामर्थ्य**' कबूल करून तिच्या मुळाशीं '**भगवंताचें अधिष्ठान**' पाहिजे, असें म्हणण्यांत निष्काम कर्मयोग झाला तरी तो भक्तिपूत असावयास पाहिजे, असें दर्शविलें आहे. '**कष्टचि नाहीं तें निष्फळ**' हा नियम प्रपंचांत आणि परमार्थांत सारखा च लागू असल्यामुळें, तपश्चर्येच्या कष्टावर समर्थांनीं जरी वारंवार जोर दिला आहे, किंवा '**प्रवृत्ति अथवा निवृत्ति । श्रवणेंविण न घडे प्राप्ति**' हें स्पष्ट असल्यामुळें, '**अखंड एकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा**', '**विवरलेंचि विवरावें । वाचिलेंचि वाचावें**' इत्यादि प्रकारें स्वाध्यायाविषयीं आग्रह राखला आहे, तरी शेंवटीं, '**रामेंविण जे जे आस । तितुकी जाणावी नैराश**' हा त्यांचा विश्वास असल्यामुळें

> **आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।**
> **ईश्वरीं अर्पूनियां लुटी । आनंदाची करावी**

असा ईश्वरार्पण-बुद्धीच्या भक्ति-योगावर त्यांचा शेंवटचा हवाला आहे.

'**जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते**'—ब्रह्ममार्गातील प्रवासी देव-ऋण, पितृ-ऋण आणि ऋषि-ऋण अशीं तीन ऋणें डोक्यावर घेऊन जन्मास आलेला असतो—असें म्हणत असतात. ब्रह्मचर्यादि तपानें पितरांचें ऋण, स्वाध्यायानें ऋषि-ऋण, आणि ईश्वर-भक्तीनें देव-ऋण फेडलें जातें, असें उपासनेच्या ह्या त्रिविध कर्मयोगांत ऋण-मोचनाचें सामर्थ्य आहे. ब्रह्मचर्यादि तपश्चर्येनें रजोगुणाचा रंग फिका पडतो, स्वाध्यायानें तमोगुणाचा अंधार मावळतो, ईश्वर-भक्तीनें सत्त्वगुणाचा डोळे दिपवून टाकणारा प्रकाश सौम्य होतो, असें हे त्रिगुणांविरुद्ध तीन मोर्चे उभे केले आहेत. हे तीन्ही मोर्चे लावून बारा वर्षेंपर्यंत समर्थांनीं जें सतत युद्ध चालविलें होतें त्याची कल्पना त्यांच्या च शब्दांनीं देणें बरें—

**भेदाचा मडघा मोडला । अहंकार सोडून पाडिला ।**
**पायीं धरून आपटिला । संदेह-शत्रु**
**विकल्पाचा केला वधु । थापें मारिला भव-सिंधु ।**
**सकळ भूतांचा विरोधु । तोडून टाकिला**
**भव-भयासि भडकाविलें । काळाचें टांगें मोडिलें ।**
**मस्तक हाणोनि फोडिलें । जन्म-मृत्यूचें**

'**युध्द्यस्व विगत-ज्वरः**' ही भगवंताची आज्ञा स्मरून, समर्थांनीं 'अंतःर्बाह्य जग आणि मन' ह्यांच्याशीं सतत बारा वर्षेंपर्यंत रात्रंदिवस झगडा चालविला, आणि शेंवटीं मृत्यूचें मस्तक फोडून त्याच्यापासून मिळविलेल्या लुटीच्या अक्षय ठेव्यांतून स्वतःचीं तीन्ही ऋणें तर फेडलीं च पण इतरांचीं हि ऋणें फेडण्यास मदत करून, '**जीव दरिद्री असंख्यात । नृपति केलें**'! समर्थांनीं जेव्हां शरीराला तपश्चर्येच्या गोदावरींत खडें राखून, यमुनेच्या पाण्याचें अनुकरण करणाऱ्या रामाच्या सांवळ्या मूर्तीवर त्याच्या च नामाच्या जपानें वाक्-संयमरूप यमुनेची संतत धार सोडून वाचिक अभिषेक केला असेल, आणि त्याबरोबर च राम-भक्तीच्या विश्व-पावनी गंगेंत मनानें अखंड विहार केला असेल, त्यावेळीं लोकोक्तींतील कुंतीनें ज्याप्रमाणें कर्णास उद्देशून म्हटलें, त्याप्रमाणें समर्थांची माता––किंवा मायादेवी हि––त्यांना उद्देशून, '**गंगे गोदे यमुने माझा नोहे तुझा चि हा बाळ**' असें म्हणाली असेल ह्यांत शंका नाहीं. समर्थांनीं स्वतः ह्या त्रिविध उपासनेच्या त्रि-पथगेंत मनमुराद स्नान केलें च, पण जे कचरट स्नान करण्यास भीत होते त्यांना हि स्नान घातलें !––**सो अस्नातॄनपारयत् स्वस्ति** (ऋग्वेद २. १५. ५) । ('**तरतेन बुडों नेदावें । बुडतयासि**' असा न्याय च असल्यामुळें त्यांनीं स्वतः तरून इतरांस हि तारण्याचा प्रयत्न केला, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. पण स्वतःला तरतां येत नसून हि आम्ही इतरांना तारण्याची आकांक्षा बाळगतों, हा आमचा विशेष आहे. आत्म-निग्रहाकडे लक्ष न देतां, लोक-संग्रहाची हाव

बाळगण्याचा आधुनिक समाजाला एक रोग जडला आहे. ह्या रोगापासून दूर राहून समर्थांनीं आत्म-निग्रहाच्या कर्म-योगावरून आपली दृष्टि चळूं दिली नाहीं. वस्तुतः आत्म-निग्रह आणि लोक-संग्रह अशीं दोन निरनिराळीं कामें आहेत ही कल्पना च बरोबर नाहीं. 'मला आतां दिवा लावणें आणि अंधाराचा नाश करणें अशीं दोन कामें करावयाचीं आहेत' ह्या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? दिवा लावला म्हणजे ज्याप्रमाणें अंधाराचा नाश आपोआप होत असतो, त्याप्रमाणें मनुष्यानें आत्म-निग्रहाचा अभ्यास यशस्वी केला म्हणजे हा आत्म-निग्रह च पुढील लोक-संग्रह कसा करावयाचा तें पाहून घेतो, त्याची चिंता मनुष्यास करावी लागत नाहीं. समर्थांनीं अभ्यासाच्या प्रकाशांत आत्मपरीक्षण करण्याकडे च आपलें सर्व लक्ष एकाग्र करून प्रथम आत्मशुद्धीचें माप पदरांत पाडून घेतलें.

पण हा आत्मशुद्धीचा कर्म-योग पूर्ण झाला (असें वाटलें), तरी ही पूर्णता सापेक्ष असल्यामुळें, तिच्या दृढीकरणासाठीं पुढें बाह्य स्वरूपाचा कर्मयोग आचरावा लागतो. आयुष्यांतील पहिल्या, आनंदमय समजल्या जाणाऱ्या बाळपणांत च, समर्थांच्या कुशाग्र बुद्धीला संसाराच्या दुःखमयत्वाचें 'अनुमान' झाल्यामुळें पुढील 'प्रत्यक्ष' अनुभवाची जरूर न राखतां त्यांनीं वैराग्यानें घरावर लाथ मारून एक तप अभ्यासाच्या त्रिविध कर्मयोगांत खर्च केलें, आणि रामोपासनेनें चित्ताची प्रसन्नता संपादन केली. पण ह्यापुढें स्थावर कर्मयोगानें मिळविलेली ही चित्ताची प्रसन्नता, जंगम कर्मयोगानें दृढ आणि निर्भय करण्याची जरूर असल्यामुळें, आणखी बारा वर्षें समर्थांनीं सर्व भरतखंडांत तीर्थयात्रा केली. आत्म-परीक्षणानें ठरविलेले सिद्धांत विश्व-निरीक्षणानें पडताळून पहावयाचे असतात. त्याशिवाय **'यथा पिंडे तथा ब्रह्मांडे'** असा पिंडब्रह्मांडामधील अद्वैताचा अनुभव येऊं शकत नाहीं. म्हणून **'पूर्णम् इदम्'**—हें (म्हणजे आंतलें जग) पूर्ण आहे—असा अनुभव आल्यानंतर, **'पूर्णम् अदस्'**—तें (म्हणजे बाहेरचें जग) पूर्ण

आहे--हा अनुभव घेण्यासाठीं समर्थांनीं उघडचा डोळचांनीं सर्व हिंदुस्थानभर बारा वर्षें पायीं प्रवास केला. आधीं स्वतःच्या हृदयांतील बैठचा ब्रह्माचा अनुभव घेतल्याशिवाय विश्वांतील धावत्या ब्रह्माच्या पाठीं लागणारांस '**उगे चि वणवण हिंडोनि । काय होते**' असा समर्थांचा सवाल आहे. म्हणून आंतली बैठक स्थिर केल्यानंतर समर्थांनीं ब्रह्मांडाचा शोध करण्यास सुरुवात केली, आणि '**आचमन-प्रवृत्तस्य पिपासाऽपगमवत्**'--आचमन करीत असतां तहान हि भागते--ह्या न्यायानें लोक-संग्रहाचें हि कार्य ह्या आध्यात्मिक प्रवासांत अनुषंगानें साध्य झालें. पण '**योगिनः कर्म कुर्वन्ति संगं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये**'--योग्यांचीं सर्व कर्में आत्म-शुद्धीच्या हेतूनें प्रवृत्त झालेलीं असतात--असा शास्त्रीय सिद्धांत असल्यामुळें, समर्थांचा मुख्य हेतु लोक-संग्रहात्मक होता, असें मानणें गैर आहे. लोक-संग्रहाचें कार्य अनुषंगानें होत होतें, आणि भूत-दयेच्या दृष्टीनें तें त्यांना अनिष्ट हि वाटत नव्हतें, अशा अर्थानें हा त्यांचा आनुषंगिक किंवा गौण हेतु होता असें म्हणतां येईल. मनःशुद्धीच्या हेतूनें केलेल्या धर्म-स्नानानें ज्याप्रमाणें शरीर-शुद्धि आपोआप पदरांत पडते, पण शरीर-शुद्धीच्या हेतूनें केलेल्या आरोग्य-स्नानानें मनः-शुद्धि होते च असें नाहीं; त्याप्रमाणें आत्म-शुद्ध्यर्थ केलेल्या कर्मांनीं लोक-संग्रह सिद्ध होत असला तरी लोक-संग्रहार्थ केलेल्या कर्मांनीं आत्म-शुद्धि होईल च, असें म्हणतां येणार नाहीं. उलट, कधीं कधीं अहंकार वाढण्याचा मात्र संभव राहील. म्हणून लोक-संग्रह हा संतांच्या कार्याचा (आनुषंगिक) **परिणाम** असला तरी तो त्यांचा **हेतु** नव्हे. पण हेतु नसला तरी त्याच्याकडे त्यांचें लक्ष नसतें-- किंवा कमी असतें--असें हि नाहीं. पण हा कांहींसा जटिल मुद्दा असल्यामुळें ह्याचा विस्तारपूर्वक खुलासा करणें जरूर आहे.

मराठी ... संशोधन, ...
अनुक्रमांक २८१०५ ...... दि: ......
१५७०१ ... दि: ... १२।२।६७

# रामदासांच्या भजनांची वर्णानुक्रमणिका

| | |
|---|---|
| अजयो न हो रे | ७ |
| अनित्याचा भ्रम गेला | १७ |
| अपराध माझा क्षमा | १६३ |
| अर्थेविण पाठ | १२३ |
| असोनि इंद्रियें सकळ | ७६ |
| आतां कोणा शरण | २४ |
| आतां तरी जाय जाय | १८१ |
| आत्मज्ञानी आहे भला | ८९ |
| आपुलीं पारखीं सर्व | १२२ |
| आपुलें स्वरूप आपणा | ३७ |
| आमुचे वंशीं आत्माराम | ९८ |
| आम्हां तुम्हां मुळीं | १९८ |
| आम्हां ये प्रपंचीं | १०० |
| आम्ही अपराधी | ४२ |
| आम्ही काय कुणाचें | १०७ |
| आम्ही मोक्ष लक्ष्मीवंत | ५८ |
| आवडतो प्रिय परि | १५६ |
| इथें कां रे उभा | ४ |
| इंद्रासी उद्वेग सर्वकाळ | २६ |
| एकदां जेवितां नव्हे | ८३ |
| एक लाभ सीतापति | ११८ |
| एकीकडे आहे जन | ५५ |
| ऐसा कैसा रे परमार्थ | २२ |
| ऐसा कोण संत जो | ३६ |
| ऐसा हा मत्सर | १५ |
| ऐसें आत्मज्ञान उद्धरी | ७४ |
| कंठत नाहीं सुटत नाहीं | १६८ |
| कथानिरूपणें समाधि | ८४ |
| करीं घेतां नये | १०३ |
| करीं सीताराम मंत्र | १८२ |
| करूनि अकर्ते होऊनियां | १३९ |
| कर्ता एक देव | ११२ |
| कर्ता तूं नव्हेसी | १४० |
| कल्पनेचा प्रांत तो | ६८ |
| कल्पनेच्या देवा | १३२ |
| कल्याण करी देवराया | १६९ |
| कल्याण मागणें देवा | ९ |
| काम क्रोध मद मत्सर | ७८ |
| काय गावें रे काय गावें | ८६ |
| काय पाहों मी आतां | १९० |
| काया वाचा मनें | ९७ |
| कांहीं दिसे अकस्मात | १०५ |
| काळ जातो क्षणक्षणा | ५१ |
| कुळ हनुमंताचें | १५१ |
| कृपा पाहिजे राघव | १७७ |
| केला काशीविश्वेश्वर | ७२ |

कैवारी हनुमान १५३
कोण मी मज १८९
कोणें प्रारब्ध निर्मिलें १३७
कोमळ वाचा दे रे १६१
कौल जाला रघुनाथाचा ७५
क्षीरापतीची वाटणी १८
गगना लावूं जातां १४१
गजेंद्र सावजें ६३
घात करा घात करा १५५
घात करूनि आपुला १४
चालत नाहीं बोलत १९१
चित्त देउनि ऐका रे १३०
छाया देखुनी आपुली १०६
जठरीं लागो क्षुधा १०१
जना जन पाळिताहे १८७
जंव तुज आहे ३९
जाणावा तो ज्ञानी २८
जाणावा तो नर ३३
जाणावा तो साधु ३०
जिवींची जीवनकळा १७२
जैसें बेकारपण १७१
जो का भगवंताचा ११९
जो जो भजनासी ९३
जोपा केली इक्षुदंडा ३८
ज्ञान पवाड पवाड १८५
ज्ञानाचें लक्षण १२४
ज्ञानेविण जे जे कळा १३६
टाकोनि जनांसी २०
ठकाराचें ठाण ६७
तुम्ही सर्व देव १२९
ते चि जाणावे २७
त्याचे पाय हो ८७
त्रिविध तापहारक १८०
दासाची संपत्ति ९५
दिनानाथाचे सेवक ९४
दीनबंधु रे दिनबंधु १६६
दृढ धरी मना ११३
दृढ होता अनुसंधान १३५
देखिला रे देव १९२
देव अभक्तां चोरला ३५
देव जवळी अंतरीं ४१
देव पाषाणाचा ११७
देव वैकुंठीचा १५२
देह विटाळाचा गोळा ११
देह हें असार १२
देहीं आरोग्य चालतें १३
धन्य ते भाविक ३४
धातुवरी आला मळ १९
धांव रे रामराया १६७
ध्यान करूं जातां ६२

| | | | |
|---|---|---|---|
| ध्यान लागलें रामाचें | १ | प्रवृत्ति सासुर | २५ |
| नको ओळखीचे जन | ५७ | बाळक जाणेना मातेसी | ६१ |
| नदी मर्यादा सांडती | ५२ | बिभीषण भावें शरण | ४८ |
| नमू रामकृष्णा | १२७ | बोलण्यासारिखे चाले | ३१ |
| नाना पिकाची भोय | १८६ | बोलवेना तें बोलावें | १४४ |
| नाम चि कारण रे | १७८ | ब्रह्मादिक देव | ६० |
| निरूपणाऐसें नाहीं | ८१ | भगवंताचे भक्तीसाठीं | ७० |
| पतित पावना जानकी जीवना | ४३ | भरत गा खंडामाजीं | १४७ |
| ,, ,, ,, ,, | ४५ | भाग्यवंत नर यत्नासी | १२६ |
| ,, ,, ,, ,, | ४७ | मन हें विवेकें | १३१ |
| पतित पावना जानकी जीवना | ४६ | मनाहूनि विलक्षण | १३४ |
| ,, ,, ,, ,, | ४४ | मनुष्याची आशा | ९९ |
| पतित म्हणजे वेगळा | १३८ | मनोगत जाणे सूत्र | १०९ |
| पतित हे जन | १२० | माजीं बांधावा | १२५ |
| परिचयें जेथें अत्यंत | ११६ | माझा देह तुज | ५० |
| पळा पळा ब्रह्मपिसा | १९६ | माझा स्वामी आहे | १०४ |
| पांचा लक्षणीं पुरता | २९ | माझी काया गेली | १९९ |
| पावनभिक्षा दे रे राम | १६० | माझें मी तूं पण | १४५ |
| पाहतां दिसेना | ४० | माय वोळली माय | १५४ |
| पुरें पट्टणें वसती | ५३ | मायाहोळी प्रज्वळली | १४९ |
| पूर्ण ब्रह्म होय गे | १७४ | मुक्तपणें करीं नामाचा | ८८ |
| पोट भरावया मांडिले | १२१ | योगियांचा देव मज | १४६ |
| प्रथम लिहिणें | १० | रावबाचा धर्म गाजो | १४८ |
| प्रपंच दुःखाचा द्रुम | २८४ | राघवाची कथा | ८५ |
| प्रपंच सांडूनियां | ५६ | राघवाचे घरीं | १४२ |

| | | | |
|---|---|---|---|
| राघवाचे दास | ९६ | शरण जावें रामराया | ११४ |
| राज्य जालें रघुनाथाचें | १०३ | शरण तुज रघुवीरा | १६४ |
| रात्रंदिस मन राघवीं | ९० | शहाणें शोधितां नसे | १५८ |
| राम आकाशीं पाताळी | ५ | शिंक जांभई खोकला | १११ |
| रामकृपा बहुत | ८ | शिरी आहे रामराज | ६५ |
| राम कैसा आहे | ९२ | श्रीगुरुचे चरणकंज | १७९ |
| रामनाम कथा गंगा | ८० | सखिये हो आहेती | १५७ |
| रामनाम कथा श्रवणीं | ७९ | संगिन गायन दे रे | १६२ |
| रामभक्तिविण अणु | ७३ | सत्राणे उड्डाणें हुंकार | ६ |
| रामाची करणी अशी | १७६ | सदा सर्वदा योग तूझा | २०० |
| रामा तुझ्या स्वामीपणें | ४९ | संतांची आकृति | ११० |
| रामा हो जय रामा हो | १७० | समुदाय काय सांगों | २ |
| रामेविण देश तो जाण | ६९ | सर्व समाधान होय | ८२ |
| रुक्मांगद होता नर | १७ | सर्वां अंतरीं आत्माराम | १९३ |
| रूप रामाचें पाहतां | १०२ | संसारी नव्हता काय तो | २१ |
| रे मानवा उगी च | १७३ | संसारीं संतोप वाटला | १९४ |
| लागली वृत्ती ती | १८८ | सांजे ओसरतां सांत | ५४ |
| लोभानवसांचा तो | ९१ | साधु आणि भक्त | ३२ |
| वदन सुहास्य रसाळ | १५० | साधुसंतां मागणें हें चि | १५९ |
| वय थोडें ठाकेना | १७५ | सुखदायक गायक | १८३ |
| वाजे पाऊल आपुलें | १०७ | सूर्यनारायणा देवा | १२८ |
| वाणी शुद्ध करीं | ७७ | सोयरे जिवलग | ६४ |
| वासनेची बेडी | ११५ | स्नानसंध्या टिळेमाळा | ५९ |
| विदेशासी जातां | १३३ | स्वस्कंधीं बैसणें | १४३ |
| वेधें भेदावें अंतर | ७१ | हरि माझें जीवींचें | ६६ |
| वैद्य भेटला सुखदाता | २३ | हे दयाळु वा हे | १६५ |
| शक्ति आहे तों | १०८ | होते वैकुंठीचे कोनी | १९५ |


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रमांक 26905 दि: 31.07
[illegible] 9[illegible] [illegible] 1212151

REFBK-0010591

REFBK-0010591